# MODERN College Magazine




5 years

1970-1975

प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटीचे
मॉडर्न साहित्य, शास्त्र व वाणिज्य महाविद्यालय

# मॉडर्न' ७५

## नियतकालिक

वर्ष पाचवे अंक पाचवा

संपादक : डॉ. भीमराव कुलकर्णी

संपादन-समिती : प्राचार्य मो. भा. लिमये, उपप्राचार्य डॉ. ल. ह. गाडगीळ, उपप्राचार्य डॉ. भीमराव कुलकर्णी, डॉ. स. य. परांजपे, प्रा. सु. ग. दातार, प्रा. श्री. दा. संगोराम, श्री. रवि करंदीकर (विद्यार्थि-प्रतिनिधी)
मुद्रक : चिं. स. लाटकर, कल्पना मुद्रणालय, टिळक रोड, पुणे ३०.
प्रकाशक : मो. भा. लिमये, प्राचार्य, मॉडर्न महाविद्यालय, शिवाजीनगर, पुणे ५
मुखपृष्ठ : चित्रकार सतीश विष्णु कदम, तृ. व. वाणिज्य, मुखपृष्ठ छपाई : नंदादीप, पुणे.

# आम्हा मराठ्यांच्या अस्मितेचे आद्य प्रणेते
# श्रीचक्रधरस्वामी व ज्ञानेश्वरमहाराज

महानुभव पंथाचे संस्थापक श्रीचक्रधरस्वामी यांच्या 'उत्तरापंथे गमना'ला किंवा प्रयाणाला यंदा ७०० वर्षे पुरी झाली. चक्रधरस्वामींचे सारे चरित्र विलक्षण अद्‌भुत घटनांनी भरलेले आहे. त्यांचे मूळ नाव हरपाळदेव. गुजरातमधील भडोचच्या प्रधानाचे ते पुत्र. तरुणपणी विवाह झालेला. घरी वंशाचा दिवा रांगत असलेला. अशा अवस्थेत त्यांना मृत्यू आला. परंतु त्यांच्या मृत शरीरात चांगदेव राउळ नावाच्या सिद्ध पुरुषाने प्रवेश केला व ते जिवंत झाले. रामटेकच्या यात्रेचे निमित्त करून ते महाराष्ट्रात आले. वाटेत रिधपूर येथे गोविंदप्रभू नावाच्या सत्पुरुषाशी त्यांची गाठ पडली व त्यांच्यापासून त्यांनी ज्ञानशक्तीचा स्वीकार केला. ही घटना त्यांच्या सबंध आयुष्याला कलाटणी देणारी ठरली. ते हरपाळदेवाचे 'चक्रधर' झाले. त्यानंतर बारा वर्षे एकांतात घालवून ते लोकांतात आले. लोकोद्धाराच्या असीम धारणेने त्यांनी तत्कालीन महाराष्ट्राची भ्रमंती केली व समतेवर आधारलेल्या नव्या धर्मपंथाची स्थापना करून 'मराठी अस्मिते'च्या पायाभरणीचे काम केले. चक्रधर स्वतःला ईश्वरावतार समजत. पुराणांतरीच्या देवापेक्षा 'चालताबोलता' देव मनुष्यरूपाने समाजात वावरून गीतेतील भगवंताचे वचन कसे सार्थ करतो, त्याचे उदाहरण म्हणजे चक्रधरस्वामींचे कार्य होय. स्वामींनी एका नव्या स्वतंत्र अशा तत्त्वज्ञानाची उभारणी केली. मराठी भाषेला धर्मग्रंथांच्या भाषेची प्रतिष्ठा प्राप्त करून दिली व तिच्यामध्ये सर्वप्रकारचे वाङ्मय निर्माण करण्याची क्षमता असल्याचा आपल्या शिष्यांत साक्षात्कार घडविला. त्यांना मराठीचा व महाराष्ट्राचा विलक्षण अभिमान. ते 'मऱ्हाठी तरि अनावर बोलत असेति :' ही त्यांच्या बद्दलची तत्कालीन जनतेची भावना. त्यांच्यामध्ये अपूर्व वेधशक्ती होती. दिसण्यात ते अतिशय सुंदर होते. परंतु त्यांची साधी राहाणी व त्यांचे साधुत्व फार महत्त्वाचे होते. सर्व जातींतील व थरांतील व्यक्तींना मोक्षमार्ग त्यांनी सुलभ करून दिला. महानुभाव वाङ्मयाच्या रूपाने एक समृद्ध दालन त्यांच्यामुळे मराठीत उघडले गेले.

संत ज्ञानेश्वर महाराजांची यंदा ७०० वी जयंती येते. ज्ञानेश्वरमहाराजांच्या केवळ स्मरणानेही एका नव्या चैतन्याचा साक्षात्कार होतो. मराठी जीवनातील जे जे उदात्त, दिव्य, भव्य, मांगल्यपूर्ण आणि उत्कट ते ते सारे ज्ञानदेवांच्या चरित्रात सामावलेले आहे. ज्या समाजाने आपला छळ केला, त्या समाजबद्दल यत्किंचितही कटुतेची भावना न बाळगता त्याला अगदी तरुणवयातच आत्मसाक्षात्काराचा नंदादीप दाखविणारा हा चिरयोगी ! सारे भारतीय तत्त्वज्ञान ज्ञानदेवांच्या वाणीला वश होते आणि त्यांच्या तोंडून निघणारा प्रत्येक शब्द महाराष्ट्राने शतकानुशतके जतन करून ठेवावा, इतका क्रांतदर्शी ठरला. मराठी संस्कृतीची पताका डौलाने फडकत ठेवणाऱ्या वारकरी पंथाची प्रस्थापना आणि कसलेही पीठ वा मठ निर्माण न करता मुक्त ज्ञानपीठाच्या रूपाने महाराष्ट्राच्या घरोघरी पोचविणारी अध्यात्मगंगा हे ज्ञानदेवांचे केवढे मोठे कार्य ! 'जन्मतेनि प्रसंगें । स्त्रीदेह शिवणें आंगें । तेथौनि जन्म आघवें । सोवळें किजे' या कोटीतले त्यांचे विशुद्ध, निष्कलंक चारित्र्य ! अवघ्या सोळा वर्षांच्या अवधीत ज्ञानेश्वरी, अमृतानुभवासारखी ग्रंथरचना करण्याचे अलौकिक बुद्धिसामर्थ्य साऱ्या जगात अपूर्वच ! भाष्यकारांना वाट पुसणाऱ्या ज्ञानदेवांनी 'हे जग सुंदर आहे, तेच खरे आहे' ही नवी जीवनदृष्टी चिद्विलास-वादाच्या रूपाने महाराष्ट्राला दिली व कर्मकांडाचा निषेध करून महाराष्ट्राला आध्यात्मिक समतेची दीक्षा दिली. त्यामुळेच सारा भारत अस्मानी-सुलतानीमध्ये गाढ निद्रेत थंड असता महाराष्ट्रात स्वराज्यस्थापनेचा अंकुर फुलून आला !

या दोघा महापुरुषांना आमचे विनम्र अभिवादन.

'संपादकीया'तून

# संपादकीय

**अभिवादन !**

महाविद्यालयाचे हे पाचवे वर्ष. १९७० साली हे महाविद्यालय सुरू झाले तेव्हा अनेक अडचणी होत्या. इमारत पुरी व्हायची होती, विद्यार्थी साशंक मनाने सुरुवातीला दबकत दबकत महाविद्यालयाच्या आवारात रेंगाळत होते, प्रयोगशाळा उभ्या राहात होत्या आणि नव्याने घडत असलेल्या या वास्तूत तरुण व उत्साही प्राध्यापक नव्या उमेदीने आपणही काही घडवावे या उमेदीने वावरत होते. बघता बघता या घटनेला अर्धेमुर्धे युग उलटून कसे गेले ते कळलेही नाही इतक्या झपाट्याने सर्वांगपरिपूर्ण अवस्थेत हे महाविद्यालय आज डौलाने उभे राहिलेले दिसत आहे ! महाविद्यालयाच्या या घडणीच्या काळात विद्यार्थ्यांची संख्या गणिती वेगाने वाढत राहिली. सुरुवातीला जेमतेम पाऊण हजाराच्या घरात विद्यार्थी होते, आज त्यांची संख्या दोन हजारांच्या घरात आहे. महाविद्यालयाच्या घडणीत हातभार लावणाऱ्या साऱ्यांना अभिवादन करून महाविद्यालय पुढची वाटचाल तितक्याच निष्ठेने व उमेदीने करीत आहे.

**अत्यावश्यक गरजा**

महाविद्यालयाच्या शैक्षणिक घडणीत कसलीही उणीव राहू नये याची दक्षता महाविद्यालयाने घेतली असली तरी आर्थिक अडचणींमुळे काही गैरसोयींना महाविद्यालयास तोंड द्यावे लागत आहे. ही गैरसोय अर्थातच अतिशय वेगाने वाढणाऱ्या साऱ्याच संस्थांना सोसावी लागते.

महाविद्यालयासाठी सुसज्ज, स्वतंत्र अशी ग्रंथालयाची इमारत, विद्यार्थी व विद्यार्थिनी यांच्यासाठी स्वतंत्र वसतिगृहे आणि अद्ययावत सभागृह यांची महाविद्यालयाला आज निकडीची गरज आहे. येत्या वर्ष–दोन वर्षांच्या कालावधीत या गरजा पुऱ्या होणे आवश्यक आहे. त्या लवकरच पुऱ्या होतील, असा आत्मविश्वास वाटतो.

**उत्कृष्ट निकालांची परंपरा**

पहिल्या वर्षापासून महाविद्यालयाने उत्कृष्ट निकालांची जी एक परंपरा निर्माण केली, त्याला १९७४ सालच्या निकालाने अर्थपूर्णता आणून दिली. 'मराठी' या विषयात आमच्या महाविद्यालयाच्या सौ. हेमा लेले यांनी विद्यापीठात बी. ए. ला अत्युच्च यश मिळविले व विद्यापीठाची पाच पारितोषिके व एक सुवर्णपदक पटकाविले. श्री. रवींद्र गुर्जर यांनी बी. कॉम्. ला 'कॉस्ट अकाउंटन्सी' या विषयात विद्यापीठात अत्युच्च गुण मिळविले. पदवीपूर्व शास्त्र परीक्षेत कु. नीलिमा गोडसे हिने विद्यापीठात सातवा क्रमांक मिळविला तर कु. प्रज्ञा पेंढारकर हिने साहित्यशाखेकडे पदवीपूर्व वर्गात तोच क्रम पटकावून शास्त्रशाखेशी हातमिळवणी केली !

**क्रीडानैपुण्य**

उत्कृष्ट निकालाबरोबरच आमच्या विद्यार्थ्यांच्या क्रीडाक्षेत्रातील नैपुण्याचाही उल्लेख केला पाहिजे. आमच्या विद्यार्थिनींनी आंतर-महाविद्यालयीन क्रीडास्पर्धांत 'व्हॉलीबॉल'मध्ये अजिंक्यपद मिळविले व बॉस्केटबॉलमध्ये उपविजेतेपद मिळविले. विद्यार्थ्यांनी खोखो स्पर्धेत उपविजेतेपद मिळविले. श्री. श्रीरंग इनामदार, कु. भारती शहा, श्री. गिरीश दंडे व श्री. अतुल जोशी यांनी निरनिराळ्या आंतर महाविद्यालयीन व आंतर राज्य क्रीडा स्पर्धांत विशेष उल्लेखनीय कामगिरी केली आहे. त्यांचा महाविद्यालयाला अभिमान वाटतो.

**विद्यार्थी हा प्राण**

सुबुद्ध व जबाबदार नागरिक हा जसा कोणत्याही देशाचा कणा असतो तसाच ज्ञानपिपासू, क्रीडाप्रिय व शिस्तबद्ध विद्यार्थी हा प्रत्येक महाविद्यालयाचा प्राण असतो. विद्यापीठाने नियुक्त केलेल्या अभ्यासक्रमाप्रमाणे त्याच्या विचारशक्तीला व ग्रहणशक्तीला गती देणे, कार्यक्षम करणे हे महाविद्यालयांचे प्रमुख कार्य असते. या कार्याबरोबरच विद्यार्थ्यांमध्ये सहकार्याची भावना निर्माण करणे, त्यांच्या अंगातील सुप्त गुणांचे संवर्धन करणे, जीवनविषयक मूलभूत निष्ठा त्यांच्या मनात तीव्र करून त्याना समाजोन्मुख करणे हीही कार्ये शैक्षणिक कार्याबरोबरच ओघाने महाविद्यालयाला करावी लागतात. महाविद्यालयीन जगतात आज यासंबंधी एक प्रकारची जी उदासीनतेची, नैराश्याची भावना पसरली आहे, त्याची आमच्या महाविद्यालयाला यत्किंचितही बाधा झाली नाही, यासारखी दुसरी आनंददायक घटना नाही. स्नेहसंमेलन, क्रीडास्पर्धा, मोठमोठे अन्य समारंभ इत्यादी प्रसंगी आमच्या विद्यार्थ्यांनी संयमाने, शिस्तीने, एकजुटीने व आस्थेने कार्यक्रमांचे नियोजन केले व ते यशस्वी रीत्या पार पाडले. विद्यार्थि-प्राध्यापक घनिष्ठ संबंध प्रस्थापित व्हावेत यासाठी आमचे महाविद्यालय सततप्र यत्नशील आहे. प्रत्येक वर्गासाठी दोन प्राध्यापकांची वर्गपालक (Class Guardians) म्हणून योजना, 'स्वाध्याय'च्या तासांची कसून कार्यवाही, प्रत्येक विद्यार्थ्याच्या सर्व तऱ्हेच्या प्रगतीची अद्ययावत व काळजीपूर्वक ठेवलेली नोंदवही (Progress Register), प्राध्यापकांनी उत्साहाने अनेक उपक्रम अंगावर घेऊन त्यांसाठी अनेक प्रसंगी रात्रंदिवस केलेली धडपड, इत्यादी अनेक वैशिष्ट्ये आमच्या महाविद्यालयाने उरी बाळगलेल्या एकाच विश्वासाच्या द्योतक आहेत, तो विश्वास म्हणजे शिस्तीचा, आणि सेवेचा. शिस्त आणि सेवाभाव यांखेरीज कोणत्याही समाजाचा तरणोपाय

नाही अशीच आमची ठाम भावना आहे. शिस्तीच्या जाणिवेखेरीज दिले–घेतले गेलेले शिक्षण कुठे तरी अपुरे पडते आणि असे शिक्षण हे भावी अराजकाची नांदी ठरते. या शिस्तीने आणि संघभावनेने महाविद्यालय याच प्रकारे निष्ठेने वाटचाल करू इच्छिते. आमचे विद्यार्थी या वाटचालीत अग्रेसर राहतील यात आम्हांला कसलीच शंका नाही.

**उत्साहवर्धक 'पाहणी' व इतर घटना**

आमच्या विद्यार्थ्यांच्या महाविद्यालयावरील प्रेमाचे प्रत्यंतर गेल्या वर्षी महाविद्यालयाने केलेल्या 'पाहणी' मध्ये फार चांगल्या रीतीने दिसून आले.

साहित्य, शास्त्र व वाणिज्य या तिन्ही शाखांतील विद्यार्थी गेल्या वर्षी पदवीपरीक्षेच्या उंबरठ्यावर असताना, चार वर्षांच्या त्यांच्या महाविद्यालयीन अनुभवांची एक 'पाहणी' घेण्यात आली. विद्यार्थ्यांना त्यांच्या महाविद्यालयीन जीवनाशी संबंधित अशा घटकांबद्दल एक विस्तृत प्रश्नपत्रिका देण्यात आली व त्यांना मोकळेपणाने आपले अनुभव व्यक्त करण्याचे आवाहन करण्यात आले. या 'पाहणी'मध्ये विद्यार्थ्यांनी व्यक्त केलेली मते पाहून महाविद्यालयाला एक नवा हुरूप आला. बहुतेक साऱ्या विद्यार्थ्यांनी या महाविद्यालयातील शिस्तीच्या वातावरणाबद्दल समाधान व्यक्त केले व त्याबद्दल प्रशंसोद्गार काढले. महाविद्यालयाने आपले शिस्तीचे व एकोप्याचे वातावरण टिकविण्याची आवश्यकता साऱ्यांनीच प्रतिपादिली. त्यांनी काही महत्त्वाच्या अशा सूचनाही केल्या. या सूचना ग्रंथालयाच्या, व इतर अत्यावश्यक गोष्टींसाठी, मुख्यतः इमारतवाढीच्या, होत्या. या सूचनांचा महाविद्यालय जरूर विचार करील; व शक्य तितक्या त्वरेने त्या अमलात आणण्यासाठी प्रयत्नशील राहील, यात शंका नाही.

महाविद्यालयाच्या माजी विद्यार्थी संघटनेच्या कार्यास यंदा मिळालेली गती व माजी विद्यार्थ्यांचा २ मार्च रोजी भरलेला मेळावा, 'पंचायती राज्य' योजनेसंबंधाने घेतलेले शिबिर, व गणित विभागाने पदवीवर्गातील विद्यार्थ्यांसाठी भरविलेले मार्गदर्शक शिबिर, विद्यार्थ्यांनी पुढाकार घेऊन रोट्रॅक्टतर्फे चालविलेली एस्. एस्. सी. विद्यार्थ्यांसाठी व्याख्यानमाला व शिक्षक दिनानिमित्त विद्यार्थ्यांनी व्यक्त केलेली प्राध्यापकांबद्दलची आत्मीयता, प्रा. संगोराम यांनी चालविलेला व्याकरणविषयक अभ्यासवर्ग व तिन्ही शाखांनी अहमहमिकेने काढलेली एकापेक्षा एक आकर्षक अशी भीत्तिपत्रके अशा कितीतरी उत्साहवर्धक घटनांच्या आठवणी डोळ्यांसमोर तरळू लागतात. संबंधित विद्यार्थ्यांचे व प्राध्यापकांचे त्यांबाबतीत जितके कौतुक करावे तितके थोडेच, असे म्हटले पाहिजे.

**प्राध्यापक–ज्ञानपीठ**

सातत्याने उपक्रमशील राहणे व 'नित्य नवा दिस जागृतीचा' या अनुभवाला जागणे, यातच उच्च शिक्षणाच्या यशस्वितेची बिजे आहेत. आमच्या महाविद्यालयाला त्याची चांगली जाण आहे. आमच्या 'प्राध्यापक–ज्ञानपीठ' या प्राध्यापकांच्या संघटनेने प्राध्यापकांच्या ज्ञानलालसेची जोपासना निष्ठेने करण्याचे व्रत घेतले आहे. आपापल्या विषयांतील नव्या संशोधनाच्या, नव्या विचाराचा आविष्कार या संघटनेच्या अभ्यासपूर्ण व्याख्यानांतून होतो. गेल्या चार वर्षांत मिळून अशा एकूण ३३ निरनिराळ्या विषयांवर अभ्यासपूर्ण व्याख्याने व चर्चा या मंडळाने घडवून आणल्या आहेत. खुल्या विषयावर सर्वांगीण चर्चा, नव्या पुस्तकांवर परिसंवाद व चर्चा, निरनिराळ्या विषयांतील बाहेरच्या तज्ज्ञ व्यक्तींना पाचारून ज्ञानपीठातून त्यांची भाषणे घडवून आणणे इत्यादी उपक्रमांतून प्राध्यापक आस्थेने व अगत्याने भाग घेताना दिसतात.

**अभिनंदन** महाविद्यालयातील 'मराठी' या विषयाचे प्राध्यापक डॉ. वि. भा. देशपांडे यांना त्यांनी लिहिलेल्या 'पौराणिक आणि ऐतिहासिक नाटकांतील प्रमुख व्यक्तिरेखा' या विषयावरील प्रबंधाबद्दल शिवाजी विद्यापीठाने पीएच. डी. ही पदवी दिली. तसेच 'अर्थशास्त्र' या विषयाचे प्राध्यापक अशोक पाथरे यांनी नाविक दल विभागाचे छात्रसेनाधिकारी-प्रशिक्षण यशस्वीरीत्या पुरे करून ते छात्रसेनेचे काम पाहू लागले. या दोन्ही सहकाऱ्यांचे हार्दिक अभिनंदन !

**स्वागत** यंदाच्या वर्षी खालील व्यक्तींची महाविद्यालयात नव्याने नेमणूक झाली. त्यांचे आम्ही मनःपूर्वक स्वागत करतो.

(१) सौ. मीरा मराठे (इंग्रजी विषयाच्या व्याख्यात्या)
(२) श्री. पां. ग. जोशी व श्री. प्रजापती (संख्याशास्त्र विषयात अर्धवेळ व्याख्याते)
(३) श्री. वि. ज. यादव (रसायनशास्त्र प्रयोगनिरीक्षक)
(४) कु. नयना गोखले (जीवशास्त्र प्रयोगनिरीक्षक)
(५) श्री. सु. श्री. लाहोटी (भौतिकशास्त्र प्रयोगनिरीक्षक)
(६) कु. ज्योती गोडबोले (भौतिकशास्त्र अर्धवेळ प्रयोगनिरीक्षक)
(७) श्री. रवींद्र गुर्जर (वाणिज्य विभागात फेलो)
(८) श्री. शाम वाघ (वाणिज्य विभाग फेलो)
(९) सौ. हेमा लेले ('मराठी' या विषयात फेलो)
(१०) कु. मंगला जाधव ('मराठी' या विषयात फेलो)

तृतीय वर्ष वाणिज्य विद्यार्थ्यांना Cost Accounting हा विषय शिकविण्यासाठी प्रा. गलगली यांना अर्धवेळ प्राध्यापक म्हणून पाचारण करण्यात आले होते.

**निरोप व शुभेच्छा** खालील व्यक्ती या वर्षी नोकरी सोडून गेल्या. त्यांना आम्ही त्यांच्या भावी जीवनात शुभेच्छा व्यक्त करतो.

(१) सौ. आश्विनी जोशी (गणित-अर्धवेळ व्याख्यात्या)
(२) कु. जयलक्ष्मी कुलकर्णी (जीवशास्त्र प्रयोगनिरीक्षक)
(३) श्री. रा. ना. देशपांडे (रसायनशास्त्र प्रयोगनिरीक्षक)
(४) श्री. ज. कृ. रानडे (भौतिकशास्त्र प्रयोगनिरीक्षक)

**नव्या विषयाची सुरुवात** येत्या वर्षापासून महाविद्यालयाने पदवी-परीक्षेसाठी 'भूगोल' (स्पेशल) हा विषय शिकविण्याची सोय केली आहे.

**स्वागतार्ह घटना** महाराष्ट्राच्या शैक्षणिक जीवनावर फार मोठा परिणाम करणाऱ्या दोन महत्त्वाच्या घटना यंदापासून घडत आहेत. त्या म्हणजे शासनाने 'विद्यापीठ विधेयका'नुसार महाराष्ट्रातील साऱ्या विद्यापीठांच्या क्षेत्रात आणलेली सुसूत्रता आणि नव्या शैक्षणिक आकृतिबंधानुसार उच्च माध्यमिक शिक्षणक्रमाची केलेली सुरुवात. या दोन्ही घटना स्वागतार्ह असून त्यामुळे शिक्षणाच्या क्षेत्रात इष्ट ते परिवर्तन घडून यावे, अशी अपेक्षा आहे.

नव्या विद्यापीठ विधेयकानुसार पुणे विद्यापीठाचे कुलगुरू म्हणून प्राचार्य देवदत्त दाभोलकर यांची झालेली निवड ही अतिशय संतोषजनक घटना आहे. शिक्षकाचा 'वसा' घेऊन निष्ठेने आयुष्यभर त्याची जोपासना करणारा एक तज्ज्ञ शिक्षक आणि सामाजिक प्रबोधनाचा ध्यास घेऊन मूलगामी समाजरचनेची स्वप्ने पाहाणारा एक ध्येयवादी समाजचिंतक म्हणून दाभोलकर ख्यात आहेत. ज्याच्या पाठीमागे शिक्षक आणि विद्यार्थी उभा असतो, त्याला आजच्या शिक्षणक्षेत्रातील अनेक प्रकारच्या बिकट समस्या सोडविण्यात यश येणे अपरिहार्य ठरते. दाभोलकरांना आमच्या हार्दिक शुभेच्छा.

**आभार**

महाविद्यालयाच्या पाचव्या वर्षाचा हा पाचवा अंक. त्यांचे संपादन सातत्याने पाच वर्ष करता आले, याचा मला आनंद वाटतो.

या अंकासाठी महाराष्ट्र राज्य शासनाने स्वस्त दरात कागद पुरविल्यामुळे या वाढत्या महागाईतही अंक नेहमीइतकाच काढणे शक्य झाले आहे. कल्पना मुद्रणालयाचे संचालक श्री. लाटकर यांनी नेहमीच्या आस्थेने हा अंक आकर्षक रीतीने उभा केला आहे. त्याच्या उभारणीमध्ये प्राचार्य लिमये यांचे सदैव मार्गदर्शन लाभले आहे. डॉ. परांजपे, प्रा. दातार, प्रा. संगोराम, प्रा. पुंडे, प्रा. गोखले, ग्रंथपाल श्री. बापट, कार्यालय अधीक्षक श्री. देशपांडे व त्यांचे सहकारी श्री. भुपेंद्र दोशी यांनी अनेक तऱ्हेने या अंकाच्या सिद्धतेस हातभार लावला आहे. अंकाचे मुखपृष्ठ तृतीय वर्ष वाणिज्य वर्गातील विद्यार्थी श्री. सतीश कदम याने उत्तम रीतीन तयार केले आहे व त्याची छपाई 'नंदादीप' ने चांगल्या रीतीने केली आहे.

या साऱ्यांचे मनःपूर्वक आभार.

*भीमराव कुलकर्णी*

---

## लागोपाठ दोघांना डॉक्टरेट !

नंदाखाल ( वसई ) येथील धर्मगुरू फा. एलायस बी. रॉड्रिग्ज यांना त्यांच्या "बायबलचे मराठी अवतार" या संशोधनप्रबंधाबद्दल फेब्रुवारी '७५ मध्ये पुणे विद्यापीठाने पीएच. डी. ही पदवी दिली.

नगर महाविद्यालयातील मराठीचे प्राध्यापक केशव सीताराम कऱ्हाडकर यांना त्यांच्या "बाबा पदमनजी : काल व कर्तृत्व" या संशोधनप्रबंधाबद्दल मार्च '७५ मध्ये पुणे विद्यापीठाने पीएच. डी. ही पदवी दिली.

या दोघांनी डॉ. **भीमराव कुलकर्णी** यांच्या मार्गदर्शनाखाली संशोधन केले होते. महिन्याभरात लागोपाठ दोघांना डॉक्टरेट मिळण्याचा हा दुर्मिळ योग आहे! हार्दिक अभिनंदन.

**प्राचार्य**

ATLAS STEEL

**Furniture and Office Equipment**

STOCKIST

# ATLAS AGENCY

80/25, NANA PETH, Opp. Y. M. C. A. POONA 411 002

Factory

**ATLAS STEEL ERA**
95 A, Shankarseth Road,
POONA-411 009

Phone : 25967

Factory

**ALLIED FURNITURE**
Plot No. 20,
Mangalwar Peth, Barne Road,
POONA-411 011

Phone : 23339

# विद्यापीठ परीक्षांतील उज्ज्वल यश



सौ. हेमा लेले

**अत्युच्च यश : पाच पारितोषिके व सुवर्णपदक**

**तृतीय वर्ष साहित्य ‘ मराठी ’ या विषयात विद्यापीठात सर्वप्रथम**

( १ ) श्री. एल्. एल्. लागू पारितोषिक
( २ ) कृष्णशास्त्री गोडबोले पारितोषिक
( ३ ) श्रीमती रंगूबाई भास्करराव व सावित्रीबाई जावडेकर पारितोषिक
( ४ ) देवल–आगरकर–आपटे पारितोषिक
( ५ ) डॉ. पु. ग. सहस्रबुद्धे पारितोषिक
( ६ ) दिल्ली महाराष्ट्रीय समाज सुवर्णपदक



**रवींद्र गुर्जर**
तृ. व. वाणिज्य प्रथम वर्ग
‘ ॲडव्हान्स कॉस्टिंग ’ मध्ये
विद्यापीठात प्रथम व पारितोषिक



**कु. नीलिमा गोडसे**
पदवीपूर्व शास्त्र परीक्षेत
विद्यापीठात सातवी व सर्व
पदवीपूर्व परीक्षांत आठवी



**कु. पद्मजा पेंढारकर**
पदवीपूर्व साहित्य प्रथम वर्ग
विद्यापीठात सातवा क्रम

# क्रीडा–क्षेत्रातील उज्ज्वल यश



**श्रीरंग इनामदार**
महाराष्ट्र राज्य खोखो संघ
कर्णधार



**गिरीश दंडे**
महाराष्ट्र राज्य
खोखो खेळाडू



**अतुल जोशी**
विद्यापीठ संघ :
खोखो खेळाडू



**कु. भारती शहा**
बॉल बॅडमिंटन राष्ट्रीय स्पर्धा
महाराष्ट्राची कर्णधार

# प्रथम श्रेणीचे मानकरी



कु. प्रतिभा कान्हेरे (सौ. हुल्याळकर)
तृ. व. वाणिज्य



कु. लता कुबेर
तृ. व. वाणिज्य



कु. संध्या साठे
तृ. व. वाणिज्य



शाम वाघ
तृ. व. वाणिज्य



जयंत अभ्यंकर
तृ. व. वाणिज्य



दिलीप नाईक
तृ. व. वाणिज्य



हेमंत बेरी
तृ. व. वाणिज्य



प्रकाश साबडे
प्रथम वर्ष शास्त्र



भास्कर अगवण
प्रथम वर्ष शास्त्र



कु. सरिता गोऱ्हे
प्रथम वर्ष शास्त्र



कु. ज्योती कुलकर्णी
पदवीपूर्व साहित्य



कु. मेधा टेंबे
पदवीपूर्व साहित्य



कु. सुशीला शेवाळे
पदवीपूर्व साहित्य



कु. सुचिता तगारे
पदवीपूर्व वाणिज्य

# प्रथम वर्ष शास्त्र : प्रथम वर्ग



विनायक छत्रे



ज्ञानेश्वर दांगट



श्रीनिवास पुरंदरे



संजय भोमे



शरद अग्निहोत्री



वसंत दगडे



राममोहन जक्का



चंद्रकांत खुटाळे



नामदेव ओम्बसे



दीपक पढेर



सुधीर पांडे



हेमंत राजहंस



चंद्रशेखर पाटील



अजित कटांबळे



जयंत पुजारी

## पदवीपूर्व शास्त्र : प्रथम वर्ग


कु. उर्मिला रणदिवे


कु. शोभा आवटे


कु. प्रज्ञा भागवत


कु. माधुरी येडकर


कु. वीणा देशपांडे


प्रकाश बनसोड


शंकर चौगुले


राजेंद्र अरगडे


तुषार देशपांडे


जगदीश मोघे


अजय ब्रह्मे


प्रदीप महाजन


दिलीप चौधरी


बी. एस्. जगताप

# पदवीपूर्व वाणिज्य : प्रथम वर्ग


अविनाश ओगले


अविनाश ठकरार


भानुदास धाकस


धनंजय ताटके


चारुदत्त बागूल


कु. संजीवनी हसबनीस


कु. स्मिता रानडे


कु. शोभा नगरकर


कु. भारती लोहोकरे


कु. मेधा द्रवीड


माधव पोळ


संजीव बसरेकर


दत्ता जगताप


मुकुंद गाडगीळ


गंगाधर कुलकर्णी

# शास्त्र-संघटना



डावीकडून : (१) श्री. संघवी (२) श्री. गंधे (३) प्रा. रायरीकर (४) प्रा. काशीद (५) प्राचार्य लिमये (६) डॉ. भीमराव कुलकर्णी (७) प्रा. बर्वे (८) श्री. पी. डी. कुलकर्णी (९) श्री. नाईक.
दुसरी रांग उभे राहिलेले : (१) श्री. शेंडकर (२) श्री. मोकाशी (३) श्री. रामपाल (४) कु. गोऱ्हे (५) कु. कृष्णकुमारी (६) कु. निकम (७) श्री. देशमुख (८) श्री. होले (९) श्री. जाधव.

## क्रीडा-संघटना : विशेष नैपुण्य : प्राविण्य विजेते



**डावीकडून : पहिली रांग (बसलेले) :** (१) श्री. किरण लागू (२) प्रा. आपटे (३) प्राचार्य लिमये (४) उपप्राचार्य डॉ. कुलकर्णी (५) प्रा. गंभीर (६) श्री. रवींद्र गुर्जर
**दुसरी रांग (उभे राहिलेले) :** (१) श्री. प्रकाश भावसार (२) श्री. ओगले (३) कु. नीता भट (४) कु. पद्मिनी जोगळेकर (५) कु. यशोधरा भालेराव (६) कु. मेधा टेंबे (७) कु. पेंढारकर (८) कु. कारखानीस (९) कु. नीलीमा गोडसे (१०) श्री. कुलकर्णी (११) श्री. मोहन किणीकर
**तिसरी रांग :** श्री. नरवडे (२) श्री. शेटे (३) श्री. शिंत्रे (४) श्री. पी. डी. पाटील (५) श्री. पासलकर

## साहित्य-संघटना ( Arts Association )



डावीकडून उजवीकडे बसलेले : ( १ ) प्रा. कु. वर्दे ( २ ) प्रा. मुकुंद महाजन ( ३ ) प्राचार्य लिमये ( ४ ) उपप्राचार्य डॉ. भीमराव कुलकर्णी ( ५ ) प्रा. सौ. गडकरी

दुसरी रांग : ( १ ) श्री. पवार ( २ ) श्री. शितोळे ( ३ ) श्री. कुलकर्णी ( ४ ) कु. स्मिता देशपांडे ( ५ ) श्री. दरेकर ( ६ ) श्री. देशपांडे ( ७ ) श्री. पासलकर

## वाणिज्य-संघटना ( Commerce Association )



डावीकडून ( खुर्चीवर ) : ( १ ) कु. पद्मा जोगळेकर ( २ ) डॉ. सौ. मित्रा ( ३ ) प्रा. एन. एफ. कर्नावट (४) प्राचार्य लिमये (५) डॉ. भीमराव कुलकर्णी (६) प्रा. अ. गो. गोसावी (७) कु. छाया जोगळेकर

मागे उभे : ( १ ) श्री. पवार ( २ ) श्री. हेमंत अलबल ( ३ ) श्री. सुरेश पारिक ( ४ ) कु. यशोधरा भालेराव ( ५ ) श्री. रमण सोळंकी ( ६ ) श्री. प्रकाश भावसार ( ७ ) श्री. होले

# क्रीडा-संघटना व्यवस्थापन समिती ( Gymkhana Managing Committee )



**पहिली रांग ( डावीकडून उजवीकडे ) :** ( १ ) श्री. श्रीरंग इनामदार I.C.S.R ( Gents ) ( २ ) श्री. किरण लागू ( ३ ) प्रा. पुंडे ( ४ ) प्रा. काशीद ( ५ ) प्रा. पाथरे ( ६ ) प्रा. धायगुडे ( ७ ) प्रा. रायकर ( ८ ) प्रा. आपटे ( ९ ) प्राचार्य लिमये (१०) उपप्राचार्य डॉ. कुलकर्णी (११) प्रा. गंभीर (१२) प्रा. म. आ. कुलकर्णी (१३) प्रा. संगोराम (१४) प्रा. नातू (१५) डॉ. वि. भा. देशपांडे (१६) प्रा. गोसावी (१७) श्री. शिंदे (१८) कु. भारती शहा I.C.S.R. (L.)

**दुसरी रांग ( डावीकडून उजवीकडे ) :** ( १ ) श्री. पुरोहित ( २ ) श्री. शिंदे ( ३ ) श्री. तडवळकर ( ४ ) श्री. दरेकर ( ५ ) कु. शैला तेलंग ( ६ ) कु. मेधा टेंबे ( ७ ) कु. गीता पारखी ( ८ ) कांडगे ( ९ ) विजय भगत (१०) रवींद्र कुंभार (११) एन. के. गोळे (१२) बाळ सुब्रह्मणम्.

**तिसरी रांग :** श्री. पवार ( शिपाई ) श्री. बडद ( शिपाई )

# आंतरमहाविद्यालयीन क्रीडा-स्पर्धा : व्हॉलीबॉल ( महिला ) अजिंक्य संघ



**पहिली रांग ( बसलेले ) डावीकडून उजवीकडे :** ( १ ) कु. भारती शहा I.C.S.R.(L.) ( २ ) श्री. किरण लागू ( शा. शि. प्रमुख ) ( ३ ) प्रा. पाथरे ( ४ ) प्रा. आपटे ( ५ ) प्राचार्य लिमये ( ६ ) उपप्राचार्य डॉ. कुलकर्णी ( ७ ) प्रा. गंभीर ( ८ ) प्रा. गोसावी ( ९ ) श्री. श्रीरंग इनामदार (I.C.S R.(G)

**दुसरी रांग :** ( १ ) श्री. बडद ( २ ) श्री. जाधव ( ३ ) कु. सुधा हुद्दार ( ४ ) कु. जयश्री करंदीकर ( ५ ) कु. संजीवनी पतकी ( ६ ) कु. भारती बनबेरू ( ७ ) कु. नीता भट ( ८ ) श्री. पवार ( ९ ) श्री. शेंडकर

# छात्रसेना–शारीरिक शिक्षण–राष्ट्रीय सेवा योजना
## NCC–PT–NSS ( विशेष कार्य व नेतृत्व )



**डावीकडून उजवीकडे ( बसलेले ) :** श्री. लागू ( २ ) प्रा. आपटे ( ३ ) उपप्राचार्य डॉ. कुलकर्णी ( ४ ) प्राचार्य लिमये ( ५ ) प्रा. गंभीर ( ६ ) प्रा. म. आ. कुलकर्णी ( ७ ) डॉ. परांजपे

**दुसरी रांग :** ( १ ) श्री. ठकरार ( २ ) श्री. निंबाळकर ( ३ ) श्री. गायकवाड ( ४ ) श्री. पानसरे ( ५ ) श्री. आगलावे (६) श्री. ढमढरे (७) श्री. बेलागडे (८) श्री. पलांडे ( ९ ) श्री. नेऊरगावकर (१०) श्री. तलवटकर (११) श्री. जैन.

**तिसरी रांग :** ( १ ) श्री. वैसास ( २ ) कु. रांजेकर ( ३ ) कु. सुमन जोशी ( ४ ) कु. विशाखा देशपांडे ( ५ ) कु. जोशी ( ६ ) कु. विनीता बापट ( ७ ) कु. जयश्री नाटेकर ( ८ ) कु. पित्रे ( ९ ) श्री. भिडे (१०) श्री. पुरोहित.

**शेवटची रांग :** (१) बडद (२) पवार (३) पासलकर (४) मुनोत (५) आपटे (६) कदम (७) होले.



←
**श्री. सुहास शेटे**
द्वि. व. शास्त्र
मुलांचे वैयक्तिक विजेतेपद



→
**श्री. अविनाश ठकरार**
प्र. व. वाणिज्य
'सर्वोत्तम विद्यार्थी' म्हणून
'दामोदर' ढालविजेता

## बॉस्केटबॉल--महिला संघ : आंतरमहाविद्यालयीन उपविजेतेपद



**पहिली रांग डावीकडून उजवीकडे ( बसलेले ) :** ( १ ) कु. भारती शहा I. C. R. S. ( Ladies ) ( २ ) कु. शैला तेलंग ( ३ ) प्रा. आपटे ( ४ ) प्राचार्य लिमये ( ५ ) उपप्रायार्य डॉ. कुलकर्णी ( ६ ) प्रा. गंभीर ( ७ ) श्री. किरण लागू ( ८ ) श्रीरंग इनामदार I.C.S.R. ( Gents )

**दुसरी रांग ( डावीकडून उजवीकडे ) :** ( १ ) अंजली भरते ( २ ) कु. अनीता पेंडसे ( ३ ) कु. नीलीमा वागळे ( ४ ) कु. माधुरी साठे ( ५ ) कु. सुवर्णा कुंभार ( ६ ) कु. गीता पारखी ( ७ ) कु. मेघा रेगे ( ८ ) कु. शीला बोडके

**तिसरी रांग :** ( १ ) श्री. होले ( २ ) श्री. कदम ( ३ ) श्री. बडद ( ४ ) श्री. पवार



**प्रा. अशोक पाथरे**
नाविकदल छात्रसेनाधिकारी



**डॉ. वि. भा. देशपांडे**
पीएच्. डी. पदवी मिळविली



( १ ) स्नेहसंमेलनाचे प्रमुख पाहुणे श्री. राहुलकुमार बजाज बोलत असताना.
( २ ) प्राचार्यांचे भाषण. शेजारी श्री. इनामदार (ICSR), श्री. बजाज, सौ. रुपा बजाज व कु. भारती शहा (ICSR)



**डावीकडे :** महाविद्यालय क्रीडादिनाचे प्रमुख पाहुणे पुण्याचे पोलिस आयुक्त श्री. तनखीवाले बोलत असताना.
**उजवीकडे :** पुण्याचे महापौर भाई वैद्य हे स्नेहसंमेलनाच्या क्रीडास्पर्धा व प्रदर्शन यांचे उद्घाटन करताना.

# परवा काय झालेऽ

✣

**कु. यशोधरा भालेराव,** द्वितीय वर्ष वाणिज्य

हं! तर काय सांगत होते बरं ऽ ... परवा काय झालं... मला सकाळी सकाळीच खूऽऽप कंटाळा आला होता. खरं तर उठायचाच कंटाळा आला होता. कॉलेजला दांडी मारायचा विचार हळूच चोरासारखा मनात डोकावून गेला होता. सबंध नाही पण निदान पहिले एकदोन periods तरी ... पण कसचं काय अन् कसचं काय! एकदम गजर सुरू झाला, बंद करणंही शक्य नव्हतं. म्हणजे त्याचं काय आहे? गजर घड्याळाचा असतो तेव्हा पटकन बंद करता येतो, पण हा गजर म्हणजे ऽऽ आमच्या मातोश्री हो! एकदम ग्रेट! बाकी तुमच्या मातोश्रींचा अनुभव तुम्हालाही असेलच म्हणा! एकदा सुरुवात झाली — 'गौरी ऽ जागी झालीस का' एखादे मिनिट जाते न जाते तोच — गेली का बाकी तुझी झोप? — मी उठून दिवा लावेपर्यंत — १० मिनिटे जाऊ देत किंवा १५, गणती नाही, शेवटचे वाक्य बहुधा ठरलेलं, 'दीदे; गाढवे उठलीस की नाही अजून?' मग कसली झोप अन् कसली दांडी! झोपेचा विचका तर झालेलाच असतो. मग कोणी सांगितलं आहे दांडी मारा अन् घरातली कामं करीत बसा. त्याच्यापेक्षा चटपट आवरून कॉलेजला जावं हे उत्तम! नाहीतरी कॉलेज बुडविणे चांगले नव्हेच असा उदात्त विचार करून अस्मा दिकांनी कॉलेजकडे मोर्चा वळविला. कॉलेजच्या 'कॉरिडर्स' मध्ये तर चिटपाखरूसुद्धा दिसत नव्हते. अरे देवा! म्हणजे पुन्हा रोजच्यासारखा उशीरच का? उद्यापासून अगदी नक्की वेळेवर यायचं असा (रोजच्या सारखाच) निश्चय करून मी वर्गात प्रवेश केला. जी काय दहा-पाच मिनिटं होती ती चुटकीसरशी संपली. आला दुसरा period.

"ए, ...सुजाता आहे?" मी वेंधळ्यासारखी सगळीकडे पाहू लागले...सुजाता? आत्ता इथं कुठं आली? मला कशी दिसत नाही! मी तर दाराशीच बसले आहे तरी मला दिसत नाही. "ए कुठंय ग?" डेस्काच्या खालून एक चिमटा, "ए! येणार का, सांग ना?" हात चांगलाच हुळहुळतोय. स्स्स...! 'अगं पिक्चरला गं. सुजाता आहे" "आणि आजपर्यंत तू मला एकदासुद्धा सांगितलं नाहीस सुजातानं सिनेमात काम केलं आहे म्हणून!"

"गोखले इन्स्टिट्यूटमध्ये आहे." आता मी चक्रावले.

"गोखले इन्स्टिट्यूटमध्ये? सुजाता आहे का पिक्चर-आहे? आणि सुजाता असली तर ती तिथं काय करतीय? का सुजाता पिक्चरमध्ये आहे?" पुन्हा गोंधळ.

अगं गोखले इन्स्टिट्यूटमध्ये 'सुजाता' नावाचं पिक्चर आहे — आपल्या युवकतर्फे."

"अन् फस्स्स ऽऽऽ! गॅसवर दूध ऊतू गेल्यासारखं आमचं हसू फसफसलं!

वर्गात पिन् ड्रॉप सायलन्स. आम्हाला पत्ताच नाही.

"Yes Miss .... What's the mattet? Why are you not attending? Why are yoy laughing?" मी उभी. "I am extremely sorry Sir. Now I'll pay more attention."

"Yes Miss.... What have you to say?" तीही मुखस्तंभासारखी उभी.

"Leave the Class!" मी सामान आवरायला सुरुवात केली, पण मला वाटलं He does not mean it. म्हणून वर पाहिलं, तोच 'Get Out!' माझ्या लक्षात आलं He means it. पटकन चंबूगबाळं आवरून मैत्रिणीचा हात हातात घेऊन चेहऱ्यावर प्रयत्नपूर्वक गंभीरपणाचा आव आणून वर्गाबाहेर...!

मला कसं अगदी फुलपाखरासारखं वाटलं.

झपूर्झाऽ गडे झपूर्झाऽऽ

गेलं का मंडळी 'झपूर्झा' डोक्यावरून! म्हणजे आनंदी आनंद गडे...! सहेलीच्या चेहऱ्याकडे पाहिलं — तर आपला गोरामोरा — आता हिला आणखी काय झाले? आपलं भाग्य हिला कसं कळत नाही? सर रोल घेतील म्हणून सगळा वर्ग कसा खच्चून भरलाय — आणि आपण दोघीच स्वच्छंद पाखरांसारख्या... सर्वजण हेवा करत असावेत.

आज विसाव्या शतकाचा उत्तरार्ध आहे म्हणून कित्ती बरंय? नाही तर समजा हा जर पुराणकाळ असता तर...? गुरुजी जर रागावले असते तर त्यांनी

## सदा मोहोळचा पराक्रम

लागोपाठच्या ४ चेंडूत ४ बळी घेण्याचा विक्रम २७ खेळाडूंनी केला असून त्यात महाराष्ट्राच्या सदानंद मोहोळचे नाव असून त्याने १९६५–६६ साली अल्पबचत मंत्री संघा-विरुद्ध क्रिकेट नियामक मंडळ अध्यक्षीय संघातर्फे पुणे येथे लागोपाठच्या ४ चेंडूवर ४ बळी घेतले.

संग्राहक : **चंद्रशेखर हरी तांबोळकर**
पदवीपूर्व वाणिज्य

नुसतेच काही बाहेर घालवले नसते, तर ... 'जा! वर्षाला पुरतील एवढ्या गोवऱ्या थापून ठेवा.' आणि मुलांना,— 'सुकलेल्या झाडांच्या फांद्या तोडून वर्षाच्या सरपणाची बेगमी करून ठेधा.' असं सांगितलं असतं.— आपली केवढ्या मोठ्या आपत्तीतून सुटका झालीय हे हिला कसं कळत नाही — कुणाला ठाऊक ?

मग दोघीही हातात हात घालून भटकायला बाहेर पडलो. – खरंच! किती किती दिवसांनी हे सुख अनुभवायला मिळत होते ... शाळेत असताना किती किती मजा होती. पाचवी ते अकरावी या सात वर्षात सात दिवस (का सात महिने म्हणायचं आहे बरं मला ?) तरी मी वर्गात होते की नाही हे एक बाईंना तरी माहीत नाही तर देवाला तरी.

आमच्या शाळेची situation मोठी छान हं. ग्राउंड संपल्याबरोबर टेकडी आहे ... झाडं पण बरीच! वर्गातनं हाकललं किंवा बाई कुणालाही Get Out! म्हणाल्या की आम्ही बाहेर! वर्गांना आमच्या 'फ्रेंच विंडोज.' जर बाई कोणालाच 'बाहेर जा' म्हणाल्या नाहीत तर मग आम्हीच आपणहून हळूच ... थंडीचे दिवस असले की टेकडीवर ऊन खायला नाहीतर मग झाडाच्या सावलीत – शुद्ध हवेत — कुणी बघत नाही याची खात्री करून विकत घेतलेले चिंचा, आवळे – झालंच तर मिळाले तर पेरू – बाहेर पडणार याची खात्री असल्यामुळे खिशात तिखट-मीठ तयारच असे – खाण्यात वेळ मोठा मजेत जाई. पीरियड संपल्याची घंटा झाली की फार वाईट वाटायचे. बाई दिवसभर बाहेर थांब असे का म्हणत नाहीत कधी – कोण जाणे ?

आपल्या कॉलेजजवळ अशी काहीच सोय नाही ... हो, बाहेर राजरोस पडल्यावर – (दांडी मारली नाही — त्यामुळे guilty वाटण्याचा प्रश्नच नाही.) जायला कुठली जागाच नाही. केवढी Tragedy ...! खरंच एखादी टेकडी ... निदान मोठे आवार आणि दाट झाडी-तरी ...

घड्याळात पीरियडची आठवण करून दिल्यामुळे आम्हाला फर्ग्युसनपासूनच परत फिरावे लागले. Ladies Room पाशी येतो न येतो तोच दोघीतिघींनी विचारलं, "खरंच का गं तुम्हाला सरांनी बाहेर काढलं ? काय करत होतात ?" "छे ग! नवीन काहीच करीत नव्हतो. गेलं वर्ष दीड वर्ष (खरं म्हणजे पाचवी ते अकरावीपर्यंत हीच प्रॅक्टिस चालली होती की.) जे करीत आहेत तेच. पण काय झालं ते काही कळलं नाही." आधीच्या पीरियडला कुणीतरी डोकं फिरवलं असेल सरांचं – नाहीतर आमच्या-सारख्या 'Sincere Students' ना सर असं काही म्हणतील ?

पण एवढं मात्र खरं की पुन्हा जर आमच्यावर असा अन्याय (?) झाला तर मात्र आम्ही चक्क जंगली महाराजांच्या पायाशी धरणं धरणार ...

"महाराज ...! (का आधी जंगली) आमच्या सरांना सद्बुद्धी दे. आमच्यावर असा अन्याय पुन्हा होऊ देऊ नकोस!"

'And lo! आत्ताच सर भेटले होते. ते म्हणाले – 'Miss—Why did you leave the class that day with your friend ? If you had some urgent work why didn't you ask my permission and leave ? Do you tnink I wouldn't have allowed you to go ?'

मी आश्चर्यानं जो 'आ' वासला तो अजून मिटायचा आहे.

*

# सुरांचा बादशहा गेला !

✤

**श्रीकांत कुलकर्णी** तृतीय वर्ष वाणिज्य

दिनांक १४।२।७४ ची सकाळची वेळ होती. सहज मी 'सकाळ'च्या वरील पानावर नजर टाकली आणि एक अत्यंत वाईट व दुःखदायक अशी बातमी वाचायला मिळाली. ती भयंकर बातमी वाचून मला एकदम धक्काच बसला. आणि हृदयात कालवाकालव होऊ लागली. "उस्ताद अमीर खाँ यांचे दि. १३।२।७४ रोजी कलकत्ता येथे मोटार अपघातात निधन झाले." बातमीवर माझा विश्वासच बसेना.

मला खाँसाहेबांचे गाणे ऐकण्याची संधी फक्त दोनदाच आली. प्रथम म्हणजे, दरवर्षी पुण्यास साजरी होणारी सवाई गंधर्व पुण्यतिथीच्या कार्यक्रमाचे वेळी व दुसरी म्हणजे के. ई. एम्. हॉस्पिटलच्या कार्यक्रमाचे वेळी. सुरुवातीला जेव्हा मी त्यांचे गायन सवाई गंधर्वांचे पुण्यतिथीच्या कार्यक्रमाचे वेळी ऐकले तेव्हा मला त्यांच्याविषयी विशेष अशी माहिती नव्हती. त्यामुळे ओढही नव्हती. परंतु त्या दिवशी त्यांचे गाणे ऐकल्यावर मात्र त्यांच्या गायनाविषयी विलक्षण प्रकारची ओढ वाटू लागली. सारखे सारखे त्यांनीच गायलेला राग ऐकावेसे वाटू लागले. त्यांनी त्यावेळी गायलेला राग ललत अजूनही डोक्यात घुमून राहिला आहे व याच ओढीमुळे मी पुण्यात साजऱ्या झालेल्या के. ई. एम्. हॉस्पिटलच्या कार्यक्रमाचे वेळी अत्यंत आतुरतेने गेलो आणि याहीवेळी माझी इच्छा पूर्ण झाली. त्यावेळी त्यांनी अगदी शेवटी गायन केले. परंतु सुरुवातीपासूनच माझी त्यांचे गायन ऐकण्याची आतुरता वाढतच गेली. त्यावेळी त्यांनी गायलेला मालकंस राग तसाच अविस्मरणीय असा झाला. त्यांच्या गायनातील एक अत्यंत अवघड व महत्त्वाची पद्धत म्हणजे ते एक राग संपत असता त्यातूनच लगेच दुसऱ्या रागास सुरुवात करीत असत. त्यामुळे पहिला राग केव्हा संपला व दुसरा केव्हा सुरू झाला हे श्रोतृवर्गास थोड्या वेळाने कळत असे.

खाँसाहेबांचे गायन हे आलापप्रधान असे होते. ते राग गाताना रागाची आलापी इतक्या सुंदर, रेखीव व साचेबंद पद्धतीने करीत की श्रोते त्यांच्या गायनात बेभान होत असत व त्यांना त्यातून परमानंदाचा लाभ होत असे. त्यांच्या रागात आलाप-विस्ताराची पद्धत इतकी संथ व शांत असे की, त्यामुळे मैफिलीत गाताना मंद्र सप्तकात विस्तार करून मध्य सप्तकातील गंधारापर्यंत येईपर्यंत त्यांना जवळजवळ अर्धा तास लागे. परंतु एवढा जरी वेळ लागत असला तरी प्रत्येक आलापीत वेगवेगळेपणा दिसत असे. याशिवाय त्यांचे गाणे सुरेल, साचेबंद व प्रतिभाविलासाने ओथंबलेले असल्याने ते श्रोतृवर्गास तल्लीन करून टाकीत.

प्रामुख्याने खाँसाहेब त्यांच्या आवाजाला शोभणारे व ज्या रागात आलापींना महत्त्व आहे असे राग आवडीने गात असत. त्यांचे अशा प्रकारचे अनेक राग आवडीचे होते. उदा. सकाळचे तोडी, ललत, आसावरी; सायंकाळी मुलतानी, मारवा, मीमपलास, आणि रात्रीचे दरबारी कानडा, मालकंस इ. राग होत. याशिवाय काही काही वेळा ते मेघ, मेघमल्हार, मियामल्हार वगैरे राग गात असत. तसेच बैजू बावरा, झनक झनक पायल...इत्यादी काही जुन्या हिंदी सिनेमातील गाणी प्रसिद्ध आहेत. जसे त्यांना अशा प्रकारचे राग आवडत असत तसेच तालाच्या बाबतीत त्यांना झुमरा ताल हा फार आवडत असे व ते नेहमी याच तालात गात असत.

खाँसाहेबांचा जन्म वऱ्हाडातील अकोला या शहरी (एप्रिल १९१२) झाला. त्यांनी इंदूर येथे प्रथम आपल्या वडिलांकडे गाण्याचे धडे घेतले व त्यानंतर किराणा घराण्याचे खांसाहेब वहीदखाँ यांच्या गायनाची त्यांच्यावर छाप पडली. परंतु त्यांनी खाँसाहेब वहीदखाँचा गंडा मात्र बांधला नाही. वहीदखाँकडून त्यांनी अनेक प्रकारच्या चिजा बांधून घेतल्या व त्या आपल्या पद्धतीने गायल्या. अशा रीतीने त्यांनी आपली स्वतःची अशी एक गायकी निर्माण केली.

मैफलीत राग गाताना अमीरखाँ सभोवतालचे वातावरण धुंद करून टाकीत असत. शिवाय त्यांची भारदस्त शरीरयष्टी व मुखावरील कमालीच्या शांततेमुळे त्यांची श्रोतृवर्गावर लगेच छाप पडे. त्यांची एकंदर कपड्यांची ठेवण ही साधी परंतु फारच उठावदार असे. खाँसाहेबांनी आपल्या संगीत-

[ पृष्ठ १२ वर पाहा ]

# सुखाच्या शोधात (हरवलेला) माणूस

**कु. भारती पोतनीस,** पदवीपूर्व वाणिज्य

'नरेचि केला हीन किती नर!' ही उक्ती आजच्या काळात अगदी सार्थ ठरते. माणसानेच माणसाला हीन बनविले आहे. आपल्या राष्ट्राची आजची स्थिती अतिशय कठीण आहे. प्रत्येकजण स्वतःच्या स्वार्थासाठी दुसऱ्याशी वैर करतो आहे. स्वतःच्या विवंचनेत जो तो आहे. दुसऱ्याची काळजी करण्यास कोणासच वेळ नाही. ही सध्याची स्थिती माणसाने आपल्या हातानेच करून घेतली आहे.

फार पूर्वी आमच्या देशात जी संस्कृतीची मंदिरे आम्ही उभारली, जे पावित्र्याचे, मांगल्याचे स्थान आम्ही मनात स्थापिले त्याची आता चिरफाड झाली आहे. ज्या सद्गुणांनी हृदयात वास करून आम्हांस एकात्मतेची, ऐक्याची भावना शिकवली ते सद्गुण आता आमच्यातून निघून गेले आहेत. आता त्यांची जागा अंधकार माजलेल्या या देशातील व्यभिचार, भ्रष्टाचार यासारखे दुर्गुण येऊ पाहतात. परंतु आम्ही हे विसरलो की ज्या सद्गुणांनी आम्हांस सुखाच्या विलासात रमू दिले ते कोठे गेले?

आता त्यांची आम्हांस गरजच उरली नाही. आम्ही आता निष्क्रिय बनलो आहोत. आम्हांस फक्त सुखसोयीच पूर्वीचा तो विलास दिसत आहे व तो प्राप्त करण्यास आम्ही धडपडत आहोत. ज्या काटेरी मार्गाने तो आनंद, तो विवेक, ती संस्कृती जोपासली गेली व जेथे आम्ही आमच्या मांगल्याचे सुवासिक गुलाब उधळले तो मार्ग आता नष्ट झाला आहे. मानव आता खोट्या सुखाच्या अत्युच्च शिखरावर चढण्याचा प्रयत्न करीत आहे. त्या धडपडीत तो इतरांस विसरत आहे.

समाजाने जी बंधने, जी संस्कृतीची मंदिरे उभारली त्यांची आम्ही धूळधाण करीत आहोत. कारण सध्या आमचे दैवत आहे पैसा व त्या दैवतासाठी आम्ही किती अधमपणाच्या मार्गाने जात आलो हे आमचे आम्हांसच कळले नाही. कारण आमचे ध्येय आहे 'परम सुख' व ते आम्ही कोणतीही किंमत देऊन मिळवणार आहोत.

जन्माला आल्यापासून सुखासाठी धडपड करणे हा मानवाचा जन्मजात स्वभाव असताना जन्मभर अविरत कष्ट करूनही त्याला शेवटी दुःखी अवस्थेत का बरे मरण यावे? सुखासाठी प्रयत्न करीत असतानाही दुःखाची प्राप्ती का व्हावी? जर कोणी एखाद्या गोष्टीबद्दल भरपूर प्रयत्न करीत असेल आणि तरीसुद्धा त्याला त्या गोष्टीत यश मिळत नसेल तर समजावे की, त्याचा प्रयत्न करण्याचा मार्ग चुकला आहे.

विमानाने पुणे ते मुंबई कोणी निघाला आणि हजारो मैल चालवूनही जर मुंबई दिसत नसेल तर निश्चितपणे समजावे की विमानाची दिशा चुकलेली आहे. म्हणूनच "सुखासाठी प्रयत्न करून सुद्धा मानवाला जर दुःखाचीच प्राप्ती होते तर नक्कीच मानवाचा सुखप्राप्तीचा मार्ग चुकत असला पाहिजे."

आणि खरोखरच मानवाचा मार्ग चुकला आहे. परंतु याही स्थितीत आम्ही आशेचा किरण शोधतो आहोत. कारण अखेर देव-दानवांचे निर्माते आम्ही मानवच आहोत. सुखदुःखकर्ते आम्ही मानवच आहोत. म्हणूनच आम्ही आता चुकलेले पाऊल वाटेवर आणणार आहोत. कारण या जगातही एक कोपऱ्यात देवत्व वसले आहे. तेथील दातृत्व अद्यापही चिरकाल स्थापित आहे आणि म्हणूनच गोंगाटाच्या या दुनियेत अजूनही कोठेतरी संस्कृतिरूपी देवालयात मानवत्वाची घंटा वाजते आहे.

---

**सुरांचा बादशहा गेला!** पृष्ठ ११ वरून

साधनेच्या जोरावर अशी एक उंची निर्माण केली होती की, त्या उंचीकडे पाहात पाहातच अनेक नवीन नवीन गायकांना त्यापासून स्फूर्ती मिळावी.

के. ई. एम्. हॉस्पिटलचा कार्यक्रम ऐकल्यावर लगेच महिन्याभरात अशा प्रकारची दुःखद बातमी ऐकायला मिळेल अशी कल्पनासुद्धा नव्हती. यापुढे त्यांची मैफल कधीही ऐकायला मिळणार नाही, या नुसत्या कल्पनेनेच मन भारावून जाते. रेडिओवर त्यांचा कधी दरबारी कानडा किंवा ललत राग लागला की त्यांची ती भारदस्त मूर्ती डोळ्यासमोर उभी राहाते व नकळतच डोळ्यात आसवे उभी राहातात. त्यांना ही माझी भावपूर्ण श्रद्धांजली......



प्रख्यात सितारनवाज उस्मानखाँ व 'तालमणी विकास'

# 'तालमणी' — विकास पुरन्दरे

✣

**श्यामन्कात सुतार,** तृ. व. वाणिज्य

का कोण जाणे, पण त्या दिवशी सकाळपासून अनेक शुभशकुन घडत होते. कोणती बातमी ऐकावयास मिळते याकडे सारखे लक्ष लागले होते. संध्याकाळी वेळात वेळ काढून अचानक विकासकडे गेलो. बेल दाबली आणि दरवाजा उघडल्याबरोबर अत्यानंदाने विकासने मला मिठीच मारली. "अरे शाम्या, हम 'तालमणी' बन गये!" आजपर्यंत केलेल्या अविश्रांत परिश्रमाचे फळ मिळाले होते. 'सूर-सिंगार' या सुप्रसिद्ध संगीत संस्थेतर्फे दरवर्षीप्रमाणे घेतल्या गेलेल्या अखिल भारतीय कॉन्फरन्समध्ये विकासला तालमणी हा मानाचा किताब बहाल केला गेला. एवढ्या मोठ्या कॉन्फरन्समध्ये अवघ्या विसाव्या वर्षी तालमणी मिळणारा हा एकटाच. एस्. वाय्. बी. कॉमचे वर्गात शिकत असलेला हा आपणा सर्वांचा आवडता कलाकार म्हणजे विकास पुरन्दरे होय.

केवळ 'तालमणी' हा किताब सुप्रसिद्ध अभिनेत्री जया भादुरीच्या हस्ते मिळवून हा कलाकार स्वस्थ बसला नाही, तर यापूर्वी एप्रिल-मे १९७४ मध्ये आंतरराष्ट्रीय कीर्तीचे सतारिये श्री. उस्ताद उस्मानखाँ यांचे समवेत तबल्याची साथ करून सिलोन-सिंगापूरचा दौरा गाजवून आला. पुण्यातील श्रेष्ठ तबलावादक पं. जी. एल्. सामंत यांच्या षष्ठ्यब्दिपूर्ती समारंभात विकासच्या तबल्याच्या प्रभुत्वावर आणि जोशी-दामले हॉलमध्ये उस्मानखाँबरोबर केलेल्या उत्कृष्ट साथीवर खूष होऊन उस्मानखाँ यांनी विकासला सिलोन-सिंगापूर दौऱ्यावर नेले आणि आता जानेवारीच्या २१ तारखेला दोघांनी पुन्हा एकदा युरोपच्या दौऱ्याची गरुडझेप घेतली. या दौऱ्यात ते स्वित्झर्लंड, जर्मनी, पॅरिस, इंग्लंड, रोम, फिलिपाईन्स, ऑस्ट्रिया, इटली, कॅनडा व अमेरिका इत्यादी ठिकाणी आपले कार्यक्रम सादर करीत आहेत.

वयाच्या १४ व्या वर्षापासून विकास गुरुवर्य जी. एल्. सामंत यांच्याकडे अजूनही शिक्षण घेत आहे. या ६ वर्षांच्या काळात, अखंड, अविश्रांत रियाज करून, तसेच सुप्रसिद्ध शहनाईवादक बिस्मिल्लाखाँचे जावई अली अब्बास यांच्यासारख्या मातब्बर कलावंताबरोबर साथ करून त्याने तबल्यावर पूर्णपणे प्रभुत्व मिळविले आहे. आतापर्यंत गोवा, इंदूर, परळी-वैजनाथ, बेळगाव, मुंबई इत्यादी ठिकाणी झालेल्या कॉन्फरन्समध्ये प्रथम क्रमांकाचा मान कित्येकदा मिळविला आहे. तसेच या वर्षी कलामंडळाचे चिटणीसपद स्वीकारून, 'जेसी संगीत स्पर्धेत' प्रथम क्रमांक पटकावून आता तो मॉडर्न महाविद्यालयाचे नाव युरोपमध्ये उज्ज्वल करीत आहे.

हा आपणा सर्वांचा लाडका कलाकार त्याच्या ध्येय शिखराकडे मोठ्या तडफदारपणे वाटचाल करीत आहे. त्याला आम्हा सर्वांच्या शुभेच्छा! ⁕

# टिळक व राष्ट्रीय उत्सव

**अंजली प्रधान,** पदवीपूर्व वाणिज्य

" शिवाजी महाराजांचे सिंहगड सर करणारे व दिवसाढवळ्या सहा दिवस खुशाल सुरत लढविणारे पठ्ठे कोणीकडे आणि रायबाजीच्या पळपुट्या लष्करातील 'ज्यासि मिळे ना भाकर अर्धी, त्यासि बसाया घोडी जर्दी ॥' अशा प्रकारचे जे एकेक 'महावीर' होते ते कोणीकडे अशी विसंगती प्रत्येक राष्ट्रात संपत्ती व ऐषाराम यामुळे दिसून येते. आपल्या भाषेत अशी म्हण आहे की, 'रानचा वारा आणि घरचा चारा' याची बरोबरी कशाने ही होणार नाही. याच न्यायाने जे राष्ट्र आरंभी भुकेकंगाल असते व ज्यास ऐषआरामाची चटक लागलेली नसते ते शूर बाणेदार अशा प्रकारचे असते. त्यास शिवाजीसारखा कोणी म्होरक्या मिळाला की पुरे! ते राष्ट्र लगेच वावटळीसारखे किंवा वणव्यासारखे उफाळून उठते." अशा आशयाचे उद्गार विष्णुशास्त्री चिपळूणकरांनी काढले आहेत. त्या काळी शिवाजीसारखा म्होरक्या टिळकांच्या रूपाने ह्या भूमीला लाभला.

सनातनी पद्धतीने पुण्यात पूर्वीपासून साजरा होत असलेला गणेशोत्सव टिळकांनी उचलून धरला आणि त्याला सामाजिक आणि राजकीय स्वरूप दिले. जनतेला एकत्र करण्याचे साधन म्हणून त्यांनी त्याचा उपयोग केला. गेली शेकडो वर्षे हा देश पारतंत्र्यात होता. या देशातील बहुसंख्य समाज हा दुःख, दारिद्र्य, अज्ञान, भेदभाव आणि रूढींनी जखडलेला होता. अशा समाजामध्ये देशभक्तीची ज्योत प्रज्वलित करून त्यांना स्वराज्य स्थापनेच्या कार्यात सामावून घेणे आवश्यक होते. आणि त्यासाठीच समाजाला एकत्रित येणे आवश्यक होते. हिंदुसमाज हा प्रामुख्याने धर्मनिष्ठ आहे, असा समाज धार्मिक गोष्टींसाठी एकत्र येणे शक्य असते. यासाठीच टिळकांनी गणेशोत्सवाला प्रोत्साहन दिले. या उत्सवाच्या निमित्ताने समाजातील सर्व थरांतील सर्व माणसे एकत्र येतील आणि मग या समाजात राजकीय, सांस्कृतिक तसेच सामाजिक प्रगतीच्या दृष्टीने प्रयत्न करता येतील असे लोकमान्यांना वाटले. धर्माच्या खालोखाल महाराष्ट्रामध्ये जनतेच्या मनात छत्रपती शिवाजीमहाराजांबद्दल नितांत आदर आहे. महाराजांनी स्थापन केलेले स्वराज्य आणि त्याचा नंतरच्या काळामध्ये झालेला विस्तार म्हणजेच स्वातंत्र्याचा जिवंत इतिहास. त्या इतिहासाला चालना देऊन शिवाजीच्या रूपाने स्वराज्याचा मंत्र जनतेपुढे पोहचवायचा होता. आणि म्हणूनच टिळकांनी शिवजयंतीचा उत्सव साजरा करण्यास सुरुवात केली. शिवाजीचे जीवन म्हणजे देश व स्वराज्य या दोन गोष्टींवर असलेली नितांत श्रद्धा. ही श्रद्धा समाजाच्या सर्व थरापर्यंत पोहोचविण्याचे एक साधन म्हणून टिळकांनी शिवजयंतीचा उपयोग केला.

कलकत्ता येथे दिलेल्या एका भाषणात शिवाजीउत्सवाचे मर्म विशद करताना टिळक म्हणाले होते, " शिवाजी पुणे जिल्ह्यात जन्माला आले यासाठी त्यांना मराठी म्हणावे लागते. पाहिजे तर त्याना तुम्ही बंगाली समजा. ते कोण होते, कोठे जन्मले हे गौण प्रश्न बाजूला सारून राष्ट्रीय दृष्टीने विचार केल्यास त्यांची कामगिरी राष्ट्रीय स्वरूपाची होती असे ध्यानात येईल. व त्या कामगिरीकडे पाहूनच त्यांचा गौरव साऱ्या देशाने केला पाहिजे. आपण त्यांच्या कामगिरीतील प्रेरणा घेतली पाहिजे. या प्रेरणेने आजच्या काळात न जाणो, एखादा शिवाजीसारखा नेता इतर प्रांतात जन्मास येईल. कदाचित तो धर्माने मुसलमान असेल. शिवाजी महाराजांच्या चरित्राचे हे तात्पर्य आहे. कालानुसार महाराजांची कृत्ये घडली. त्यांचे अनुकरण आपणास करावयाचे नाही तर त्या कृत्यांमागची प्रेरणा आत्मसात करून आपण आपला उद्धार करून घ्यायचा आहे!" या भाषणाचा सूक्ष्मपणे विचार केला असता असे लक्षात येईल की, स्वतंत्र भारतात आज नांदत असलेल्या निधर्मी राज्याची मुहूर्तमेढ टिळकांनी केव्हाच केली होती.

हिंदू-मुसलमानांच्या ऐक्याच्या दृष्टीने अमरावती येथील भाषणात टिळक म्हणाले होते, " शिवाजीचा उद्देश अफझलखानास मारण्याचा नव्हता तर तत्कालीन प्रगतीच्या आड येणाऱ्या विघ्नांचे त्यांना निवारण करायचे होते. केवळ मुसलमान म्हणून त्याला मारण्याचा हेतू असता तर छत्रपती शिवाजीमहाराजांनी खानाच्या बायकोला दागिने वगैरे देऊन विजापूरला पाठविले नसते. त्याचप्रमाणे

प्रत्येकाने जातीकडे व धर्माकडे न पाहता सर्व राष्ट्राकरता प्रयत्न केला पाहिजे. छत्रपती शिवाजीच्या ठिकाणी एखादा मुसलमान असता तरी त्याचाही आम्ही गौरवच केला असता." आणखी एका वेगळ्या संदर्भात ते म्हणाले होते – शिवाजी मुसलमान धर्माचा शत्रू नव्हता. त्यांच्या धर्मभावना न दुखावता तो मोंगलांशी लढला. हा लढा धर्माधर्मातला नव्हता. जुलूम आणि स्वातंत्र्य यांच्यातला हा झगडा होता. कालानुसार विभूती अवतरतात. पूर्वी महाराष्ट्रात शिवाजी झाला, उद्या दुसऱ्या प्रांतात एखादी युगप्रवर्तक विभूती जन्मास येईल ![1]

अशा तऱ्हेने गणपती उत्सव, शिवजयंती उत्सव या सारख्या उत्सवांना राष्ट्रीय स्वरूप देऊन टिळकांनी सर्व-धर्मीय लोकांना एकत्र आणले. त्यांना स्वराज्याचा कानमंत्र दिला. 'सामर्थ्य आहे चळवळीचे। जो जो करील तयाचे ॥' अशी जाणीव लोकांना करून दिली. म्हणूनच संपूर्ण भारताने स्वातंत्र्यलढ्यात उडी घेतली, सारा तरुण वर्ग टिळकांच्या मागे उभा राहिला. आणि स्वराज्याच्या कार्याचे अग्रणी म्हणून ते 'लोकमान्य' झाले.

लोकमान्य टिळकांनी ज्या दृष्टिकोणातून हे राष्ट्रीय उत्सव सुरू केले तो दृष्टिकोण आज पार विलयाला गेलेला दिसतो. या राष्ट्रीय उत्सवाच्या निमित्ताने समाजजागृतीचे ध्येय बाजूला करून आज हे उत्सव म्हणजे निव्वळ करमणूक झालेली आहे. गणेशोत्सवात तमाशाचे फड उठलेले पाहून स्वर्गस्थ लोकमान्य टिळकांना शरमेने मान खाली घालायला लागत असेल. आणि आपण सुरू केलेल्या या राष्ट्रीय उत्सवाला महाराष्ट्रातील समाजाने किती विकृत रूप दिले आहे ते पाहून अतीव दुःख झाले असेल. अजूनही वेळ गेलेली नाही. समाजजागृतीची गरज अजूनही तितकीच तीव्रतेने भासत आहे. त्या दृष्टीने या उत्सवांचा योग्य उपयोग करून घेतल्यास समाज जागृतीचे आजही मोठे कार्य होण्याची शक्यता आहे. आणि तेच लोकमान्यांचे खरे स्मारक होईल. पुण्यातील तत्त्वज्ञानाचे प्रथितयश प्राध्यापक डॉक्टर वाडेकर म्हणतात, 'या देशात दोन फार मोठी माणसे जन्माला आली. ती म्हणजे शिवाजी-महाराज आणि बाळ गंगाधर टिळक. या दोन युगपुरुषांना परमेश्वराने जास्त आयुष्य दिले असते तर कदाचित महाराष्ट्राचा आणि पर्यायाने भारत देशाचा इतिहास बदलला असता.'

⁂

# तोंडची साखर पळाली !

कु. पद्मजा पेंढारकर, प्र. व. साहित्य

तो दिवस मी कधीही विसरणार नाही. दसरा होता तेव्हा. सकाळी भाजी घेऊन घरी पोचले आणि अहो आश्चर्यम् ! धूमकेतूप्रमाणे कधीतरी उगवणारे आणि धूमकेतूप्रमाणेच संकटकारक वाटणारे – नव्हे – असणारे तिंबूनाना आणि बंडूतात्या आमच्या घरी पधारले होते. स्वैपाकघरात गेले तर आईचा पारा चढलेला. continuosly १५ मिनिटं तिचं बोलणं ऐकल्यावर माझ्या डोक्यात एवढाच प्रकाश पडला की साखर गडप झाल्या-मुळे चहा उपटण्यासाठी त्यांनी आमच्या घरी पायधूळ झाडली होती.

तसं म्हटलं तर साखरेच्या या अंतर्धान पावण्याची झलक पूर्वीपासूनच पाहायला मिळत होती. कविलोक नेमेचि येणाऱ्या पावसाचे कौतुक करतात. पण मला मात्र दसरा-दिवाळीसारखे सण जवळ आल्यावर अगदी न चुकता गडप होणाऱ्या साखर इ. वस्तूंचेच अधिक कौतुक करावेसे वाटते. पाऊस ज्याप्रमाणे ढगांचा गडगडाट इ. च्या साहाय्याने आगमनाची वर्दी देऊन मगच येतो, त्याप्रमाणे या वस्तूही आपल्या निगमनाची ॲडव्हान्स सूचना देऊनच जातात. शेतकरी जसे पावसाच्या स्वागतास सिद्ध होतात, याचप्रमाणे बायाबापड्याही मोठमोठ्या पिशव्या सावरत साखर अदृश्य व्हायच्या आत मिळेल तेवढ्या प्रमाणात आणि लागेल तेवढ्या मोबदल्यात तिचं दर्शन घेण्यासाठी 'शा. अमुकचन्द तमुकचन्द जैन' किंवा तत्सम चंदेरी बोर्डस् लावलेल्या दाराशी तिष्ठत असतात.

असे सगळे सोपस्कार करून घेऊन साखर नामक चवीला गोड लागणारी पण ती मिळवतांना अनेक कटू अनुभव आणून देणारी चीज बाजारातल्या वस्तूंचे दर दाखवणाऱ्या बोर्डावरूनच ( फक्त ) अगदी आत ( म्हणजे कुठे ते everyone knows ) पसार झाल्याला २–४ च दिवस झाले होते.

आणि ( म्हणूनच ) बंडूतात्या तिंबूनानांसह घरी येते

झाले होते. (हा त्या ब्यूटिफुलम् संस्कृतम्चा 'परिणामम्' बरं का!)

'आज दसरा आहे' हे जाणवून देणाऱ्या इतर काहीच गोष्टी घडत नव्हत्या तेव्हा 'नाना, तात्या येति घरा, तोचि दिवाळी दसरा' असे म्हणून येईल त्या परिस्थितीला धडाडीने तोंड द्यायचे, हा पंतप्रधानांपासून राज्यमंत्र्यांपर्यंत सर्वांनी दिलेला सल्ला शिरसावंद्य मानायचा असं ठरवलं.

इतक्यात (माझ्या दृष्टीने) एक गंमतच झाली. आईने तिंबूनाना इ. ना देण्यासाठी 'स्पेशल' गुळाचा चहा बनवला. आणि कप माझ्या स्वाधीन करून ती म्हणाली, "यांतले हे गुळाच्या चहाचे कप त्या दोघांना दे. आणि साखरेचा चहा 'ह्यां'ना दे." आता सगळ्या कपबशा सारख्या. मला कसं कळणार कुठचा साखरेचा आणि ळाचा ते! झालं ते नेमकं उलटं. मग ते गेल्यावर बाबा खूप चिडले. आईनं तो राग (उगीचच) माझ्यावर काढला. मला मात्र मूग गिळून बसावं लागलं.

तेवढ्यात वेल वाजली. आईला चिडायला आणखी एक कारण म्हणून इतके दिवस दिल्लीला असणारी व नुकतीच महाराष्ट्रात आलेली बाबांच्या आतेमावशीच्या चुलत जावेची बहीण सहकुटुंब 'पुण्यनगरी' पाहण्यासाठी आली. आणि पत्र न पाठवता आली. नाहीतर आम्हीच इथून पोबारा केला असता. ती येण्यापूर्वी आईच्या कपाळावर आठ्या स्पष्ट दिसत असताना त्या मात्र हसतमुख होत्या आणि त्यांचे एकापेक्षा एक पराक्रमी पुत्र आमच्या सोफा कम बेडला 'पोचवण्या'च्या कामाला लागले होते.

आईने पुन्हा (कमी साखर घालून) चहा तयार केला. पहिला घोट घेताच बाबांच्या आ. मा. च्या चु. जा. ची बहीण म्हणाली — "राजू, बाळा, हा इतका अगोड चहा तुला आवडला नसेल ना?"

आणि राजूबाळाच्या होकारा–नकाराची वाट न पाहता म्हणते कशी – "ठेव हो तो तसाच. आपण घरी गेल्यावर पिऊ चांगला."

आईने रागारागाने माझ्या हातात पैसे कोंबले आणि म्हणाली– "जा आण साखर. पोटात साखरेचा चहा तिन्ही त्रिकाळ गेल्याशिवाय आत्मा संतुष्ट नाही व्हायचा" मी जरा "ब्लॅक मार्केटनं घेणं म्हणजे गरिबांवर अन्याय आहे" इ. इ. सुरू करणार होते. पण आईचा चेहरा पाहून ते कॅन्सल केलं.

साखर घेऊन दारात प्रवेश करते तो काय! आणखी एका पाहुण्याचे आगमन. दारात चपलांची रास पाहून मला कल्पना आलीच होती. माझी लांबची मावशी आली होती. पहिले पाहुणे पुणे पाहायला आलेले असल्यामुळे त्यांचा कामाला काहीच उपयोग नव्हता. दुसऱ्या पाहुण्यांना कामाला हात लावू द्यायचा नव्हता. तेव्हा खरं बोलायचं तर या ५–६ दिवसांत मी फारच वैतागले होते.

पण खरा problem यानंतरच होता. पाहुण्यांसाठी जेवणाचा काहीतरी खास बेत करायचा होता. आणि साखरच नाही. बरं, हॉटेलमधून आणावं, तर मग त्यापेक्षा सोन्याचांदीचे दागिनेच स्वस्तात पडले असते. शेवटी बटाटेवडे, मसालेभात असा बेत ठरला. हा (महत्त्वाचा) प्रोग्राम आटपल्यानंतर पाहुणे लगेच निघून गेले. मग वाटलं, आधीच ही युक्ती सुचली असती तर बरं झालं असतं.

त्या दिवशी दुपारी 'सुटले ग बाई' असं म्हणून आई जरा लवंडतेय, तोच पुन्हा बेलचं 'कर्णमधुर' संगीत कानावर! वीजकपात, धान्याची–पाण्याची टंचाई इ. परिस्थिती आपल्या गावी निर्माण झाल्यावर, दुसऱ्या नातेवाइकांकडे जाऊन आपलं त्यांच्याबद्दलचं अगत्य जाणवून द्यायचं ही diplomacy आतापर्यंत इतर लोकांपुरतीच मर्यादित आहे असं आम्ही समजत होतो. पण आपले नातेवाईकही इतके मुत्सद्दी असतील अशी मात्र शंकाही आली नव्हती.

शेवटी 'वाचव रे बाबा' अशी देवाची करुणा भाकत साखर नसल्यामुळे कडू झालेले तोंड हास्याने भरून टाकीत मी दार उघडलं.

# किरणोत्सारी समस्थानिक व त्यांचे विविध उपयोग

✣

**कुंजन ठाकूर, हेमंत क्षीरसागर, अविनाश शिन्देकर.** तृ. व. शास्त्र (रसायन)

अणू हा मूलतत्त्वाचा व त्याचेच गुणधर्म असणारा सर्वात लहान भाग मानला जातो. त्याच्या केंद्रस्थानी अणुकेंद्र असून तो प्रोटॉन व न्यूट्रॉन (शून्य कण) चा बनलेला असतो, तर केंद्राभोवती विविध कक्षात इलेक्ट्रॉन्स भ्रमण करीत असतात. प्रोटॉन धन विद्युतभारी, इलेक्ट्रॉन ऋण विद्युतभारी तर न्यूट्रॉन विद्युतभार रहित असतात. अणूत प्रोटॉन व इलेक्ट्रॉन्सची संख्या सारखी असते. जेव्हा एखाद्या मूलतत्त्वाच्या अणूत प्रोटॉनची संख्या सारखी असते पण न्यूट्रॉनची संख्या भिन्न असते तेव्हा त्यास समस्थानिक (Isotope) असे म्हणतात. उदाहरणार्थ हैड्रोजनचे तीन समस्थानिक आहेत. म्हणजेच तीनही समस्थानिकांचा अणुक्रमांक एकच असून त्यांचे वस्तुमान वेगळे आहे. म्हणजेच $H^1$, $H^2$, $H^3$, असे लिहिता येतील. अशा समस्थानिकाचे दोन प्रकार असतात. त्यांपैकी काही समस्थानिक किरणोत्सारी असतात व काही किंरणोत्सारी नसतात. किरणोत्सारी समस्थानिकांमधून आल्फा, बीटा, गॅमा असे तीन प्रकारचे किरण बाहेर पडतात. किरणोत्सारी समस्थानिकांना अर्धे आयुष्य असते म्हणजे अर्ध्या आयुष्याच्या काळात मूळ साठ्याच्या अर्ध्या साठ्याचे नवीन मूलद्रव्यात रूपांतर होते व बाकीचा अर्धा साठा तसाच शिल्लक राहतो. सोडियम (अणुभार २४) चे अर्धे अयुष्य २४ तास तर कार्बन (अणुभार १४) चे अर्धे आयुष्य (Half Life) काही हजार वर्षे असते. अल्फा, बीटा, ह्या अदृश्य किरणांचे अस्तित्व गायगर गणक यंत्राच्या सहाय्याने ओळखता येते.

कृत्रिम किरणोत्सारी समस्थानिक हे अणुभट्टीत तयार करता येतात. जे समस्थानिक किरणोत्सारी व्हावेत असे आपल्याला वाटत असेल ते अॅल्यूमिनीयमच्या नळकांड्यात भरून ती नळकांडी आडव्या दिशेत परंतु यूरेनियम लगडीच्या वर, खाली, त्यांना काटकोन करतील अशा दिशेने,: काही काळ अणुभट्टीत घालून ठेवतात. अणुभट्टीत जन्माला येणाऱ्या (न्यूट्रॉन) शून्य कणाच्या भडिमारामुळे समस्थानिक किरणोत्सारी बनतात. हे किरणोत्सारी समस्थानिक निर निराळ्या कालमर्यादेपर्यंतच स्वतःच्या अणुकेंद्रातून विशिष्ट जातीचे किरण बाहेर फेकीत राहातात. उदाहरणार्थ–कृत्रिम किरणोत्सारी सोन्यामधून किरण बाहेर टाकण्याची क्रिया फक्त तीन दिवस चालते. त्याच प्रमाणे नैसर्गिक किरणोत्सारी समस्थानिक असतात. उदाहरणार्थ यूरेनियम (अणुभार २३५) हा नैसर्गिक किरणोत्सारी समस्थानिक आहे.

कृत्रिम किरणोत्सारी समस्थानिकांचा उपयोग वैद्यकीय क्षेत्रात केला जातो. मनुष्याच्या शरीरात किंवा वनस्पतींच्या अंतर्भागात घडत असणाऱ्या वेगवेगळ्या रासायनिक क्रियांची संपूर्ण माहिती याच्या साहाय्याने मिळते. एखाद्या पदर्थात अशा कृत्रिम किरणोत्सारी समस्थानिकांना अत्यंत सूक्ष्म प्रमाणात मिसळून ते मिश्रण मनुष्यप्राण्याच्या शरीरात तोंडावाटे देतात अगर सुईतून रक्तावाटे देतात व नंतर गायगर गणक यंत्राच्या अगर फोटोच्या सहाय्याने त्याची हालचाल नोंदतात.

वनस्पती हरितद्रव्य, कर्बवायू, पाणी व सूर्यप्रकाश यांच्या सहाय्याने आपले अन्न तयार करतात. वरील क्रियेत प्राणवायू बाहेर टाकला जातो. पूर्वी असे समजले जाई की, हा प्राणवायू कर्बवायूमधून बाहेर पडतो. परंतु किरणोत्सारी समस्थानिकांचा उपयोग करून असे सिद्ध करण्यात आले आहे की बाहेर पडणारा प्राणवायू हा पाण्यातील असतो. तो कर्बवायूमधून दिला जात नाही.

दररोजच्या व्यवहारात कॅल्शियम व फॉस्फरस यांची अन्नपदार्थास गरज असते. परंतू त्याचे अन्नातील योग्य प्रमाण माहिती असणे जरूर असते. त्यासाठी निरनिराळ्या पदार्थात किरणोत्सारी कॅल्शियम सूक्ष्म प्रमाणात मिसळून मनुष्याच्या शरीरात जाऊ देतात. हे पदार्थ कोठे, कसे जातात व त्याचे पचन कसे होते हे गायगर गणक यंत्राच्या

सहाय्याने समजते. यावरून शरीराच्या वाढीला योग्य कॅल्शियमयुक्त खाद्यांचा शोध लावता येतो.

किरणोत्सारी सोडियमचा उपयोग शरीरातील रक्ताभिसरणाचा अभ्यास करण्यासाठी होतो. शरीरातील रक्तप्रमाण ठरविण्याकरता किरणोत्सारी फॉस्फेटचा द्राव रक्तात मिसळतात. हे फॉस्फेट रक्तात मिसळून एकजीव होते. व पुन्हा त्या रक्ताची चाचणी घेतली असता एकूण रक्ताचे प्रमाण नक्की ठरविता येते. थॉयरॉईड ग्रंथीची फाजील वाढ नाहीशी करण्याकडे किरणोत्सारी आयोडीन (१३१ अणुभार)चा उपयोग करतात. थॉयरॉईड ग्रंथी किरणोत्सारी आयोडीन शोषतात व आयोडीन १३१ जे किरण बाहेर फेकतो त्यामुळे रोगट पेशींची फाजील वाढ नाहीशी होते.

एक अत्यंत अभिनव प्रयोग डॉक्टरांनी रोगनिवारणाकरता करून पाहिला. एका स्त्रीच्या मेंदूत एक गाठ निर्माण झाली होती. तिला प्रथम बोरॉन या द्रव्याचे इंजेक्शन दिले. हा बोरॉन तिच्या मेंदूतील गाठीत संपूर्णपणे साचून राहील या बाबत जरूर ती काळजी घेण्यात आली. नंतर बोरॉन द्रव्य साचलेल्या मेंदूतील गाठीवर शून्यकणांचा मारा करण्यात आला. त्याबरोबर त्या गाठीत एक अणुस्फोट घडून आला व गाठीचा संपूर्णपणे नायनाट झाला.

त्याचप्रमाणे कॅन्सरच्या पेशी पण किरणोत्सारी समस्थानिकांच्या मदतीने नाहीशा करता येतात. यासाठी कॅन्सर झालेल्या भागावर काळजीपूर्वक कोबाल्ट अणुभार ६० च्या किरणांचा मारा करतात.

रक्ताचा कर्करोग सुद्धा समस्थानिकाने ओळखता येतो. यासाठी फॉस्फरस ३२ हा किरणोत्सारी समस्थानिकाचा उपयोग करतात. या रोगात रक्तात पांढऱ्या पेशींची बेसुमार वाढ होते. फॉस्फरस ३२ हाडांच्या अंतर्भागात जातो. की जेथे पांढऱ्या पेशींची उत्पत्ती होते. ती जर जास्त प्रमाणात होत असेल तर फॉस्फरस ३२ त्यांची उत्पत्ती काही प्रमाणात कमी करू शकतो.

कृत्रिम किरणोत्सारी समस्थानांचा औद्योगिक क्षेत्रांत सुद्धा उपयोग करता येतो. एखाद्या द्रव्याचे चलन-वलन समजून घेण्याकरता, त्याचा माग काढण्याकरता तसेच एखाद्या रासायनिक प्रक्रियेची माहिती मिळवण्यासाठी अगर नळातील वाहत्या द्रव्यांतील गळतीची जागा नक्की करण्यासाठी किरणोत्सारी समस्थानिक वापरतात. कोबाल्ट (अणुभार ६० ) चा उपयोग यंत्रे तयार करताना त्यांत निर्माण होणारे दोष ओळखून काढण्यासाठी करतात. जहाजे तयार करताना निर्माण होणारे दोष ओळखण्यासाठी व घरे बांधताना निर्माण होणारे बांधणीतील दोष काढण्यासाठी पण किरणोत्सारी समस्थानिकांचा उपयोग करता येतो.

औषधाच्या कारखान्यात तयार केली जाणारी औषधी दीर्घकाल पर्यंत उत्तम स्थितीत राहण्यासाठी त्यावर ग्यामा किरणांचा मारा करतात. त्यामुळे त्यातील जंतूंचा नाश होतो व त्याचबरोबर त्यामधील महत्त्वाच्या उपयुक्त घटकांचे संवर्धन होते. त्याचप्रमाणे खाद्य पदार्थावर सुद्धा जर ग्यामा किरणांचा मारा केला तर ते खूप दिवस टिकू शकतात.

किरणोत्सारी फॉस्फरसच्या सहाय्याने, निरनिराळ्या खतांची कार्यक्षमता नेहमीपेक्षा एका निराळ्या पद्धतीने अजमाविता येते. भातशेती करता हे खत पृष्ठभागावर पसरविणे उपयुक्त ठरते, तर गव्हाच्या बाबतीत हेखत पृष्ठभागाखाली दोन इंच खोल मातीच्या थरात मिसळून देणे फायदेशीर ठरते.

तंबाखूमध्ये निर्माण होणाऱ्या निकोटीन द्रव्याचे प्रमाण, कापसातील धाग्याची वाढ, निरनिराळ्या वनस्पती मधील खाद्योपयोगी तेलाचे प्रमाण या संबंधी मूलभूत स्वरूपाची माहिती मिळविणे किरणोत्सारी समस्थानामुळे शक्य होते. वनस्पतीमधील अनुवंशिक गुणधर्म ठरविणाऱ्या जीनूसमधे अणुकिरणांच्या माऱ्याने बदल घडवून येतात. अशा वनस्पतींपासून निर्माण होणाऱ्या भावी पिढ्या हे बदलते गुणधर्म उतरून नव्या जातीची पिके, वनस्पती निर्माण करणे शक्य होते. गव्हावर पडणाऱ्या तांबेरा ह्या किडीला प्रतिकार करणारी गव्हाची जात अणुकिरणांच्या मदतीने शोधण्यात आली आहे.

अलीकडे कार्बन ( अणुभार १४ ) या किरणोत्सारी समस्थानिकांचा उपयोग जुन्या अवशेषांचे, पुराणवस्तूचे वय ठरविण्यासाठी केला जातो. कार्बन १४ चे अर्धे आयुष्य ५६०० वर्षे असते. कोणत्याही क्षणी अशा अवशेषांतील मूळ किरणोत्सारी द्रव्याच्या साठ्यांपैकी किती साठा संपला आहे याचे नक्की मापन करून पुराण वस्तूच्या वयाचा अंदाज काढता येतो.

# विद्यार्थी, शिक्षण आणि समस्या

✣

ज्ञानदेव एरंडे, तृतीय वर्ष वाणिज्य

आज विसाव्या शतकातील विद्यार्थी विद्यार्जनापासून दूर होत चालला आहे. तो आपली मूल्ये, गरजा विसरला आहे. सध्या चालू असलेल्या भ्रामक अशा वृत्तीकडे तो झुकला आहे व आपल्या सत्कर्मापासून बाजूला चालला आहे. जीवनाचा खऱ्या अर्थाने त्याने विचार केला असेल का ! असे पण कधी-कधी मनाला जाणवल्यासारखे वाटते. आज विद्यार्जन हे आपले विद्यार्थिदशेतले कर्तव्य विसरून तो भ्रष्टाचाराच्या मार्गाचा अवलंब करून स्वतःची नीतिमूल्ये झुगारून देत आहे. आणि ज्या कर्माची आपल्याला या अवस्थेत गरज नाही त्याचा तो स्वीकार करीत आहे. या सर्व गोष्टीला जबाबदार कोण आहे, याचा अजून विचार केला जात नाही व हाच मोठा बेजबाबदारपणा आहे.

विद्यार्थ्याला दिले जाणारे शिक्षण हे त्याची गरज लक्षात घेऊन विचारपूर्वक दिले जात नाही. जो विद्यार्थी कॉलेजमध्ये फी भरतो परंतु तासाला जवळजवळ हजर नसतोच तोच विद्यार्थी बाहेर खाजगी शिकवणीला नियमित उपस्थित राहतो. असे का ? तर आज विद्यार्थी केवळ परीक्षार्थी बनला आहे. पूर्वीच्याकाळी शिक्षकवर्ग आणि विद्यार्थी यांच्यात प्रेमाचे नाते होते. मित्रत्वाची सांगड होती व जिव्हाळ्याचा आत्मविश्वास होता. शिक्षकांना वाटत होते, समाजात आपला विद्यार्थी उत्तुंग व्हावा, बुद्धिवान बनावा, सर्व विश्वाने त्याचे गुणगान गावे, आमच्या विद्यार्थ्यांना या क्षेत्रात मानाचे स्थान मिळावे. आमचा विद्यार्थी जगातील विद्यार्थ्यांच्या तुलनेने बुद्धीने कमी नाही परंतु त्यांना घडवणारे कलावंत हवेत, पैलू पाडणारे विचारवंत हवेत, बुद्धी परिपक्व करणारे साहित्यिक हवे आहेत व त्यांचीच आता दुर्मिळता भासत आहे. खऱ्या अर्थाने दुर्मिळता नाही पण या सर्वच वर्गातील विद्यार्थीविषयक असलेली तळमळच लोप पावत चालली आहे व त्याची जागा राजकारण घेत आहे. पूर्वीचे शिक्षक विद्यार्थ्याला त्यांच्या जबाबदाऱ्या जवळून सांगत होते व विद्यार्थी पण शिक्षकवर्गाला त्यांच्या दर्जाप्रमाने मान देत होता. परंतु आज ती परिस्थिती नाही. विद्यार्थी व शिक्षक यांच्यातील हे नाते जवळजवळ नाहीसे झाले आहे व त्याची जागा व्यावहारिकतेने घेतली आहे.

दुसरीकडे पालकवर्ग विद्यार्थ्यांच्या अडचणी जाणून घेत नाहीत. विद्यार्थ्याला शिक्षण घेत असताना येणाऱ्या समस्यांचा ते जवळून विचार करत नाहीत. मुलगा शिकत आहे, कॉलेजमध्ये जात आहे, घरी येत आहे व वर्षाच्या शेवटी नापास होतच आहे ! मग पालकवर्गाचे डोळे उघडतात. परंतु त्यावेळी विद्यार्थी हा दुसरीकडे झुकलेला असतो. त्याला दुसरा मार्ग सापडलेला असतो व तो म्हणजे राजकारण. भ्रष्टाचाराला अशा मार्गाचा उपयोग होतो.

विद्यार्थी राजकारणात ओढला जातो तो बाहेरच्या परिस्थितीमुळे. पुढाऱ्याच्या सत्तालोभी प्रवृत्तीमुळे हे राजकारणी पुढारी एकीकडे बोलतात की, आजचे शिक्षण निरुपयोगी आहे. बेकारांत पदवीधरांची भर आहे. परंतु त्यावरती ते उपाय सांगत नाहीत. फक्त शिक्षणपद्धती बदलली पाहिजे असे सांगून शिक्षणाविषयी विद्यार्थ्यांचे मत कलुषित करतात व विद्यार्थ्याला पण वाटते, असे आहे तर मग त्या शिक्षणाला राजीनामा. असे तुच्छ विचार त्याच्या मनात येतात व ज्या विश्वविद्यालयात आज हजारोंच्या संख्येने विद्यार्थी ज्ञानार्जन करीत असतात, जेथे ज्ञानाचे भांडार सर्वांना खुले

असते, जिथे मोठमोठे शोध लावले जातात गणित–शास्त्राचा अभ्यास केला जातो अशा पवित्र ठिकाणाला हे बेजबाबदार विद्यार्थी आगी लावतात काय, नासधूस करतात काय आणि आपल्या पूर्वजांनी श्रेष्ठ मानलेल्या संस्कृतीचा अवमान त्यांच्याकडून घडतो काय ? ह्या गोष्टी ज्यावेळी डोळ्यांनी पाहिल्या जातात त्यावेळी विचार येतो की जी राष्ट्राची संपत्ती–जिचा सर्वांना मोठ्या प्रमाणावर उपयोग होत आहे ती हे बेजबाबदार विद्यार्थी क्षणात नाश करून टाकतात व विश्वात पवित्र अशा देशाची अवहेलना करतात. याला ह्या प्रवृती-पर्यंत नेले कोणी ? तर याला हे राजकारणी लोक मोठ्या प्रमाणात जबाबदार आहेत. विद्यार्थ्यांचा त्याच्यात काहीही दोष नाही. या राजकारणी लोकांचे शिक्षण परदेशात झालेले असते व ते मोठे पदवीधर असतात. ते आपल्याप्रमाणे विद्यार्थ्यांचा विचार करत नाहीत. त्यांना हवी असते सत्ता व सत्तेसाठी ते विद्यार्थ्यांचा राजकारणासाठी उपयोग करून घेतात. विद्यार्थ्याला त्यांचा काही एक फायदा नसतो. विद्यार्थी हा मृगजळाप्रमाणे त्यांच्या मागे धावत असतो व त्याला कुठेही शेवट सापडत नाही व मग त्याला वाटते आपला मार्ग चुकला आहे, आपल्या पुढे खोल दरी आहे व ती आपणास पार करून जाता येणार नाही. मग त्याचे डोळे उघडतात. ना शिक्षण ना राजकारणात खऱ्या अर्थाचे स्थान. मग तो बेचैन होतो. जीवनाला काहीही अर्थ नाही, हा मृगजळांचा भास आहे असे त्याला वाटू लागते.

दुसरी समस्या म्हणजे आज बहुसंख्य विद्यार्थिवर्ग नातेवाईक जनतेकडे राहून शिक्षण घेत असतो. कारण घरची परिस्थिती बिकट असते. परंतु हे नातेवाईक विद्यार्थ्याला फार लाचारीने वागवतात, त्यांचा वेळोवेळी अवमान करतात, त्यांनी शिक्षणापासून परावृत्त व्हावे असे उपाय योजतात. कारण अशा परिस्थितीत त्यांनाही परवडण्यासारखे नसते. व मग अशा त्रासलेल्या विद्यार्थ्याला शिक्षणाचा वीट येतो. तो नोकरीच्या शोधात फिरू लागतो व शेवटी नोकरी पण मिळत नाही, शिक्षण पण नाही व मग सर्वजण त्याची अवहेलना करतात. मग त्याला जीवन ही एक रंगभूमी आहे, जीवन–मरणाचा खेळ आहे असे त्याला वाटू लागते.

एकीकडे अनेक वाईट मार्गांचा अवलंब विद्यार्थ्यांकडून केला जातो. ज्यावेळी विद्यार्थी शिक्षणासाठी बाहेरून शहरात आलेला असतो तेव्हा आपले कर्तव्य ज्ञानार्जन हे सोडून तो व्यसनी, नादान अशा मित्रसमूहात जाऊन पडतो व त्यामुळे पैशाची त्याला जाणीव राहत नाही. आई-वडिलांची पण त्याला काळजी वाटत नाही व तो नादान, निष्काळजी, कर्तव्यपराङ्मुख बनतो.

म्हणून अशा बेजबाबदार विद्यार्थ्याला खऱ्या अर्थाचा माणूस बनवण्यासाठी विचारवंतांनी पुढे यावे. शिक्षक, प्राध्यापकवर्गाने विद्यार्थ्याला ज्ञानपिपासू बनवावे. पालकवर्गानी विद्यार्थ्यांकडे लक्ष ठेवून त्यांच्या अडचणी वेळीच सोडवाव्यात व राजकारणाचा त्याला स्पर्शही होऊ देऊ नये. आमचा भारतीय विद्यार्थी बुद्धिमान आहे व त्याची बुद्धीची वाढ करण्याची जबाबदारी शिक्षक, पालक, विचारवंत यांची आहे.

ही जनता जर विद्यार्थ्यांसाठी तळमळीने प्रयत्न करू लागली तर या खंडप्राय देशात अनेक हिरे–मोती तयार होतील. अब्राहम लिंकनसारखा जनतेसाठी झटणारा अब्राहम येथे निर्माण होईल. दोन जन्मठेपीचा बिल्ला छातीवर बाळगून ब्रिटिशांना इतके काळ तुमचे राज्य भारतावर टिकू शकेल काय, असे सांगणारे सावरकर, यावेळी मी तुम्हाला रक्त, अश्रू, घाम यांपलीकडे काहीही देऊ शकत नाही, असे जनतेला सांगून युद्धास प्रवृत्त करणारे चर्चिल. "स्वराज्य हा माझा जन्मसिद्ध हक्क आहे व तो मी मिळवीनच," असे ब्रिटिशांना ठणकावून सांगणारे लो. टिळक, सत्य-अहिंसा ही तत्त्वे जनतेला सांगणारे गांधी, शिवाजीसारखा मराठ्यांचा राजा, नेपोलियनसारखा जगज्जेता सम्राट असे अनेक धुरंधर या पवित्र हिंदुस्थानात तयार होतील, पुन्हा अवतार पावतील व त्यामुळे पूर्वीचा सुजलाम्–सुफलाम् हिंदुस्थान परत त्या मार्गाने वाटचाल करू लागेल. परंतु या सर्व गोष्टी घडल्या पाहिजे तरच माझ्या स्वप्नातील भारताचे चित्र खरे ठरेल, नाहीतर त्याला वेगळेच वळण लागेल व त्याचे रूपांतर एखाद्या विषारी द्रवात होईल, नाहीतर क्रांतीत होईल. परंतु तो भविष्यकाळ आहे. याचा विचार नंतर करावयाचा आहे.

# गरिबी आहे नेतृत्वाची

**धनंजय ताटके,** प्रथम वर्ष वाणिज्य

लहानपणापासून सकाळी उठल्याबरोबर वृत्तपत्रं चाळण्याची एक सवय लागली होती. परंतु हल्ली वृत्तपत्र व देशातील इतर ठिकाणचे वातावरण पाहाता वृत्तपत्र डोळ्यासमोर देखील धरावेसे वाटत नाही. प्रत्येक वृत्तपत्रातून अतिरंजित, एखाद्या राजकीय पक्षाच्या बाजू घेणाऱ्या बातम्या छापल्या जातात. हे जरी खरे असले तरी त्यातून एक निष्कर्ष निश्चितपणे काढता येतो. तो म्हणजे सर्व राजकीय पक्ष आपल्या विरोधी पक्षाला भ्रष्टाचारी समजून त्या पक्षावर चिखलफेक करीत असतात. दिल्ली नगरपालिकेत जनसंघ सत्तेवर आहे. तेथे काँग्रेसवाले जनसंघ भ्रष्टाचारी आहे असा आवाज उठवितात. तर संसदेत जनसंघ काँग्रेसवर चिखलफेक करीत असतो. कम्युनिस्ट समाजवादी पक्षावर टीका करतो तर समाजवादी पक्ष संघटना काँग्रेसवर टीका करीत असतो. एकूण काय तर प्रत्येक पक्ष दुसऱ्या पक्षाला आपल्या वृत्तपत्रांचा आधार घेऊन बदनाम करीत असतात.

कोणत्याही पक्षापुढे एकही असा भरगच्च कार्यक्रम नाही की ज्यामुळे देश आर्थिक संकटातून निभावून जाईल. भ्रष्टाचार दूर होईल. सर्व पक्ष प्रत्येक गोष्टीचा राजकीय फायदा घेतात आणि फक्त निवडणुका जिंकण्याचे दृष्टीने त्याचा उपयोग करून घेतात.

अशा सर्व परिस्थितीमुळे युवक गोंधळात पडतो. काय करावे म्हणजे युवकशक्तीचा पुरेपूर उपयोग केला जाईल हे आजचे नेते सांगू शकत नाहीत. विविध राजकीय पक्ष या युवकशक्तीला भडकवतात आणि चुकीची दिशा दाखवितात, त्यामुळे युवक संतप्त अवस्थेत जाळपोळ, दगडफेक, बंद यांचा अवलंब करतो. आणि अशा भडकवून दिलेल्या संतप्त तरुणांच्या कृती पाहून हेच राजकीय पक्ष पुन्हा आजचा युवक बहकलेला आहे, माजलेला आहे, मस्तवाल आहे, त्याला देशाचे भले कळत नाही असे म्हणायला कमी करत नाहीत.

युवाशक्तीला योग्य वळण लावणाऱ्या नेत्याची चणचण हीच आजच्या भारताची गरिबी आहे. तेव्हा प्रथम ही नेतृत्वाची गरिबी हटविली पाहिजे. स्वातंत्र्यकाळातील लढा देणारे स्वातंत्र्यसैनिक सध्याच्या तरुणांना मुर्दाड म्हणून संबोधून पुढे असेही म्हणतात की, काय हे आजचे युवक! साधे स्वातंत्र्य व्यवस्थित ठेवून रामराज्य करू शकत नाहीत? अशा लोकांना वारंवार सांगावेसे वाटते की, तुमच्याकाळी लो. टिळक, सावरकर, पं. नेहरू, म. गांधी, वल्लभाई पटेल, सुभाषचंद्र बोस वगैरेंसारखे यथायोग्य मार्गदर्शन करणारे नेते होते. परंतु आजचे आम्हाला मार्गदर्शन करणारे नेते कसे आहेत हे सांगण्यासाठी या कागदटंचाईच्या काळात कागद वाया घालवावासा वाटत नाही.

जर झुंजार सूर्यासारख्या तेजस्वी युवाशक्तीला योग्य वळण लावले तर कसा कायापालट होतो हे इस्त्रायलच्या सध्याच्या स्थितीवरून दिसून येते. संपूर्ण वाळवंट असलेल्या या छोट्याशा देशात आज सर्वत्र सुजलाम् सुफलाम्, सर्व साधनांची उपलब्धता झाली आहे. याला कारण तेथील खंबीर, देशाशी आणि कर्तव्याशी प्रामाणिक राहणारे नेतृत्व आहे. परंतु भारतासारख्या मोठ्या देशात, ६० कोटी लोकसंख्या असलेल्या देशात सच्च्या, प्रामाणिक नेतृत्वाचा दुष्काळ आहे. फील्ड मार्शल माणेकशा यांनी देखील मुंबईत एका समारंभात सांगितले की, "युवाशक्ती ही देशाची फार मोठी संपत्ती आहे. परंतु या संपत्तीचा योग्य असा वापर करणारे नेतृत्व या देशात जन्माला आले पाहिजे व त्या दृष्टीने पावले टाकली गेली पाहिजेत.

जेव्हा बिहारमध्ये सर्वोदयवादी नेते जयप्रकाशजींसारखे नेते पुढे येऊन युवकांना शांततेच्या मार्गाने पुढे पाऊल टाकण्याबाबत योग्य सल्ले देतात, त्याचवेळी देशातील राजकीय व सामाजिक स्थितीला एक वेगळे वळण लागण्याची बरीच शक्यता निर्माण होते. आंदोलन यशस्वी होवो अथवा न होवो, युवकशक्तीला एक वेगळी प्रेरणा लाभत चालली आहे. या आंदोलनात ज्याप्रमाणे सर्व पक्षांनी आपल्या पक्षीय टोप्या खिशात ठेवून प्रवेश केला आहे, तशीच पावले सर्व देशात टाकली गेली तर जुन्या पिढीच्या मागणीनुसार रामराज्य येण्यास फार काळ लागणार नाही. या आंदोलनावरून युवाशक्ती खडबडून जागी झाली आहे हे सिद्ध होते. आज ना उद्या हेच युवक सुराज्य प्रस्थापित करतीलच करतील.

# ‘ प्लम ’ वुडहाऊस

✣

डॉ. सौ. श्यामला वनारसे

इंग्रजी साहित्यातील विनोदी लेखनाचे दालन विविध प्रकारे संपन्न करणारा थोर लेखक पी.जी. वुडहाऊस काळाच्या पडद्याआड गेलेला आहे. हसणं, हसवणं, हसता हसता अंतर्मुख व्हायला लावणं आणि शेवटी स्वतःच्याही गुणदोषां-कडे स्मितभावानं बघायला लावणं अशा कितीतरी मोलाच्या गोष्टी विनोदी लेखक घडवत असतो. वुडहाऊस यांनी निर्माण केलेलं जग इंग्लिश समाजातूनच उभं राहिलेलं होतं, परंतु त्या जगातल्या पात्रांचं जे रसायन त्यांनी बनवलं, त्याला खास त्यांचा स्पर्श होता. त्यांनी स्वतःच म्हटल्या-प्रमाणे...“ कादंबरी लिहिण्याचे दोन मार्ग आहेत. एक माझा. मी कथावस्तू, पात्रं, घटना यांचा एक पूर्णाकार बनवून कादंबरी उभी करतो. मग खऱ्या जगात काय घडतं याच्याशी मी बांधलेला नसतो. दुसरा मार्ग म्हणजे प्रत्यक्ष जीवनात बुडी घेणं आणि त्याच जीवनाशी इमान राखून गंभीर स्वरूपाची निर्मिती करणं. लेखकाला यांपैकी कोणती तरी एक निष्ठा अविचल ठेवावी लागते. ‘ बाप रे! हे नाही रेटत आपल्याला ’ असं म्हणून मधेच ढेपाळणारा लेखक अयशस्वी होतो. ”

वुडहाऊस यांच्या कादंबरीत आपण शिरलो की इतक्या सहजपणे त्यांच्या विनोदाची गती आपल्यात भिनते की एखाद्या फांदीला धुमारा फुटावा तसे त्यांच्या शब्दकळेला हे आकार येतात असं वाटतं. पण त्यांनीच म्हटल्याप्रमाणे हे सर्व लिखाण अत्यंत परिश्रमपूर्वक जुळवून ते ‘ घडवत ’ असत; आणि स्वतःचा सर्वात कठोर परीक्षक होऊन समा-धानकारक वाटेपर्यंत कथेची किंवा कादंबरीची पुनर्रचना करीत.

इंग्रजी भाषेचं एक आकर्षक रूप आपल्याला त्यांच्या लिखाणात बघायला मिळतं. आलंकारिक भाषेचा गुंतवळा पूर्णतः बाजूला टाकून निर्मळ झालेली त्यांची भाषा जे हास्यस्फोट करते, त्यात कादंबरीची सर्व अंगं एकजीव झालेली असतात.

ब्रिटिश समाजातील उच्चभ्रू आणि पारंपारिक जीवन-पद्धतीवर एक तिरपा प्रकाश त्यांची विनोदबुद्धी टाकत जाई आणि त्यातील विसंगतीची व्यंगचित्रं रंगत जात. त्यांच्या कादंबरीचं विश्व वेगळं होतं, ते या रंगामुळेच. जनावरांचं प्रेम, लेखक-प्रकाशक यांचे संबंध गर्भश्रीमंतीमुळे काम, श्रम यांचा धागा तुटून गेलेलं जीवन, न पेलणारा इस्टेटीचा पसारा, इंग्रजी आणि अमेरिकन समाजामधील भेद आणि एकमेकांविषयीची वृत्ती अशा कितीतरी गोष्टी या तिरप्या प्रकाशात आल्या की फक्त विनोदनिर्मितीच्याच इष्ट ध्येयाला वाहून घेत.

त्यांनी एवढ्या परिश्रमातून घडवलेल्या पात्रांना त्यांच्या

वाचकांच्या मनोविश्वात खऱ्या जीवनात भेटलेल्या व्यक्ती-सारखंच स्थान मिळालं. बर्टी वूस्टर आणि जीव्हज्, लॉर्ड एम्सवर्थ आणि त्यांची 'एम्प्रेस' (डुकरीण), गॅलाहेड थ्रिपवुड, फ्रेडी, आंट ॲगाथा, कॉन्स्टन्स, डालिया, ही सारी मंडळी एकदा ओळखीची झाली की आपल्या साहित्यिक जाणिवेत एकरूप होऊन जातात.

वुडहाऊस यांना ९३ वर्षांचे दीर्घ आयुष्य लाभले. त्यांची घडण विसाव्या शतकाच्या प्रारंभीच्या ब्रिटिश परंपरांनी केली, आणि त्यांचे पुष्कळ कार्यकर्तृत्व अमेरिकेत घडले. हॉलिवुड, ब्रॉडवे, सॅटरडे इव्हिनिंग पोस्ट, इतर मॅगझीन्स या सर्व ठिकाणी त्यांनी लेखनबहादुरी केली आणि सिनेमा व नाटक या क्षेत्रांच्या संपर्काचा लाभ घेऊन त्यांची साहित्यनिर्मिती उत्तरोत्तर अधिक सफाईची होत गेली. स्वतःचे नैपुण्य त्यांनी कमालीच्या जागरूकतेने मिळवले होते.

दुसऱ्या महायुद्धाच्या काळात ते युद्धकैदी म्हणून जर्मनांच्या तावडीत होते. बर्लिन रेडिओवरून जर्मन कँपमधील जीवनवर्णन करणारी भाषणे त्यांनी दिली. यामुळे ब्रिटनमधे जनमत इतके प्रक्षुब्ध झाले की त्या भरात त्यांच्यावर, त्यांच्या साहित्यावर, त्यांच्या देशप्रेमावर अतोनात चिखलफेक झाली. यामुळे व्यथित झालेले वुडहाऊस शेवटी अमेरिकेत स्थायिक झाले. परंतु युद्धाचा अभिनिवेश ओसरल्यानंतर आज त्यांची भाषणे वाचली तर त्याकाळची प्रतिक्रिया निःसंशयपणे परिस्थितिसापेक्षच होती असेच वाटते. 'विशाल दारे माझ्या घरची खुशाल ही राहोत खुली' अशा वृतीच्या या माणसाला सर्वत्रच स्वतःची भावंडे दिसत होती, आणि एकाच मिष्किलपणे त्याची लेखणी चालत होती. जर्मन सरकारच्या पाशवी कृत्यामुळे तमाम जर्मनांवर पशुत्वाची तप्तमुद्रा ठोकण्याचा घाऊक द्वेष त्यांच्या अंगातच नव्हता. यात एक योग असा की आदल्या वर्षीच (१९३९ मध्ये) ऑक्सफर्ड विद्यापीठाने त्यांना सन्माननीय डी. लिट्. दिली होती. परंतु विद्वज्जडता त्यांना कधी चिकटणं शक्यच नव्हतं, कारण त्यांच्यामधला डलविच स्कूलबॉय त्यांच्या कारागिरीचा प्राण होता. आणि या स्कूलबॉयचे विशेष त्यांच्या पात्रप्रसंगांनी धारण केलेले होते. डलविचच्या टीम्स, पेकिनीज कुत्री, मॉनर्क टाइपरायटर, अशा किती छोट्या छोट्या गोष्टी त्यांच्या जीवनात आपापलं स्थान मिळवून होत्या.

३०० कथा, ७० हून अधिक कादंबऱ्या, ५०० निबंध आणि चाळीसेक नाटके एवढं धन त्यांनी मागे ठेवलं आहे, आणि त्यांच्या पात्रांसारखेच तेही साहित्यप्रेमी रसिकांच्या जीवनात अमर राहतील.

विनोदाचे स्वतंत्र विश्व उभे करून, कधीही बोचरा असू शकणार नाही असा विनोद त्यांनी दाखवला. पात्र आणि प्रसंग यांची बांधणी पक्की करून भाषा वाकवण्याचं त्यांचं कसब पाहणं हेही अतिशय फलप्रद होतं. त्यांच्या Fiery Wooing of Mordred या त्यांच्या कथेत त्यांनी मॉड्रेड म्युलिनर या 'कवी' पात्राच्या जळत्या सिगारेट्स् टाकण्याच्या एका सवयीवर कथानक उभं केलं आहे. हा 'कवी' ॲनाबेल स्प्रॉकेट स्प्रॉकेटच्या प्रेमात पडतो, आणि तीही त्याला प्रतिसाद देते. तिच्या गावाकडच्या घरी त्याला बोलावते. त्याच्याबरोबर तिच्याभोवती जमलेले इतर भुंगेही तेथे गोळा झालेले असतात, पण ते सगळे एकाहून एक तगडे, पुरुषी वैभव मिरवणारे खंदे वीर असतात. त्यांच्यासमोर आपला काय निभाव लागणार या न्यूनभावाने मॉड्रेड खट्टू होतो आणि कविता लिहू लागतो. कागदामागून कागद टरकावतो. (हा मजकूरही अत्यंत रंजक आहे.) आणि शेवटी जळत्या सिगारेटच्या थोटकामुळे आग लागते. आग विझवण्यातला आपला पराक्रम दाखवण्याची ही पर्वणी बाकी सर्वजण साधतात आणि अहमहमिकेने ती आग विझवतात. या सर्व पळापळीत आपण काहीच मर्दपणा दाखवू शकत नाही हे पाहून हा अधिकच खट्टू होत जातो. पण शेवटी त्या घराच्या लायब्ररीत ॲनाबेल आणि तिचे आईवडील यांचा संवाद त्याला वेगळ्याच उंचीवर नेऊन सोडतो. जुनं भलंमोठं घर सांभाळता सांभाळता जेरीला आलेल्या सर स्प्रॉकेट स्प्रॉकेटना ही आग हवीच असते म्हणजे विम्याची रक्कम तरी मिळेल असं त्यांना वाटत असतं. त्या पैशावर आपण लंडनमधे छोटा फ्लॅट घेऊन राहू असं त्यांचं स्वप्न असतं. ॲनाबेलच्या मित्रांनी आग त्वरित विझवून ही शक्यता नष्ट केलेली असते. त्याच संभाषणात ॲनाबेल मॉड्रेडवरचं आपलं प्रेम व्यक्त करते आणि या गोष्टीचा शेवट मॉड्रेड जिंकतो असाच आहे. पण त्यातही आईवडलांचा आशीर्वाद घेऊन हे प्रेमिक पॅरॅफीन ठेवलेल्या तळघराच्या दिशेनं जातात आणि जिना उतरल्यावर त्याच्या पायाशी वडिलांनी वरून टाकलेली काड्यापेटी पडते असा शेवट आहे. यात मॉड्रेड आणि सर मर्गट्राइड स्प्रॉकेट–स्प्रॉकेट हे दोन

प्रवाह एकत्र आणून प्रसंगांचे जे वेगवेगळे Perspectives वुडहाऊस यांनी उभे केले आहेत त्यातून अत्यंत रंजक कथा वाचकांना मिळते. ' विनोदाची शक्यता नाही, असा प्रसंगच नाही ' अशी एक प्रतिज्ञाच आपल्याला दिसेल. याच कथेच्या सुरुवातीला मिस्टर म्युलिनर ( मॉर्ड्रेडचे काका ) त्याची गोष्ट सांगतात, असा कथाभाग आहे. त्यात ते त्याचं वर्णन करताना म्हणतात '...सुरेख दात होते त्याचे. दातांचा उल्लेख मुद्दाम करतो, कारण त्यांच्यामुळे तर पुढचं सगळं रामायण घडलं.' यावर तिथली बारबर काम करणारी मुलगी विचारते ' कुणाला चावला बिवला की काय तो ? ' यानंतरच आपल्याला कळतं की दंतवैद्याच्या दवाखान्यात मॉर्ड्रेड आणि ॲनाबेल यांची गाठ पडली. असंच शेवटी शेवटी जेव्हा मॉर्ड्रेड सर स्प्रॉकेट स्प्रॉकेटना ॲनाबेलसाठी मागणी घालतो, त्यातही आहे. तो ' .. I am only a poor poet '— त्यावर सर स्प्रॉकेट विचारतात ' How poor ? ' तर त्यावर उत्तर येतं, ' I was refer'ing to my art. financially, I am nicely fixed.' एकाच गोष्टीतल्या अशा जागा दाखवत गेलं तरी त्यांच्या प्रसंगबांधणीची कारागिरी आणि विनोदाच्या शक्यता शोधत जाणारी खट्याळ नजर लक्ष वेधून घेते. त्यांची प्रमुख पात्रं आणि दुय्यम पात्रं सारखीच जिवंत वाटतात. कारण कोणतंच पात्र निष्कारण लुडबूड करत नसतं. पात्रांची, इंग्लिश खेड्यांची, घरांची नावं, फार काय आताच सांगितलेल्या गोष्टींचं The Fiery Wooing of Mordred हे नाव, अशा सर्व तपशिलात ते विनोद भरत होते.

भाषा वाकवण्याचे तर असंख्य प्रकार त्यांनी वापरले. कधी understatement करून, तर कधी एखाद्या पात्राच्या विशिष्ट दृष्टीतून, त्यांनी प्रसंगांची खुलावट साधली. The Truth about George या गोष्टीत जॉर्जच्या शब्दकोडी सोडवणं आणि तोतरेपणा या दोन वैशिष्ट्यांनी त्याचे संवाद अत्यंत मजेशीर बनले आहेत. ' रोज निदान तीन अनोळखी व्यक्तींशी बेधडक बोलून पाहा ' हा सल्ला घेऊन निघालेल्या जॉर्जला पहिला परका मनुष्य भेटतो, तोच एक रानदांडगा तोतरा ! त्यावर त्याच्याशी बोलण्याऐवजी त्याला विश्वरूपदर्शन घडवून नुसता घराकडे निर्देश करून तो ती वेळ मारून नेतो. त्याची मैत्रीण शब्दकोड्यांच्या छंदात त्याच्यासारखीच रमलेली असते. त्यांच्या संवादाची एक झलक: ' Why, Mr Mulliner ! What has been happening ? Your clothes are torn, rent, ragged, tattered, and your hair is all dishevelled, untrimmed, hanging loose or negligently, at loose ends ! '

' You are right,' he said. ' And, what is more, I am suffering from extreme fatigue, weariness, lassitude, exhaustion, prostration and languor.'

त्यांची पात्रं स्वतः अगदी स्वतः राहून विनोद उत्पन्न करतात. ती जाऊन विनोद ' करत ' नाहीत. त्यांचा विनोद त्यामुळेच एखाद्या कथानकावर बांडगुळासारखा वाटत नाही, तर त्याचाच अंगभूत विशेष होतो. विनोदाला त्यांनी कधी ' वापरलं ' नाही. आणि हे त्यांचं वैशिष्ट्य त्यांच्या जीव्हज सारखंच अद्वितीय आहे. त्यांचं अनुकरण शक्य नाही. कारण ते वैशिष्ट्य असं वरवरचं नव्हतंच, ते त्यांच्या व्यक्तित्वात मुरलेलं होतं. त्यांचं होतं. लेखक म्हणून त्यांनी घेतलेले कष्ट त्यांच्या पत्रांमधून स्पष्ट कळतात.

थोर लेखक म्हणून त्यांचा गौरव किंवा अभ्यास जसा प्रकारे महत्त्वाचा आहे, त्याहीपेक्षा ' प्लम ' वुडहाऊस हा माणूस संस्कृतिनिरपेक्षतः सुसंस्कृत होता, हे महत्त्वाचं आहे. स्वतःच्या मर्यादा, दुसऱ्याचे गुण यांची सारखीच स्पष्ट जाणीव त्यांना होती. शॉ ओकॅसी यांनी त्यांना ' English literature's performing flea ' असं म्हटलं. त्यांनी ' Performing Flea ' याच नावाने स्वतःची पत्रे व छोटे आत्मचरित्र प्रसिद्ध केले. त्यात ते म्हणतात, '.... Thinking this [ remark ] over, I believe he meant to be complimentary, for all the Performing fleas I have met have impressed me with their sterling artistry and that indefinable something, which makes the good trouper.'

यावर वेगळं भाष्य नकोच.

# भ्रष्टाचार

✣

चारुचंद्र भिडे, द्वि. व. वाणिज्य

आजकाल आपल्या वाचण्यात, ऐकण्यात आणि बोलण्यात भ्रष्टाचार हा शब्द वारंवार येत असतो. आणि आपण 'भ्रष्टाचाराविरुद्ध काहीतरी केलं पाहिजे' वगैरे म्हणत असतो. पण असे म्हणणारे बहुसंख्य लोक हे भ्रष्टच असतात. अर्थात अनेकांना याची जाणीवही नसते, की आपण भ्रष्ट आहोत. पण अज्ञानामुळे निरपराधित्व सिद्ध होऊ शकत नाही. तर भ्रष्टाचार थांबविण्यापूर्वी भ्रष्टाचार म्हणजे काय, तो कसा उद्‌भवतो इ. समजून घेणे महत्त्वाचे आहे. प्रथम भ्रष्टाचाराचे दोन प्रकार पाडता येतील: (१) जाणून बुजून केलेला वा टाळता येणारा (२) अजाणतेपणी व अनिच्छेने केलेला. यातला पहिला प्रकार हा अधिक गंभीर गुन्हा होऊ शकतो व त्या मानाने दुसरा सौम्य आहे. आपणा सर्वांच्या डोक्यात फक्त पहिलाच प्रकार असतो. दुसरा प्रकार आपल्या लक्षात न आल्याने किंवा सोयीस्कर रीत्या विसरल्यामुळे आपण स्वतःला भ्रष्ट मानत नाही. पण आपणही किरकोळ किरकोळ बाबीत भ्रष्टाचार करीतच असतो. उदाहरणे पाहिल्यास हे अधिक स्पष्ट होईल. अगदी साधी उदाहरणे पाहू. ज्या वेळी तुम्हाला काही कारणासाठी पोलीस पकडतो तेव्हा त्या गुन्ह्याची शिक्षा वा दंड टळावा म्हणून तुम्ही म्हणता, "साहेब, मिटवून टाका. चहापाणी करा." म्हणजे भ्रष्टाचाराला तुम्हीच सुरुवात करता. आता पोलिस स्वीकारतो हा त्याचा गुन्हा, पण सुरुवात तुमचीच! किंवा कित्येक नोकरी करणारे (विशेषतः सरकारी नोकर) दिवसातून ३० मिनिटांची सुट्टी किमान ६० मिनिटे घेतात हाही भ्रष्टाचाराचाच नमुना.

रोजचं पाहायचं झालं तर बसमधून प्रवास करताना कंडक्टर न आल्यास तुम्ही तसेच प्रवास करता व "तो आला नाही त्याला मी काय करू?" वगैरे म्हणता. हाही भ्रष्टाचार; आणि निर्बंध असलेल्या वस्तू उदा. रवा, तूप (आता नव्हे) किंवा रेशनहून जास्त पण बाजारभावापेक्षा कमी भावाने मिळालेली साखर यांची खरेदी हे भ्रष्टाचाराचे ज्वलंत नमुने आहेत. हुंडा घेणे, नोकरीला वशिला लावणे हाही भ्रष्टाचारच. या मुद्द्यांवर, "येवढसं केल्यानी काय होतं?" यासारखे प्रश्न विचारले जातात. पण छोट्या छोट्या गोष्टींनीच राष्ट्रातील एकूण भ्रष्टाचाराचे गांभीर्य वाढते.

## भ्रष्टाचार कसा वाढतो ?

भ्रष्टाचार कसा उद्‌भवतो. ते आपण पोलिसाच्या उदाहरणात पाहिलेच. आता तो कसा वाढतो किंवा बळावतो ते पाहू. पूर्वी एखाद्या सरकारी किंवा अन्य कचेरी कामे योग्य प्रकारे चालू असताना तुमचे काम लवकर होण्यासाठी तुम्ही संबंधित इसमाला अग्रक्रम डावलण्यासाठी खुषीने बक्षिसी देता. ते पाहून दुसराही देतो. पण पुढेपुढे अशी परिस्थिती होते की, तो इसम सर्वांकडूनच या 'खुषी'ची अपेक्षा ठेवतो— नव्हे तो ही 'खुषी' हा त्याचा हक्कच समजतो आणि अखेरीस 'गोमा गणेश पितळी दरवाजा' अशी स्थिती होते. म्हणजेच संबंधित इसमास व समाजासही याचे काहीच वाटत नाही. पुढे पुढे त्याची भूक वाढत जाते आणि मग ही भूक जेव्हा आवाक्याबाहेर जाते तेव्हा तुम्हाला त्याचे भ्रष्टत्व जाणवते.

पण आपण हे किती दिवस सहन करणार आहात? आता तुम्ही म्हणाल की भ्रष्टाचार हा भारताला नवा नाही. पेशवाई किंवा त्यापूर्वीचेही दाखले दिले जातील. मान्य

With Best Compliments From

SHAIL SCIENTIFIC
INSTRUMENTS CO.

6, Venu Apartments, B. J. Deorukhakar Road,
DADAR - 14.

आहे. पेशवाईपासून काय अगदी रामापासून भारतात भ्रष्टाचार आहे असे मानले तरी आपण तो परंपरा किंवा 'भारतीय संस्कृती' म्हणून तसाच चालू ठेवायचा काय? ज्याप्रमाणे एखादा लहानपणापासूनचा रोग किंवा वाईट सवय काही अलंकाराप्रमाणे बाळगली जात नाही त्याचप्रमाणे या परंपरेलाही "जाळुनि किंवा पुरूनी टाका" यलाच पाहिजे.

"ज्या ठिकाणी संत्र्यापासून मंत्र्यापर्यंत सर्वच (यात तुम्हीही आलातच) भ्रष्ट आहेत तिथे काय करणार?" असा फालतू प्रश्न निर्माण होईल याला उत्तर अगदी सोपं आहे. ते म्हणजे प्रथम तुम्ही स्वतः शुद्ध व्हा.

प्रत्येकासाठी स्वतःला म्हणजे एकाच व्यक्तीला सुधारायचे हा मार्ग जितका सोपा तितकाच कठीण.वर पाहिलेल्या दोन प्रकारांपैकी दुसऱ्या प्रकारचा भ्रष्टाचार नष्ट झाला की पुढील काम सोपे आहे. पण त्याला आवश्यक आहे ती तुम्हा आम्हा सर्वांची एकी. जर आपण एकत्रपणे ठरवलं की कोणीही कोणतीही कोणालाही रक्कम खुषीनी द्यायची नाही किंवा जी रक्कम आपण कोठेही देऊ त्याची पावती घ्यायची असं जरी एक महिनाभर केलं तरी आपणाला याचा परिणाम त्वरित दिसून येईल.

आजच्या भारताला भ्रष्टाचार मानवणारा नाही. कारण आपण गरीब आहोतच. पण आपल्या गरिबीचे प्रमाणही प्रचंड आहे. आपण स्वतःला मध्यमवर्गीय वगैरे म्हणत असलो तरी ते गाढवानी पांघरलेले कातडे आहे ही गोष्ट इथे नमूद करणे आवश्यक आहे.

इतके 'भ्रष्टचारायण' झाल्यावरही काहीजण विचारतीलच की "सरकार एथं काय करीत आहे?" तर सरकारनी या विरुद्ध अनेक धडपडी चालवल्या आहेत, पण सरकारनी काहीही केले तरी त्याला नागरिकांनी प्रतिसाद द्यायलाच हवा आणि सरकार किंवा सर्व सरकारी अधिकारी, कर्मचारी भ्रष्ट आहेत असे जरी मानले तरी याला कारण कोण तर तुम्हीच. कारण या लोकशाहीतील "यथा प्रजा तथा राजा" हे वाक्य बरोबर लागू पडते आणि सरकारी अधिकारी किंवा कर्मचारी म्हणजे तुमच्यापैकीच कोणीतरी, तेव्हा भ्रष्टाचाराविरुद्ध आंदोलन सुरू करायलाच पाहिजे. पण या आंदोलनाची पहिली पायरी म्हणजे स्वतःला सुधारा आणि मग विश्वसफाई वगैरे...

## क्रिकेट नबाब 'गॅरी'

'क्रिकेट बादशहा' गॅरी सोबर्स नुकताच आपल्या कसोटी दर्जाच्या सामन्यांतून निवृत्त झाला. क्रिकेटच्या प्रत्येक अंगात त्याने उच्च पराक्रमाने आपले नाव अजरामर केले आहे. तेव्हा त्याच्या प्रत्येक पैलूचे अवलोकन करणे प्रत्येक क्रीडाशौकिनाचे कर्तव्य आहे. थोडक्यात त्याचा कसोटी इतिहास पाहू या.

### १. कसोटी सामने

सोबर्स वेस्टइंडीजतर्फे एकंदर ९३ सामने खेळला. एक इंग्लंडचा कौड्री (१०९ सामने) सोडला तर कोणीदेखील त्याच्या इतका कसोटी सामने खेळला नाही. ९३ पैकी तो ८५ सामने लागोपाठ खेळला.

### २. कसोटी फलंदाजी

सोबर्सने ९३ सामन्यांतील १६० डावांत २१ वेळा नाबाद राहून ८०३२ धावा टोलवल्या. त्यात सर्वोच्च धावा नाबाद ३६५ आहेत. सरासरी ५७·२८. त्यात २६ शतके व २९ अर्धशतके सामील आहेत.

**संग्राहक : कांतिलाल छ. जैन** द्वितीय वर्ष वाणिज्य

With best Compliments from :

# SANGHVI METAL CORPORATION

Manufacturers of Industrial Quality

**COPPER, BRASS & ALUMINIUM**
**Sheets / Strips / Cricles**
**AND**
**RE-ROLLERS OF STAINLESS STEEL**

OFFICE & WORKS

159/2, Akurdi,
Bombay-Poona Road,
CHINCHWAD, Poona-19

Phone : 8449

BOMBAY OFFICE

**Sole Selling Agents**
M/s. Sanghvi Metal & Alloys Co.,
28, 1st Bhoiwada, Bhuleshwar Road,
BOMBAY-2
Phone : 334979

# आजच्या ' विज्ञान अभ्यासक्रमा 'बाबत

**प्रकाश शंकर बनसोड**, प्रथम वर्ष विज्ञान

नुकतीच एक बरीचशी चिंतनीय आकडेवारी माझ्या वाचनात आली. त्या आकडेवारीनुसार १९७३ अखेर देशात एकंदर बेकार ८२ लाख होते. पुढील वर्षी ( म्हणजे ७४ अखेर ) यात अजून २४–२५ लाख बेकारांची भर पडण्याचा अंदाज व्यक्त केला होता. सुशिक्षित बेकारांचे प्रमाण ४७ टक्के होते. एकंदर बेकार डॉक्टर्स व इंजिनियर्स यांची संख्या साधारणपणे ८५ हजार होती. पैकी डॉक्टर्स ६७४०, पदवी घेतलेले इंजिनियर्स ३१२० व पदविका धारण करणारे इंजिनियर्स ५५,००० होते. आश्चर्याची गोष्ट म्हणजे Institute of Applied Manpower, Research, New Delhi या संस्थेने संशोधनाअंती प्रसिद्ध केलेल्या अहवालामध्ये पाचव्या पंचवार्षिक योजनेच्या अखेर म्हणजे १९७८–७९ अखेर देशास डॉक्टर्स साधारणपणे १३,००० ते १९,००० व केमिकल इंजिनियरिंग सोडल्यास बाकी इतर शाखांना पदवीधर व पदविका धारण करणाऱ्या इंजिनियर्सचा कित्येक हजारांच्या घरात तुटवडा पडणार आहे, असे नमूद केले होते. या दोन आकडेवारींतील फरक का व कसा हे पाहणे हा एक निराळाच विषय होईल. विज्ञान पदवीधरांच्या बेकारीचे प्रमाण पाहिल्यास ते निश्चितच चिंताजनक आहे. १९७३ अखेर देशात २, २६,००० विज्ञान पदवीधर बेकार होते. विज्ञान पदवीधर बेकार असण्याचे सर्वात जास्त प्रमाण बंगालमध्ये होते. बंगालमधील विज्ञान पदवीधर बेकारांची संख्या ५०,२०४ आहे. त्या खालोखाल बिहार, उत्तर प्रदेश, केरळ इ. राज्यांचा क्रमांक असून महाराष्ट्राचा क्रमांक ८ वा लागतो. महाराष्ट्रात ११,७२४ विज्ञान पदवीधर बेकार आहेत. ही आकडेवारी वाचून माझ्या मनात विचार आला की, भारतासारख्या विकसनशील देशाला शेती व उद्योगधंदे यांमध्ये विज्ञानाची कास धरून बऱ्याच सुधारणा घडवून आणायच्या आहेत. अशा परिस्थितीत विज्ञान पदवीधर एवढ्या मोठ्या प्रमाणावर बेकार का ? आपल्या शिक्षणक्रमाचे तर कोठे चुकले नाही ना ? की हा दोष विद्यार्थ्यांचा आहे ? की औद्योगिक गरजा व शिक्षण यांत तफावत आहे ? यासारख्या काही प्रश्नांचा मागोवा घेण्याचा प्रयत्न या लेखात केला आहे.

काहीही अंतिम ध्येय न बाळगता केवळ पदवी पदरात पडेल, अथवा वेळ सत्कारणी लागेल, अगर नोकरीच्या संधी अधिक आहेत यासारखे हेतू बाळगून, शिकायचे म्हणून शिकायचे अशी विद्यार्थ्यांची भूमिका असू नये. शिक्षणातून मिळालेल्या ज्ञानाने जर स्वतःच्या पायावर उभे राहता येत नसेल, त्या ज्ञानाचा जर व्यवहारात फारसा उपयोग होत नसेल तर ते शिक्षण न घेतलेलेच बरे. आज Pure Sciences च्या बाबतीत थोडे फार असेच घडत आहे. इंजिनियरिंग किंवा मेडिकलच्या पदवीच्या तुलनेने विज्ञानाच्या पदवीचा व्यवहारात फारसा उपयोग होत नाही असे आढळते. शिवाय शास्त्रीय संशोधन Pure Sciences चे आकर्षक अंग होऊ शकेल. त्याकडे अभ्यासक्रमात बरेच दुर्लक्ष होत आहे.

भविष्यात आर्थिक स्थैर्याची काहीच शाश्वती नसल्याने, इच्छा असूनसुद्धा या क्षेत्राकडे चांगले हुशार, कर्तृत्ववान विद्यार्थी वळत नाहीत असे दिसते. शिवाय इंजिनियरिंग अगर Technology च्या तुलनेने या पदवीत मिळणारे ज्ञान फारच अपुरे, specialisation व perfection चा अभाव असलेले असे वाटते. त्यात बहुतेक तात्त्विक बाजूंचाच विचार जास्ती केला जातो. Job-oriented अगर practical utility च्या दृष्टीने फारच थोड्या गोष्टी शिकवल्या जातात. आजचा जो B. Sc. चा अभ्यासक्रम आहे, तो ५ वर्षांच्या इंजिनियरिंग अगर Technology च्या अभ्यासक्रमात पहिल्या २ वर्षांतच शिकवला जाऊन, या मूलभूत कल्पनांच्या साहाय्याने ज्या त्या शाखांत त्या विद्यार्थ्यांना इंजिनियरिंगची तत्त्वे शिकविली जातात. विज्ञान पदवीधराला तसे व्यवहारोपयोगी काहीच शिकविले जात नाही. पदवीधर डॉक्टर स्वतःचा दवाखाना काढू शकतो, इंजिनियर छोटासा कारखाना काढू शकतो. परंतु विज्ञान पदवीधराला अशा फारच थोड्या संधी उपलब्ध आहेत.

मूलभूत तांत्रिकज्ञान (Practical job knowledge of ability to apply ) हातांनी काम करायची इच्छा, इतर लोकांबरोबर काम करण्याची शक्ती, नेतृत्वाचे गुण, जबाब-

With Best Compliments From :

# NAVALAKHA AGENCIES

**Manufacturers' Representative**
**Dealers in**
**Kamdhenu Brand Manure Mixtures**
**and**
**Bhu-Paris**

1379, Bhavani Peth, 'Krishi Bhavan' Poona-2

Phone No. 26815, 26825

Cable : KAMDHENU

Telex : KAMPEST PN 393

With
Besr Compliments
From :

# Ashok Speakers

**Renowned for Prompt and a Reliable Service**

Junnarkar Datt Mandir,
Laxmi Road, Poona-30

Phone : 53057

TRY ONCE our delicious—
Fresh Fruit Juice & Milk shake
and visit always

# TRUPTI FRUIT JUICE HOUSE

- **Jumbo Ice cream**
- **Cold Drinks**
- **Fresh Fruit Juice**
- **Milk shake**

also accept parties & marriage's order
Contact—
1225/2 opp. Syndicate Bank,
Fergusson College Road,
Near Roopali Hotel,
Shivaji Nagar, Poona-4.
**Prop. Sudhakar D. Patil,** *B. Com.*

दारीची जाणीव, प्रभावी व्यक्तिमत्त्व, खेळ व इतर बाबतींतील आवड, विविध क्षेत्रांतील ज्ञान, उत्कृष्ट भाषाशैली, आपले विचार थोडक्यात, सोप्या भाषेत प्रभावीपणे इतरांना पटवून देण्याचे कसब इ. सारख्या गुणांची उद्योगधंद्यांतून विद्यार्थ्यांकडून अपेक्षा केली जाते. उद्योगधंद्यांच्या गरजा, अडचणी, नवीन संशोधन, रचना इ. ना यशस्वीरीत्या तोंड देऊन अडचणीच्या, संकटाच्या काळात (emergency deal) करू शकतील असे उमेदवार उद्योगधंद्याकडून अपेक्षित केले जातात. दुर्दैवाने आज या दृष्टिकोणातून अथवा हे गुण विद्यार्थ्यांमध्ये निर्माण होतील अशा रीतीने अभ्यासक्रमाची आखणी केल्याचे आढळत नाही. कदाचित अशा योजना निर्माण होत असूनसुद्धा सरकारी पैशाच्या पाठबळाच्या अभावामुळे, नियोजनाच्या अभावामुळे केवळ कागदावरच राहात असाव्यात. वस्तुस्थिती, निर्णय व त्यांची अंमलबजावणी, व ते करताना निर्माण होणाऱ्या अडचणी यांची सांगड घातली गेल्याचे दिसत नाही.

शैक्षणिक संशोधनाचा संपूर्णपणे अभाव हे कदाचित कारण मानता येईल. विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास होऊन कोटलीही अडचण तो यशस्वीरीत्या हाताळू शकेल अशा दृष्टीने अभ्यासक्रमात काहीच तरतूद नाही. शिवाय अशी पात्रता निर्माण करण्याची आकांक्षा विद्यार्थ्यांच्या मनात प्रकर्षाने ठसविणारी राजकीय, सामाजिक, आर्थिक परिस्थिती सभोवताली नाही. एखाद्याला जर उद्योगधंदा निर्माण करायचा झाला तर Economics, Commerce, Business Management and Administration Sociology, Industrial Psychology इ. ची मूलभूत माहिती विद्यार्थ्याला हवी व पुस्तकी तत्त्वे प्रत्यक्ष व्यवहारात उतरवता आली पाहिजेत. तर्कशुद्ध विचार करता आला पाहिजे. भूत व भविष्य काळातील घटनांचे अनुमान व आडाखे बांधून त्यातील अनुभवांवरून योग्य ते निष्कर्ष काढता आले पाहिजेत. कल्पनाशक्तीच्या जोरावर वेळीच धाडस करून किंबहुना प्रसंगी risk घेऊनसुद्धा पुढे पाऊल टाकता आले पाहिजे. योग्य ते निर्णय घेता यायला हवेत. प्रभावी भाषाशैलीने सर्वांची मने जिंकता आली पाहिजेत. हे गुण निर्माण करण्यात शिक्षण अयशस्वी ठरले आहे. विद्यापीठ शिक्षण म्हणजे भावी आयुष्याची पूर्वतयारी करण्याचा, वैयक्तिक सर्वांगीण विकास करण्याचा संक्रमणकाळ ही विचारसरणी कधीच लोप पावली आहे.

## झंझावाती फलंदाज

**३३० मिनिटांत ५१३ धावा.**

पर्थ येथे शेफिल्ड शिल्ड स्पर्धेत १ ल्या दिवशी २० नोव्हेंबर १९७० रोजी दक्षिण ऑस्ट्रेलियाने पश्चिम ऑस्ट्रेलियाविरुद्ध खेळताना ३३० मिनिटांत ३ बाद ५१३ धावा काढल्या. त्यात रिचर्डस्ट यांच्या नाबाद ३२५ धावांचा समावेश आहे.

**९० मिनिटांत १८९ धावा.**

इंग्लंडमध्ये नॉटस संघाच्या मॅलेटसन या फलंदाजाने उत्तुंग फलंदाजी करीत फक्त ९० मिनिटांत १८९ धावा काढल्या. त्यात ६ षटकार व २३ चौकारांचा समावेश आहे. पैकी २-१५ ते २-५५ दरम्यान १४२ धावा टोलवल्या.

**संग्राहक : कांतीलाल जैन** द्वितीय वर्ष वाणिज्य

परीक्षांत उत्तीर्ण होण्याच्या खटपटीत, विशेष काही न करता वाया गेलेली सळसळत्या तारुण्यातील मौल्यवान ४ वर्षे, बेकारांना लाभलेला तात्पुरता आसरा असे जे समीकरण होऊ पाहात आहे, होत आहे, ते फार गंभीर व धक्कादायक आहे. समाजजीवनापासून जवळजवळ अलिप्त असलेला स्वतःच्याच कल्पनाविश्वात रममाण असणारा विद्यार्थी जेव्हा स्वतःच्या पायावर उभे राहण्यासाठी, स्वतंत्रपणे आयुष्यात पदार्पण करतो. तेव्हा बाकीच्यांच्या दृष्टीने विद्यार्थ्यांची, त्यांच्या पदवीची, कार्यक्षमतेची किंमत काहीच नसते. आपल्या ज्ञानाचा विशेष काही उपयोग नाही अशा क्षेत्रात करावा लागणाऱ्या नोकरीने विज्ञान पदवीधरांत निर्माण होणारे frustration चिंतनीय आहे. या सर्व गोष्टींचा विचार करून अभ्यासक्रमाची आखणी झाली पाहिजे. कोठेतरी किंवा थोडा फार, maturity आल्यानंतर विद्यार्थ्यांच्या, निरनिराळ्या क्षमतांची, सुप्त गुणविकासांची, नेमून दिलेले विषय त्याने कितपत रस घेऊन किती खोल पातळीपर्यंत अभ्यासलेले आहेत, याची सखोल रीत्या मूल्यमापन करू शकेल अशी परीक्षा झाली पाहिजे. Mass Education च्या या काळात mob मुळे खालावणाऱ्या

Be a Champ with

# *Champion Sports*

Deccan Gymkhana,
Poona - 4

Contact—

## INTIMATE ADVERTISING & PAINTING

* RUBBER STAMPS
* SIGN BOARD
* CINEMA SLIED

12 Budhwar Peth,
Near Santosh Bhuvan,
POONA 2

## L. D. BHAVE & SONS

**'Burshane' Agents,
Poona-4**

also Authorised Dealers for
'PHILIPS' Lamps & Tubes,

Genuine 'PHILIPS' Lamps & Tubes sold– both in wholesale & retail at most competitive rates.

Now available at our
Deccan Gymkhana & Camp
Show Rooms.

दर्जाच्या वेळी असा bulk किंवा mob वेगळा करून सतत होणारे degradation थांबविले पाहिजे. कारण अशा परिस्थितीत विद्यार्थ्यांची ध्येये फारच low असतात. परीक्षा पास होणे हेच केवळ ध्येय असल्यामुळे विषयात तेवढ्या-पुरतीच गोडी असते, नवीन अवांतर असे काही जाणून घ्यायची इच्छा नसते. स्वतःच्या हिंमतीवर सर्व तयारी करायची जिद्द, ईर्ष्या असत नाही, तेवढी क्षमताही नसते, प्राध्यापकांकडून परीक्षेच्या दृष्टीने उपयोगी अशा टीपा आयत्या मिळाव्यात एवढीच विद्यार्थ्यांची त्यांच्याकडून अपेक्षा असते. शिकविलेल्या ज्ञानाचा विद्यार्थ्यांकडून काहीच प्रतिसाद मिळत नाही. अशा एकंदरीत निरुत्साही, irresponsive विद्यार्थ्यांना व एकाच वेळी निरनिराळ्या क्षमतेच्या मुलांना साधारणपणे एकच ढोबळ पद्धतीने शिक-विण्यास प्राध्यापकही नाखूष असतात. त्यांच्या वैयक्तिक हुषारीचा, निरनिराळ्या गुणांचा, व्यासंगांचा, अनुभवांचा, विषयाला संबंधित अशा जास्ती माहितीचा काहीच उपयोग होत नाही. एका अर्थाने ही निरुत्साही परिस्थिती त्यांच्याही वैयक्तिक विकासास थोडीफार बाधक ठरू शकतेच. अद्वितीय, असामान्य, अशा gifted students ना विशेष दर्जाचे शिक्षण मिळू शकत नाही व एका प्रकारे त्यांचीही प्रगती रोखली जाते. इंजिनियरिंग किंवा मेडिकलला जे जाऊ शकले नाहीत एवढेच विद्यार्थी फक्त पदवी अभ्यासक्रमांकडे जातात असे जे समीकरण होऊ पाहात आहे ते धक्कादायक आहे. वास्तविक विज्ञानाची सारी इमारत विश्वाची रहस्ये शोधून जीवन समृद्ध व अधिक सुसह्य करण्याच्या आशा-वादावर उभी आहे. या इमारतीचे पायाचे दगड म्हणजेच विज्ञानपदवीधर जर कमकुवत, निरुत्साही, अकार्यक्षम असतील, तर हा डोलारा उभा करणे फार जड जाईल.

मोठ्या प्रमाणावर बाहेर पडणारे पदवीधर, बेकारी ' त्यातून येणारे frustration, त्यातून निर्माण होणारा असंतोष इ. नी सामाजिक व आर्थिक व्यवस्थेस बराच मोठा धक्का पोचण्याची शक्यता आहे. आहे हे ठीक आहे असे म्हणून चालू अभ्यासक्रमच जर चालू ठेवले तर देशाचा भविष्यकाळ, अस्थिर व निराशाजनक आहे व अशा एखाद्या अग्निदिव्यास तोंड द्यायची तयारी ठेवली पाहिजे त्याची रूपरेषा आज अज्ञात आहे.

# ' हे असंच '

**मुकुंद संगोराम**, पदवीपूर्व वाणिज्य

तिसरा तास संपतो आणि अंगाला आळोखे पिळोखे देत मुलं बाहेर येतात आणि लँडिंगमध्ये आकाशात मध्येच दिसणाऱ्या काळ्या ढगाप्रमाणे रेंगाळत राहतात. मग बहुतेक जणं ' कँटिन 'च्या मार्गाकडं.

शांत वातावरण आता गजबजू लागतं. गर्दी होते. सर्व टेबलं भरून जातात. मॅच चालू असल्यानं एखादा ट्रॅन्झिस्टर चालू असतो. आम्हीही एका टेबलाभोवती. जणू ' राऊंड टेबल कॉन्फरन्स'च ! मधूनच एखादा अगांतूक ओरडत येतो,

" अरे गावस्कर इंजर्ड ! इंजिनियर इंजर्ड " आमच्या टेबलाभोवती गर्दी.

" म्हणजे इंडियात राह्यलं काय ? सालं ! आपलं लकच वाईट रे ! "...आमच्यापैकी एक.

" ॲहॅरे वाईट ! आपल्याला खेळता येत नाही ते सांग. म्हणे लकच वाईट..." इत्यादी इत्यादी...दुसरा एक.

आताशा वातावरणाला रंग चढू लागतो. समोर गरमा गरम (?) चहा येतो आणि गप्पांना रंगत येऊ लागते.

" काल पिक्चर पाह्यलं. "

" कोणतं रे ! " सगळेजण कान टवकारून पुढे होतात.

" रजनीगंधा " ...तो.

" कसंय रे ! "...एक.

" बराय ! "...तो " ॲक्टिंग चांगलं, संगीत बरं, डायरेक्शन सोसो "...वगैरे वगैरे रिमार्क्स पास होतात.

" काय ' रजनीगंधा ' आणि बराय ! " तो तीन ताड उडालेला असतो.

" लेको आर्ट कशाला म्हणतात ते तुम्हाला नाही कळायचं, कोणी तरी म्हटलं की ' अनुभव ' बरा की निघाले ओरडत. [ ' इनडायरेक्ट कला म्हणजे काय ? हे समजून घ्यायचे असेल तर माझ्याकडे या'चा रोख. ]

" आर. डी. हल्ली भिकार संगीत द्यायला लागलाय रे"

एक उगाचंच.

"बरोब्बर, चालीच्या यंत्रातून नुसता चाली चे प्रॉडक्शन करतो अन् काय..." जणू हे त्यांचे पी. ए. ( याने कि पर्सनल असिस्टंट )

"हो का! मग अमर प्रेमचं संगीत काय त्याच्या XX नं दिलं आहे होय रे!..." एक आर. डी. शौकीन.

एकंदरीत पंचमला ( म्हणजे आपला आर. डी. हे 'सुज्ञासी अधिक सांगणे न लगे ) सुद्धा माहीत नसेल इतकी 'बाचाबाची' चाललेली असते.

"परीक्षा जवळ आलीय रे"...एक जण पचकतोच.

सारेजण तुटून पडतात. त्याला बेजार करतात. तो बापुडा गप्प.

एकंदरीत परीक्षा, अभ्यास, पिरियडस् वगैरे सोडूनच म्हणजे अगदी गंगेत. ( कशाला मुळा-मुठा चांगल्यात की! )

"त्या हाजीला पकडलय रे!" एक जण आपलं 'जनरल नॉलेज' उघडं पाडतो.

"माझं मत असं आहे की त्याला पकडून ठेवून काय स्मगलिंग थांबणार आहे थोडंच!".. एक तज्ज्ञ.

एव्हाना वातावरणाला चहाचा रंग चढलेला असतो. आणि समोरचा चहा? गार ( म्हणजे कोल्ड टी! ) झालेला असतो. इतर काहीबाही ( म्हणजे अगदी काही तरीच! ) बोलत बोलत टी. पी. ( टाईमपास ) करतात.

घड्याळातले काटे सव्वादोनच्या दिशेने 'वाटचाल' करीत असतात आणि मग वातावरणात बदल होऊ लागतो. मग एकेकजण उठायच्या तयारीत.

'बिल' भरण्याची पंचाईत! ( कारण कॅन्टिन हे फुकट्या साठी...वगैरे वगैरे. ) तेवढ्यात एखादा नवखा पोर येतो आणि आमच्यात मिसळतो. त्याचं 'यथोचित' स्वागतही होतं. त्याला चहाही मिळतो. मग येणारं बिल त्याच्याच तोंडावर फेकून सर्वजण पीरियडकडं धावतात (?). त्याचा चेहरा नको इतका चांगला होतो.

बाहेरच्या बाजूस—

"पुढचा तास कोणाचाय रे!"...एकजण आपलं 'अफाट' अज्ञान (की ज्ञान) प्रकट करतो.

"XXX चा आहे"...एक तज्ज्ञ.

"अरे, मग बसले पाहिजे...प्रेझेंटी असते."

"म्हणजे प्रेझेंटी म्हणूनच बसणारायस होय."

"अँहॅ आलाय मोठा अभ्यास करणारा!" इत्यादी इत्यादी.

काहीजण अजूनही रेंगाळतात, काहीजण मात्र धावतच निघून जातात, परंतु एकंदरीत तास बुडवायचाच असं ठरतं. परत तरतरी...जोम...उत्साह...वगैरे.

परत "मठात" प्रवेश. आता मात्र 'कोल्ड टी' चे कप समोर येतात. वातावरण त्याच टेबलाभोवती रुंजी घालू लागते. 'गंभीर' वातावरणात ती कुजबूज भर टाकीत असते. गर्दी तुरळकच! एखादाच येणारा. जाणारे कमीच म्हणजे जणू 'संध्याकाळचा कट्टाच'.

परत परत पॅट...इंजिनियर,...सिनेमा, संगीत...अभ्यास ( छे! )...पीरिएडस...वगैरेंची चर्चा होत रहाते...ते वातावरण तसंच रेंगाळत तिथंच राहतं...बंदिस्त.

## क्रिकेट नबाब 'गॅरी'

### ३. कसोटीबळी

सोबर्स याने २३५ फलंदाजांना आपल्या गोलंदाजीवर बाद केले. त्यात १२० इंग्लिश, ५९ भारतीय, ५१ ऑस्ट्रेलियन, १९ न्यूझीलंडमधील व ४ पाकिस्तानी फलंदाज आहेत. एका डावात ५ वर बळी त्याने ६ वेळा घेतले आहेत.

### ४. कसोटी झेल

सोबर्स याने कसोटीत ११० झेल घेतले आहेत. एक कौड्री ( ११७ ) सोडला तर तेवढे झेल कोणाला मिळाले नाहीत. त्याने ४० इंग्लिश, २७ भारतीय, २७ ऑस्ट्रेलियन, १२ न्यूझीलंडचे व ४ पाकिस्तानी फलंदाजांचे झेल घेतले.

**संग्राहक : कांतीलाल छ. जैन** द्वितीय वर्ष वाणिज्य

# स्वामी रामतीर्थ

✤

**डी. एन. निसाळ** तृतीय वर्ष साहित्य

स्वामी विवेकानंदांप्रमाणेच अखिल जगतात धर्मप्रसार करून व्यावहारिक वेदान्ताचा बोध करणाऱ्या रामतीर्थांचा जन्म २२ ऑक्टोबर १८७३ रोजी पंजाबमधील गुजराणवाला जिल्ह्यातील मुरलीवाला या गावी झाला. त्यांचे मूळचे नाव तीर्थराम, परंतु संन्यासग्रहणानंतर रामतीर्थ, म्हणून हे प्रसिद्धीस आले. गोस्वामी तुलसीदासांच्या घराण्यात तीर्थरामांचा जन्म झाला. स्वामी रामतीर्थ हे आंतरराष्ट्रीय कीर्तीचे साक्षात्कारी पुरुष, तत्त्वज्ञानी, धर्मप्रसारक व कवी होते.

गुजराणवाला हायस्कूल, लाहोर फॉर्मन खिश्चन कॉलेज, गव्हर्नमेंट कॉलेज, लाहोर येथे शिक्षण घेऊन यांनी गणिताची एम्. ए. पदवी संपादन केली. सियालकोटच्या मिशन-हायस्कूलमध्ये व लाहोरच्या मिशन कॉलेजात गणिताचे अध्यापन करून रामतीर्थांनी कीर्ती मिळविली. मूळच्या आध्यात्मिक व पारमार्थिक प्रवृत्तीस मानवेनाशी झाली म्हणून त्यांनी नोकरी सोडून दिली. विवेकानंदांच्या व्याख्यानांनी हे प्रभावित झाले. सर्व संगपरित्याग करून त्यांनी हिमालयाचा प्रवास केला. संन्यास घेतल्यानंतर स्वामी रामतीर्थ धर्मप्रसारासाठी प्रवृत्त झाले.

सन १९०२ मध्ये आंतरराष्ट्रीय धर्मपरिषदेत भाग घेण्यासाठी रामतीर्थ जपानला गेले. उर्दू, पारशी, इंग्रजी, या भाषांवर त्यांचे प्रभुत्व असल्याने त्यांच्या पांडित्याचा व कवित्वाचा प्रभाव फार मोठ्या प्रमाणावर पडत राहिला. वेदान्त व धर्मविचार यांवरील येथील व अमेरिकेतील त्यांची व्याख्याने ' In woods of God-realization ' नावाच्या ग्रंथात प्रसिद्ध असलेली आज वाचावयास मिळतात.

स्वामी रामतीर्थ नेहमी असे म्हणत की– " मी भरतखंड, अखिल भरतखंड आहे. भरतभूमी माझे शरीर आहे. कन्याकुमारी माझे पाय व हिमालय हे माझे शिर! माझ्या केसांतून भागीरथी वाहते. माझ्या मस्तकातून ब्रह्मपुत्रा व सिंधू नद्या उगम पावतात. विंध्याचल हा माझा कंबरपट्टा आहे. कारोमंडल हा माझा उजवा व मलबार हा माझा डावा पाय आहे. अखिल मानव जातीस आलिंगन देण्यास माझे हात सिद्ध आहेत. "

वेदान्त व समाजसत्तावाद, गृहस्थाश्रम आणि आत्मसाक्षात्कार, रोख धर्म, टीका आणि विश्वव्यापी प्रेम, गणिताच्या अध्ययनाचे महत्त्व, आत्मकृपा, राष्ट्रीय धर्म, भारतवर्षापुढील प्रश्न, भारतीय भवितव्य, सुशिक्षित जगाला आर्यभूचे आध्यात्मिक ऋण, अशी त्यांची अनेक विषयावरील व्याख्याने आजही मार्गदर्शक होतील. Rama's Note-books, Heart to Rama, Poems of Rama, Parables of Rama, इ. त्यांचे ग्रंथही वाचनीय, प्रोत्साहक व चित्त शांतिदायक आहेत. अशा ग्रंथांची आज आम्हा सर्वांना नितांत गरज आहे. अध्यात्म हे भारताचे वैशिष्ट्य आहे. आध्यात्माशिवाय मानवी जीवनाला पूर्णता येणार नाही. जर आपला आध्यात्मिक विकास झाला नाही तर आपल्या जीवनात काही तरी अपूर्णता खास राहील. आजच्या विद्यार्थ्यांना देखील अध्यात्माची प्रेरणा मिळाली पाहिजे. आध्यात्माचा थोडा तरी विचार आपण नियमित करायला पाहिजे.

आज मानवाची स्थिती शिशिर ऋतूतील एखाद्या दुबळ्या माणसासारखी झाली आहे. काही दशकांपूर्वी रूसो या तत्त्ववेत्त्याने असे म्हटले आहे की " Man is born free but everywhere he is bound in chains " मानव अध्यात्मापासून दूर दूर चालला आहे. मनुष्याच्या जीवनात यशापयशाचे चढउतार नेहमी येत असतात. तमोप्रधान [ Iron aged ] अवस्थेमुळे केवळ मनुष्यमात्रच नाही तर पशुपक्षी आणि पाच तत्त्वांची प्रकृती हे सुद्धा दूषित झाले आहेत. या संसारात जी सुख आणि शांतीची साधने समजली जातात त्यांनी दुःख आणि अशांतीच प्राप्त होते. म्हणूनच ' नरेचि केला हीन किती नर ' असे दुःखाचे उद्गार कवीने काढले आहेत. एकाच्या तामस प्रवृत्तीचे परिणाम अंततोगत्वा सर्वांनाच भोगावे लागतात.

मुंबई, बंगाल, मथुरा, वृंदावन, गंगोत्री, जमनोत्री, जयपूर पुष्कर, लखनौ, हरिद्वार इ. ठिकाणी रामतीर्थांचे वास्तव्य असे. हिमालयाच्या निसर्गरम्य संगतीचा एकान्तवास त्यांना पसंत पडे.

## झंझावाती फलंदाजी

**३३० मिनिटांत ४५५ धावा.**

१९३४ साली लिडस्ट मैदानावर दुसऱ्या दिवसा-अखेर ऑस्ट्रेलियन संघाने इंग्लंड संघाविरुद्ध कसोटीत खेळताना १ बाद ४५५ धावा काढल्या. त्यात डॉन ब्रेडमनच्चे नाबाद त्रिशतक समाविष्ट आहे

**२२७ मिनिटांत २९६ धावा.**

१९६३-६४ मध्ये प्लंकेट शिल्ड सामन्यात खेळताना जॉन रिड या न्यूझीलंडच्या फलंदाजाने फक्त २२७ मिनिटांत २९६ धावा टोलवल्या. त्यात १५ षटकार व ३५ चौकारांचा समावेश आहे.

**४५ मिनिटांत ११३ धावा.**

सरे तर्फे नाथम्टनशायर विरुद्ध खेळताना १९२० साली पै. जी. फेडर याने अवघ्या ४५ मिनिटांत नाबाद ११३ धावा टोलवल्या. त्यात ५ षटकार व १७ चौकारांचा समावेश आहे.

**संग्राहक : कांतीलाल जैन** द्वि. वर्ष वाणिज्य

( १७ ऑक्टोबर १९०६ रोजी त्यांनी आपला देह गंगेत समर्पण केला. ) त्यांनी मराठी–हिंदी या भाषेमध्ये अनेक काव्ये लिहिली.

हम सूखे टुकडे खायेंगे । भारत परवारी जायेंगे
हम सूखे चने चबायेंगे । भारत की बात बनायेंगे ।
हम नंगे उम्र बितायेंगे । भारतपर जान मिटायेंगे ।
सूळोंपर दौडे जायेंगे । आनंद की झळक दिखायेंगे
सब रिश्ते नाते तोडेंगे । दिल एक आलम संग जोडेंगे।।
सब विषयोंसे मुँह मोडेंगे । सर सब पापोंका फोडेंगे ।।

या हिंदी काव्यावरून त्यांच्या मनामध्ये सळसळत असलेली देशाबद्दलची अस्मिता, प्रेम आणि त्यागाची भावना स्पष्ट होते. ते जितके तत्त्वज्ञानी, धर्मप्रसारक व कवी होते तितकेच ते कट्टर देशभक्तही होते. ते असे म्हणतात की, 'भारतात असलेल्या सर्व संस्था, संघटना, रामाच्याच आहेत. राम यांच्यातर्फे काम करील. ख्रिश्चन, आर्यसमाजी, शीख, हिंदू, पारशी आणि मुसलमान हे सर्व माझे बांधव आहेत. या भारतभूमीच्या धान्यावर पोषण होऊन ज्यांचे मांस, चरबी, अस्थी यांची घडण झाली आहे ते सर्व माझे बांधव आहेत. नुसते बांधव नव्हेत, तर ते माझ्याशी एकरूप झाले आहेत.

'हजारो कृष्ण किंवा ख्रिस्त जगात अवतरले, तरी आत्मज्ञान संपादन करण्याचा तुम्ही स्वतः प्रयत्न केल्या-शिवाय त्याचा तुम्हाला यत्किंचितही उपयोग होणार नाही. या धर्मात प्रवेश कर, किंवा त्या धर्माची कास धर, ख्रिस्ताची उपासना कर किंवा कृष्णाची भक्ती कर, असल्या केवळ बाह्य उपचारांनी तुमचा कोणता कार्यभाग साधणार ? प्रकाश ! प्रकाश ! प्रकाश !—म्हणजेच जिवंत ज्ञान आणि जिवंत श्रद्धा हाच एक उपाय आहे.—प्रकाश याचा अर्थ अपरोक्षानुभूती. आत्मसाक्षात्कार. इतक्या दर्जाला जाऊन पोहोचला पाहिजे की, जगातील सर्व शरीरे आकारशून्यवत होऊन जावी."

'अज्ञानाचा नाश म्हणजेच ईश्वराची भेट. व अशी स्थिती झाली म्हणजे सर्व प्रकारची भीती आणि चिंता यांच्यापासून तुम्ही अलिप्त राहाल.'

लोकसंख्येच्या बेसुमार वाढीबरोबर व्यवहारज्ञानाचा अभाव हा भारतवर्षापुढे सध्याच्या काळी मोठा बिकट प्रश्न उपस्थित झाला आहे. व्यवहारज्ञानाच्या अभावामध्ये शारीरिक कष्ट करण्याचा तिरस्कार, जाती, पंथ यांच्या संबंधाचे अस्वाभाविक निर्बंध, परदेशगमनाबद्दलची पराङ्-मुखता, बालविवाह, आणि शारीरिक, बौद्धिक वगैरे बाबतीत स्त्रीसमाजाला अज्ञानांधकारात दडपून टाकणारे नियम वगैरे. या सामाजिक त्रुटींवर रामतीर्थांनी हल्ला चढविला. आपल्या प्राचीन पूज्य पूर्वजांकडून वंशपरंपरेने लाभलेल्या ज्ञाननिधीवाचून आपले चालणार नाही; कारण, जो समाज आपल्या प्राचीन परंपराप्राप्त संपत्तीला लाथाडून देतो, त्याच्या-वर बाहेरून आपत्ती कोसळून त्याचा नाश होणे अपरिहार्य आहे. तसेच ज्या समाजात प्राचीन वैभवाचा फाजील अभिमान वावरू लागतो असा समाज अंतर्गत कलहाला बळी पडलाच म्हणून समजा ! ( कोणतेही राष्ट्र वैभवसंपन्न होते ते त्यामधील मोठ्या माणसांच्या क्षुद्र विचारांमुळे होत नसून क्षुद्र माणसांच्या प्रगल्भ विचारांमुळे होत असते. ) असे सिद्धांत रामतीर्थांनी मांडलेले आहेत. ते या देशाला आजही उपयोगी पडतील.

# नाटकाचा समाजावर होणारा परिणाम

✣

**अजित दरेकर,** द्वि. व. सा.

नाटक हा एक मनोरंजनाचा वाङ्मयीन प्रकार. नाटक ही एक कला आहे ज्यात असतं जीवनाचं दर्शन. नाटकाची सर्वसाधारण दोन मूल्ये असतात. एक वाङ्मयीन आणि दुसरे रंगभूमीवरील. या दोन्ही मूल्यांचा विचार करता नाटकाचे यश-अपयश हे दोन्ही अंगांवर आहे. नाटक ही कलाकृती जेव्हा लेखक सादर करतो तेव्हा लेखकाचा दृष्टिकोण, तसेच त्याची लिहिण्याची कुवत आणि त्याला असलेली अनुभूती या सर्व गोष्टी ध्यानात घ्याव्या लागतात. कलाकार हा नाटक स्वतःसाठी लिहितो का समाजासाठी लिहितो, हा एक वादाचाच प्रश्न आहे. कारण कलेसाठी कला म्हणणारे या वादाला डोक्यावर घेतील. समजा, नाटककार नाटक हे कलेसाठी लिहीत असेल तर त्याला कोणती फूटपट्टी लावली असता त्याचे मूल्यमापन होईल हे समाजाने ठरविले पाहिजे. सत्यं, शिवं, सुंदरं ह्या तीन मूल्यांना ह्या क्षेत्रात फार किंमत दिली जाते. ह्याच तीन मूल्यांवर नाट्यपरीक्षण केले जाते. नाटकाचा समाजावर परिणाम होतो की नाही हा एक वादाचा मुद्दा आहे. काही लोक म्हणतात, नाटकाचा समाजावर परिणाम होतो तर काही हे नाकारतात. थोडा वेळ हा वाङ्मय क्षेत्रातला वाद बाजूला ठेवला तर काय दिसेल—(एक) आपण असे विधान करूच शकत नाही की नाटकाचा समाजावर परिणाम होत नाही; कारण मानसशास्त्राच्या दृष्टिकोणातून बघता थोड्या अंशी परिणाम घडणे शक्य वाटते. मनोविकृती असणाऱ्यामध्ये तो काही अंशी अधिक भासेल, पण असा परिणाम निश्चितच घडत असला पाहिजे. आता दुसरा मुद्दा जर परिणाम घडत असेल तर तो चांगला घडतो का वाईट ? तर त्या त्या नाट्यकृतीवर तो अवलंबून आहे. त्यामुळे सखाराम, घाशीराम, अवध्य, गार्बो ह्या नाटकांना प्रचंड गर्दीतही तसाच प्रचंड विरोध आहे आणि जेव्हा विरोध उत्पन्न होतो तेथे प्रतिकारशक्ती वाढते. आता असा विचार येतो की ह्या सर्व नाटकांचा खरंच समाजावर एवढा परिणाम होतो आहे का ? मग असं असतानाही त्याला एवढा प्रतिसाद का ? त्याचं उत्तर 'पसंद अपनी अपनी खयाल अपना अपना'. जर सखाराम–घाशीराम यांचा समाजावर होणारा परिणाम मान्य केला तर पर्यायाने त्या नाटककाराचे नाट्यक्षेत्रातील श्रेष्ठत्व मान्य करणे भाग पडेल हे विरोधकांच्या लक्षात येतच नाही. ज्या नाटकाला वाङ्मयीन काही मूल्य नाही त्या नाटकाच्या संदर्भात केवळ शिवाच्या कल्पनेची फूटपट्टी त्याला लावून उगीचच मोठेपण दिल्याचा भास मग सातत्याने होतो. काही लोकांच्या मते आज दोन वर्षे ह्या नाटकाचे शेकडो प्रयोग ह्या महाराष्ट्राच्या राजधानीत गर्दीने होत आहेत. तरी देखिल मुंबईत 'सखाराम बाइंडर' समाजात वावरला नाही किंवा समाजाचा 'सखाराम' झाला नाही. काही लोक सखारामाला सावरताना म्हणतात, जीवनाचं सत्य दर्शन, नागव्या वस्तुस्थितीचं नागवं चित्रण रंगभूमीवर दाखवले तर काय बिघडते. समाजात असे हजारो सखाराम असताना तेंडूलकरांच्या एका सखारामामुळे साऱ्या नीतिमूल्यांच्या कल्पना ढासळणार आहेत काय ? समाजात दिसणाऱ्या ठिकठिकाणी असणाऱ्या विशिष्ट मनोवृत्ती आणि प्रवृत्तींचे सत्य चित्रण म्हणजे सखाराम. पण खरंच विचार केला तर एका नाटकाने आपली संस्कृती, नीतिधर्म ह्या सर्व धुळीला मिळत असतील तर नक्कीच ते नाटक श्रेष्ठ व आपल्या नीतिमूल्याच्या कल्पनाच कमी प्रतीच्या मानाव्या लागतील. वेदकाळापासून जपलेल्या नीतिमूल्याच्या कल्पना एकटा सखाराम-घाशीराम तोडण्यास समर्थ आहेत का ? जाता जाता आठवण होते. डॉ. सहस्रबुद्धे यांची 'नरोटीची उपासना'. अशी किती दिवस आपण करणार आहोत ? वरवर दिसणारी दर्शनिक नीतिमूल्ये जपण्यात आपला धर्म बुडाला आहे आणि आहे तो काय

अशा नाटकांनी आता बुडणार का? अशी भीती वाटत आहे. कारण आज हजारो वर्षे झाली तरी आपल्या भोळ्या भाबड्या नीतिमूल्यांच्या कल्पना ह्या स्त्रीसंलग्नच आहेत. स्त्रीसंलग्न नीतिमूल्यांच्या आणि संस्कृतीच्या कल्पना थोड्याशा बाजूला टाकल्यावर काय दिसेल?—हो, मग आमच्या पुरुषांवरच तो नीतिमूल्यांचा बोजा पडेल ना!

जर नाटकाचा सामाजिक जीवनावर परिणाम होत असेल तर चांगली तेवढी नाटके चालली असती म्हणजे 'दुर्वांची जुडी' सारखी पण वस्तुस्थिती अशी आहे की हजारो 'एकच प्याल्याचे' प्रयोग होऊनही लाखो प्याले (भरलेले) रिकामे होत आहेत. दारुबंदी उठणे राहो पण सुधाकर पितो कसा हेच बघून लोक जात आहेत. नाटकाचा मुख्य हेतू येथे सफल झाला नाही असे नाही. एकच प्याला समाजावर काय परिणाम घडवितो का? काही फार थोड्या अंशीच तो घडत असेल. म्हणजे फार फार तर खूप पिणारा सिंधूची दशा बघून रडला असेल पण नक्कीच पुन्हा 'प्याला' असेल – नाटकाचा समाजावर होणारा परिणाम लक्षात घेताना सर्वसाधारण नाटकाचा संबंध समाजातील कोणत्या वयोमर्यादेच्या व्यक्तीशी येतो, तर तो पूर्णत्वाच्या मार्गावर असलेल्या (म्हणजे मानसिक दृष्ट्या) १६ चे पुढे वयोमर्यादा असलेल्याशी. आता समाजावर जर नाटकाचा वाईट परिणाम होत असेल तर विश्वात नाटकापेक्षा कित्येक वाईट परिणाम घडविणाऱ्या गोष्टी आहेत. त्याचा विचार करता नाटकाचा समाजावर एक टक्कासुद्धा परिणाम होत नसेल. तरीसुद्धा या गोष्टीचा विचार करता समाजाच्या परिणामाची बाब मध्ये घालून कलाकारावर सामाजिक बांधीलकीची भाषा लोक करू लागलेत. नाटक हा वाङ्मयीन प्रकार अस्तित्वात येऊन शंभराच्या वर वर्षे झाली नाहीत तोच-त्यांच्यावर म्हणजे नाटककारावर सामाजिक बांधीलकीची भाषा निर्माण होते म्हणजे काय? हजारो वर्षे वेद, धर्मग्रंथ ह्यातून चांगलं शिव असं विचाराचं अमृत पाझरत असताना एकदम त्याचं दोनतीन नाटकांत विष व्हावं.

परिपक्व समाजावर तसा नाटकाचा फारसा परिणाम होत नाही आणि झाला तर तो त्याच्या मनोदौर्बल्यामुळेच. हजारो नाटकांचा परिणाम गणिती दृष्ट्या हजारो पटीत असताना तीन-चार वाईट समजल्या जाणाऱ्या नाटकांचा परिणाम त्या दृष्टिकोणातून एक टक्काही नाही.

या सर्व मुद्द्यांचा विचार करता नाटकाचा सामाजिक जीवनावर—आजच्या धावत्या जगाचा व इतर अनेक जीवनावश्यक बाबींमध्ये गुरफटलेल्या समाजाचा विचार करता फारसा चांगला वाईट परिणाम घडत नाही. घडतो तो फार अल्प असा असतो, असेच म्हटले पाहिजे.

## क्रिकेट नबाब गॅरी

### ५. कसोटी कर्णधार

सोबर्स ३९ सामने विंडीजचा कर्णधार होता. पैकी त्याने ९ सामने जिंकले, १० सामने हरला. एक इंग्लंड-मधील मे (४१ सामने) सोडल्यास इतर कोणीदेखील त्याच्याइतका कर्णधार झाला नाही.

### ६. नाणेफेक जिंकणे

सोबर्सने ३९ सामन्यात २७ वेळा नाणेफेक जिंकली. संपूर्ण मालिकेत नाणेफेक जिंकण्याचे दोनदा श्रेय एकमेव त्याच्या नावी आहे.

१. इंग्लंडविरुद्ध १९६६ साली.

२. न्यूझीलंडविरुद्ध १९७१–७२ साली.

**संग्राहक : कां. जैन** द्वि. वर्ष वाणिज्य

# जीवन–छटा

✤

**उत्तम काळे**, तृ. व. वाणिज्य

निसर्ग प्रत्येक काळात प्रत्येक ऋतूत त्या काळाचं आणि ऋतूचं वैशिष्ट्य दाखविणारं सौंदर्य देतो. दिवस उजाडल्यापासून तो रात्रीचं पांघरूण पडेपर्यंत अन् जन्माच्या प्रभातापासून तो मृत्यूच्या रात्रीपर्यंत जाणारं माणसाचं आयुष्य म्हणजे सतत बदलणाऱ्या जीवनछटांच्या माळा असतात. त्या इतक्या सहज येतात आणि इतक्या हळूवारपणे जातात की येताना त्यांची चाहूल आपणाला लागत नाही किंवा जाताना त्यांची पावलं वाजत नाहीत.

काही वेळेला आपल्याला कल्पनाही येणार नाही अशा गोष्टी घडत असतात. मनाचे व्यापार बदलत असतात. त्याला बऱ्याचवेळा परिस्थिती कारणीभूत होते. स्वप्नातही येणार नाही अशा गोष्टी नियती घडवीत असते. आपण काही म्हटलं, तरी मानव अखेर नियतीच्या हातातलं खेळणं असतो हेच खरं !

> जिन्दगी ख्वाब है, ख्वाबमें झूठ क्या
> और भला सच है क्या ........

गुणगुणत चाललो होतो. पुढचे प्रत्येक पाऊल चांदण्याच्या प्रकाशात पडायला लागले होते. रातराणीचा सुगंध घेत प्रत्येक क्षणाचा स्वीकार करत होतो. अशाच एक क्षणी तू मला भेटलीस पूर्ण चंद्राखाली वाट पहात असलेली. मला पाहताच तू माझ्यावर जाईची फुले उधळलीस. माझे हात तुझ्या हातात घेऊन तू मला एका अनोळखी क्षितिजाकडे घेऊन गेलीस. तऱ्हेतऱ्हेच्या रंगांच्या धारांत आपण दोघांनी आपली अंगे भिजविली. माझ्या यशाचा तुरा मी तुझ्या वेणीत रसिकपणे खोवीत होतो......इतक्यात समोरून एक काळीकुट्ट 'हॉंडा' आणि तिच्यावर एका बावळट माणसाच्या खांद्यावर हात टाकून एक डाळींबी साडी...आणि कर्रर्र ...कच्-कच्-कच् मी किक मारली. पहिल्या किकला हॉंडा स्टार्ट...माझ्यामागे माझी लाडकी, फक्त माझीच, मीच दिलेल्या डाळिंबी साडीत, आणि माझ्या खांद्यावर हात टाकून तू ...गाडीने वेग घेतला. गाव सोडलं... तू मला बिलगत होतीस....गाडी accelerate होत होती.

'ए जरा सावकाश ना रे !'

मला ऐकू येत नव्हतं. स्वर्गात होतो मी. ढगावरून चाललो होतो.

'गाडी कशी काय आहे ?'

'तुझ्यासारखी'

'म्हणजे कशी ? काळी ?'

'छट् वेडा कुठला.'

'तुझ्यासारखी म्हणजे,...आम्ही नाही सांगणार जा.'

तुझं ते 'छट्' आणि 'वेडा कुठला' मला फार आवडायचं. तू सारखं म्हणत बसावस वाटायचं.'

म्हटलं होतं ना, तुला मोटारसायकलवरून जगप्रवास करायचाय...मग आता असंच निघायचंय जगप्रवासाला ?

तू खळखळून हसलीस, मनापासून.

'बघतोयस काय असा ?...'

'तू या पातळात फार छान दिसतेस.'...लाजली.... किंचित.

ही साखर पेरणी कशासाठी. गप्पांच्या नादात अनेक जुन्या आठवणी चाळवल्या... 'ए आता निघायला पाहिजे हं....'

परत निघालो. त्याच वेगानं. तिथून परत यायची आयडिया पटत नव्हती. पण कधीतरी परतायला हवंच होतं.

तेवढ्यात एक बावळटसा माणूस.

मी ब्रेक दाबला. तू किंचाळलीस, गाडी वेडीवाकडी वळणं घेत थांबली.

'आता कसं काय वाटतं मिस्टर... ?' मला कोणीतरी जागं करीत होतं. चार पांढऱ्या भिंती, त्या पांढऱ्या बायका, ती डाळिंबी साडी आणि तो बावळट माणूस... सगळं माझ्याभोवती गरगरायला लागलं. आणि त्यात कुठतरी तुझं हास्य क्षीण होत चाललं होतं.

◆

# हृदयविकार : भविष्यकाळातील धोका आपण टाळू शकाल का ?

**चंद्रकांत कदम**, तृ. व. शास्त्र ( रसायन )

डॉक्टरांकडे जाणारे बरेच रोगी आपणाला हृदयविकार तर झाला नाही ना, या शंकेने ग्रस्त असतात. आजचे मानवी जीवन संघर्षयुक्त आहे ते आपण पाहतोच. माणसाला यामुळेच त्याच्या शक्तीला न पेलणारी कामे करावी लागतात. मग ती शारीरिक असोत वा बौद्धिक असोत. 'प्रत्येक क्षण मोलाचा आहे फुकट घालवू नका,' या उपदेशाचे ते काटेकोरपणे पालन करतात. कारण अशा पुष्कळांना जीवनात भरपूर पैसा कमविण्यासाठी कष्ट करावे लागतात आणि यामुळेच त्यांना विश्रांती मिळणे शक्य नसते. उलट क्षणभरची विश्रांती म्हणजे फार मोठे आर्थिक नुकसान असे समीकरण त्यांच्या गणितात असते.

अलीकडे मनुष्याच्या जशा गरजा वाढतच आहेत तसा त्याचा मानसिक ताण फार वाढला आहे, त्याचप्रमाणात हृदयविकाराचे प्रमाणही वाढलेले आहे. आपण विचाराल हृदयविकार आणि मनोविकार यांचा काय संबंध ? होय, त्यांचा फार मोठा घनिष्ठ संबंध आहे. 'मनोविकारातील चढउतारामुळे हृदयाच्या कार्यक्षमतेमध्ये बदल होतो.' हे आधुनिक शास्त्रज्ञांनी मान्य केले आहे. मानसिक ताणाचा परिणाम हृदयाला शुद्ध रक्त पुरविणाऱ्या रोहिणीवर होतो व हृदयविकार संभवतो, हे मत आता सर्वसामान्य झाले आहे.

मानसिक ताणाचा हृदयविकाराशी काही निकटचा संबंध आहे काय ? मनाचा क्षोभ वाढला की मूत्रपिंडावरील ग्रंथीमधून जो स्राव निर्माण होतो व रक्तात मिसळतो त्या स्रावातील "ॲड्रिनलीन" या घटकामुळे लहान रक्तवाहिनी आकुंचन पावते, हृदयातील आकुंचन-प्रसरण वाढते. हृदयाचे स्नायूंना शुद्ध रक्ताचा पुरवठा करणाऱ्या कॉरोनरी रोहिणीच्या आकुंचनामुळे हृदयाचे स्नायूंना शुद्ध रक्ताचा अपुरा पुरवठा होतो व त्यामुळे हृदयविकार संभवतो.

म्हणजे प्रत्यक्ष हृदयविकाराचा झटका येण्याचे कारण रक्तवाहिनीचे आकुंचन व या आकुंचनाचे प्रमुख कारण मनोविकार. मनोविकारामुळे आकुंचन पावलेल्या रक्तवाहिनीचे पडद्याआड चरबीचा थर जमू लागतो. पडद्याचे आतील थरातील मऊपणा जाऊन ओबडधोबडपणा येतो. रक्त गोठून होणाऱ्या गाठी तयार होण्यास मदत होते व हृदयविकार संभवतो.

डॉक्टरकडे जाणारे शंभरपैकी नव्वद रोगी हृदयविकार तर नाही ना, या शंकेने ग्रस्त असतात. असे का ? अशी शंका तरी का येते ? कारण त्याना सत्य परिस्थितीची जाणीव नसते.

शेजारचा धडधाकट माणूस चांगला चालता बोलता, अचानक मृत्युमुखी पडतो. त्याचा मृत्यू पहाता आपली छाती धडधडायला लागते व आपल्याला तसे काही दुखणे नाही ना ? या शंकेचे निरसन करायला तो डॉक्टरकडे धाव घेतो. खरे म्हणजे मनात अशी शंका असणेच फार धोक्याचे असते.

बरेच दिवसांचा खोकला, थुंकीतून रक्त पडणे, दमा, घोटयांना सूज, थोड्याशा कामामुळे थकवा येणे, अपचन, छातीत धडधड होणे, श्वासोच्छ्वास करताना अडथळा येणे, छातीत कळ येणे वगैरे लक्षणांकडे दुर्लक्ष न करता ताबडतोब डॉक्टरांचा सल्ला घ्यावा, कारण ही लक्षणे प्रथमदर्शनी किरकोळ वाटली. तरी परिणामी हानिकारक ठरतात.

हृदयविकार टाळायचा असेल तर मनोविकारांवर ताबा घालणे आवश्यक आहे. जीवनातली गर्दी, धावपळ, धांदल घालविण्यासाठी नेहमीपेक्षा एक तास लवकर झोपा व एक तास लवकर उठा. ज्या गोष्टी तुम्ही न करता होण्याजोग्या

आहेत त्या अवश्य टाळा. आपण लठ्ठ असाल तर लठ्ठपणा घालविण्यासाठी सल्ला घ्या. आहार नियमित व विशिष्ट घेतला आणि नियमित थोडासा व्यायाम केला तर लठ्ठपणा कमी होईल, त्यामुळे रक्तदाब वाढणार नाही. भूक लागेल तेव्हाच खाणे व खाताना थोडी भूक ठेवून खाणे हे पथ्य सांभाळा.

मनोविकारावर ताबा ठेवण्यासाठी आपल्या अफाट कर्तृत्वशक्तीला आवर घाला. काम करून दमला असाल तर कोणतेही मानसिक काम करू नका.

एवढी खबरदारी घेऊनही जर हृदयविकाराचा झटका आलाच आणि ताबडतोब उपचार केले तर काही वेळा मृत्यू टळू शकतो. म्हणून डॉ. कॅन्ट्रोविट्स ह्यांनी एक उपाय केला आहे. हृदयविकाराचा झटका आलेल्या रोग्याला रुग्णालयात दाखल केल्याबरोबर त्याच्यावर लागलीच उपचार करण्यात येतो. वैद्य मांडीवर एका विशिष्ट ठिकाणी चीर पाडून आतली रोहिणी पकडतात. ह्या रोहिणीत हवा नसलेली एक छोटीशी पिशवी सरकविण्यात येते. ही पिशवी पॉलीयुरिथेन ह्या प्लॅस्टिकची केलेली असते. ती पिशवी हळूहळू महारोहिणीपर्यंत आणली जाते व ती हेलियम (He) ह्या वायूने आपोआप भरली जाऊन त्यामुळे रक्तप्रवाहावर दाब पडून बरेचसे रक्त उलटे हृदयवाहिनीत ढकलले जाते. महारोहिणीत उरलेल्या रक्ताला आणखी धक्का मिळतो व ते शरीरात खेळविले जाते. हृदयाच्या स्नायूंनाही रक्तपुरवठा झाल्यामुळे ते पूर्ववत कार्य करू लागतात, आणि मरणाचा धोका टळू शकतो.

अगदी अलीकडे हृदयाच्या झडपा बदलून हृदयविकाराचा रोगी बरा केला जातो.




With Best Compliments From :

# Nutan Plastics

Mfg. of P. V. C. Plastic Presentation Novelties, Plastic files,
Books and Diary covers and Polythene bags.

Please Contact : **1527, Shukrawar Peth, Poona 2** • Phone 26304

With Best Compliments From

# Hotel Vishwa Boarding & Restaurant

Opp. : municipal Sports Club, Near Saras Baug, Vijaynagar Colony, Poona 30

**Prop. S. A. Hegade** • Phone 58931

# M/s. V. B. Patwardhan

AGENTS AND DISTRIBUTORS
Camel Stationery & Art Materials
**Dealers in : Kores Products & Bijlee Lamps**

236 Raviwar Peth, Bohori Ali, Poona City 411 002 ■ Phone 22431

**Step in for Style at**

# SHRIRAM TAILORS

**Gents Specialist**
466, Budhwar Peth, Poona 2

# FASHION-FAIR MEN'S WEAR

Opp. Bal Gandhrv Rang Mandir, Jangli Maharaj Road,
Poona 5 ■ Phone No. 57580

**Prop. S. V. Vaste**

# उदासीनता [ रसग्रहण ]

✣

**निर्मला देशपांडे**, पदवीपूर्व वाणिज्य

'शारदीय सौंदर्यदेवतेचे फूल' म्हणून ओळखल्या जाणाऱ्या बालकवींची 'उदासीनता' ही कविता. काव्यात अतिशय भाग्यवान ठरलेले परंतु अल्पायुषी असे हे कवी; जीवनात दुःखाची संवेदना जास्त भोगलेले आणि त्यामुळेच एकीकडे 'फुलराणी', 'आनंदी आनंद गडे' या सारखी कविता तर दुसरीकडे 'उदासीनता', 'पारवा' या सारख्या कविता त्यांनी लिहिल्या.

कवितेची सूत्ररूपाने मध्यवर्ती कल्पना म्हणजे, जीवनात कुठेतरी दुःख सलत असते; उदासीनता मनाला ग्रासत असते. परंतु त्या उदासीनतेचे कारण उमगत नाही, ती कोठून आली आहे याचा उमजही पडत नाही. काय केलं असता ती नाहीशी होईल हेही कळत नाही.

बालकवींच्या मनालाही अशाच उदासीनतेने ग्रासले आहे, पण ती कोठून आली आहे हे त्यांना कळत नाही. कुठेतरी मन ठसठसत आहे. परंतु सल सापडत नाही. अशा वेळेस वेदनेने तळमळणारे मन परंतु काहीही न बोलणारे ते चित्त. याबाबत कवी म्हणतो—

'मुक्या मनाचे मुके बोल हे
घरे पाडिती पण हृदयाला'

बालकवींच्या मनाची घडण रेशमी दुकूल वस्त्राची आहे. त्यातील एक धागा अत्यानंदाचा तर एक धागा दुःखाने उदासीनतेने थरथरणारा आहे. 'फुलराणी'बरोबर बागडणारे त्यांचे मन क्षणाच्या दुःखाच्या हेलकाव्याने उन्मळून पडते, खचून जाते.

या कवितेतून आपणाला जाणवते ते आपले दुःख आणि मग आठव येतो गतकाळात लोपलेल्या घटनांचा. आपलेही मन असेच उदास होते. ही कविता आस्वादताना पुनः-प्रत्ययाचा आनंद होतो. त्यांचे दुःख पाहून आपल्याला दुःख साहवते. आपल्यालाही उदासीनता ग्रासते पण त्याचे नेमके कारण उमगू शकत नाही. जखमेवरची खपली निघालेली असते. आठवणींचे वेदनारूपी रक्त ठिबकत असते. त्याला दिव्य औषधी नसते. त्या यातना भयंकर असतात. काळ्या दगडावरून ओहळ गेल्यावर त्यावर जशी रेघ उमटते व कालांतराने ती नाहीशी होते, त्याप्रमाणेच आपल्या दुःखांचे आहे. ती काळाने नाहीशी होतात. परंतु वारा जसा फुलांचे आवरण दूर करतो. त्याचप्रमाणे आपल्या मनावरचे आवरण दूर करून कवी जखम उघडी टाकतो व पुनः त्याच्यावर गुंजारव करीत राहतो. जीवनात काही काही दुःख अशी असतात की ती दुसऱ्यांना सांगताच येत नाहीत. त्यांना आपल्या दुःखात सहभागी करून घेता येत नाही.

आपले मन आतून दुःखाच्या चटक्याने होरपळून निघालेले असते. या कवितेद्वारा पुन्हा एकदा ते प्रगट होते. जितके दुःख मोकळे करता येईल तेवढे केल्याने आपल्याच मनाला शांती मिळते. याप्रमाणेच या कवितेने ते सर्व घडून येते. जरी दुःखावेग आपल्यापुरताच बाहेर पडला मनाने 'पारव्या'सारखे एकांतगीत गायले तरी खूप काही गवसते. आणि म्हणूनच ही कविता प्रभावी ठरते.

मला ही कविता आवडली. कोणाला वाटेल ही दुःखाची उदासीनतेची कविता कशी काय मनाला पटली ? आताच्या आयुष्यात आनंदी गाण्यांनी धुंद, बेधुंद होऊन जायचे की अशी उदास गीते आळवायची ?

या प्रश्नाचं उत्तर एका उदाहरणानं देता येईल. 'एकच प्याला'सारखा दुःखान्त प्रयोग पाहिल्यावर मनाला कुठेतरी आनंद झालेला असतो—जरी त्याचा शेवट सुखान्त नसला तरी. तसाच आनंद 'उदासीनता' ही कविता आस्वादताना होते. आपण जरी स्वप्नसृष्टीत कायम वावरत असलो तरी वास्तवतेच्या क्षणभर प्रकाश देणाऱ्या काजव्याने जर आपल्या मनात प्रवेश केला तर आपल्याला 'आनंद' होतो. वास्तवता प्रखर असते पण तिच्यात ही काही प्रत्यय देण्याचे सामर्थ्य असते. अशी ही वास्तव कविता मनाला ढवळून काढते. उदासीनता मनात डोकावूनही मनाला आनंद देते. कवीच्या भावनांशी एकरूप होता-होता अलिप्त राहायला शिकवते.

अशी ही बालकवींची कविता मनाच्या 'मेघांचा कापूस' पिंजत, 'शांतीचा पावा' घेऊन, 'फुलराणी'सहित, 'औदुंबराच्या' सान्निध्यात, 'शून्य मनाच्या घुमटात', 'पारव्या'सारखे एकांतगीत गात राहून मनाला पुनःप्रत्ययाचा आनंद देते.

✣

## रूसिका प्रॉडक्टस

तीळवडी, राजगिरावडी व इतर सर्व प्रकारच्या वड्या
तयार करून व विकत मिळतील.

प्रो. प. त्रि. जोशी

४१३ नारायण पेठ, राष्ट्रभाषा भवन शेजारी, मुंजाबाचा बोळ, पुणे:४११०३०

---

६६ वर्षे प्रसिद्ध असलेले चष्म्यांचे व्यापारी

## व्ही. के. अभ्यंकर अँड सन्स

फरासखाना हौदासमोर

तज्ज्ञ डॉक्टरांकडून दररोज डोळे तपासण्याची सोय : सायंकाळी ४ ते ८

---

युनिव्हर्सिटीज, कॉलेजेस, स्कूल्स, जिमखाना क्लब, एन. सी. सी., मिलिटरी, गव्हर्मेंटस
यांची मान्यता मिळालेले

## डी. बी. देवरुखकर अॅण्ड ब्रदर्स

*योग्य किंमत ✣ उत्कृष्ट जिन्नस*

सिल्व्हर स्मिथ, एन्ग्रेव्हर्स, प्रेझेंटेशन, कप्स, शिल्डस्, मेडल्स्, क्रेस्ट (डाय)

स्पेशल डिझाइन तयार करणार ✣ काका कुवा मेन्शन, लक्ष्मी रोड, पुणे ४११ ००२

---

REMEMBER

# HARDIKAR'S

NEW SHORTHAND & TYPEWRITING INSTITUTE

**( For Efficient Training in Shorthand & Typewriting )**

**Recognised by Government**

Fergusson College Roed, Poona 4 ■ Phone No. 56786, 53087

---

With Compliments of • Tel. 50218 • Gram : Mimpen

# Nirmala Trading Corporation

763 New Sadashiv Peth, Poona 411 030

TAPIOCA STARCH, MAIZE STARCH, DYES,
CHEMICALS, LAUNDRY MACHINERY



# अंतरिक्षाच्या उंबरठ्यावर

✣

**कु. उषा देव,** तृतीय वर्ष शास्त्र

एप्रिल म्हणजे वसंत ऋतू. बागेत फुले फुललेली असणार. झाडे फुलांच्या सुवासांनी दरवळलेली असणार. तर वाचकहो आपणही जरा स्वप्नात विहार करू या. १९७५ एप्रिलपर्यंत मजल मारू या !

१९७५ एप्रिल ! भारताचे एक स्वप्न साकार होणार. त्या दिवशी एक सामर्थ्यवान सोविएत रॉकेट पृथ्वीचा एक उपग्रह त्याच्या कक्षेत प्रक्षेपित करणार आहे. भारताचा पहिला कृत्रिम उपग्रह, विकसनशील देशाच्या अंतरिक्ष युगातील एक अग्रदूत अंतरिक्षात प्रक्षेपित करण्यात येणार आहे.

भारताच्या अंतरिक्षयुगाचा पाया कोणता ? ज्यांनी बुद्धिचातुर्याने हजारो वर्षांपूर्वी रामायणातील वीरांना अंतरिक्षात रवाना केले होते त्या लोकांची स्वप्ने की भारतीय वैज्ञानिकांचे अविश्रांत श्रम ! आमच्या देशाला अंतरिक्ष राष्ट्रांत स्थान प्राप्त झाले आहे याचे खरे श्रेय आहे भवितव्याचा दूरवर वेध घेणाऱ्या डॉ. साराभाई यांना.

भारताने अंतरिक्ष क्षेत्रातील प्रगतीचे पुढील टप्पे पार केले आहेत.

१९६२— भारताच्या अंतरिक्ष कामाला सुरुवात. अंतरिक्ष संशोधन समिती स्थापन.

मे १९७२— कृत्रिम उपग्रह तयार करण्याच्या आणि प्रक्षेपित करण्याच्या बाबतीत सहकार्याच्या करारावर मॉस्को येथे सह्या करण्यात आल्या.

जुलै १– १९७२ भारतीय अंतरिक्ष आयोग स्थापन. बंगलोर येथे उपग्रह तयार करण्यासाठी केंद्र सुरू करण्यात आले.

एप्रिल १९७४— कृत्रिम उपग्रहाच्या यांत्रिक प्रतिकृतींची चाचणी.

आज या तारखा म्हणजे इतिहासाचा एक भाग बनलेल्या आहेत. पण या तारखा भारतीय वैज्ञानिकांनी केलेले परिश्रम, त्यांनी केलेले संशोधनाचे कार्य सांगतात आणि अंतरिक्ष संशोधनक्षेत्राच्या उज्ज्वल भवितव्याची खात्री पटवितात !

बंगलोर येथे ज्या ठिकाणी हा उपग्रह तयार करण्यात येत आहे त्या ठिकाणी सतत जोरदार आणि निष्ठापूर्व कार्य चालू आहे. या केंद्रात उत्साह बुद्धिमत्ता आणि जोम यांचा संगम झालेला आढळतो. येथे काम करणारे अगदी भारल्यासारखे रात्रंदिवस काम करीत आहेत. आपण केवळ पैशासाठी काम करीत नाही याची त्यांना जाणीव आहे. एका उपग्रहामध्ये हजारो लोकांची बुद्धिमत्ता आणि कौशल्य सामावलेले आहे. उपग्रहांचे निर्माते निरनिराळे नमुने तयार करतात. या प्रयोगांद्वारे ते अंतिम साध्य गाठतात. या उपग्रहाला शब्दशः अग्निदिव्यातून जावे लागते. उपग्रहाच्या निर्मात्यांना यश साध्य करण्यापूर्वी अनेक कसोट्यांतून पार पडावे लागते. उपग्रहातील यंत्रणा टिकाऊ व भक्कम होण्यासाठी, विविध प्रकारच्या हादऱ्यांपुढे आणि निर्वात अवस्थेतील दबावापुढे टिकून राहण्यासाठी हजारो बारकावे, शेकडो सांधे, अनेक यंत्रसमुच्चय तयार करावे लागतात. हा उपग्रह तयार करणे म्हणजे एक कलाकृती तयार करण्यासारखे आहे. ते अज्ञाताचा शोध घेण्यासारखे आहे व शोधाखेरीज जीवन नाही....

पण आपल्या भारताला उपग्रह कशासाठी हवा?

ज्या देशात ७० टक्के लोक निरक्षर आहेत, लक्षावधी लोक दारिद्र्यात आहेत, अशा देशाला कृत्रिम उपग्रहापासून काय लाभ होणार, असा प्रश्न साहजिकच उद्भवतो.

अंतरिक्षतंत्राच्या विकासामुळे अनेकविध उद्योगधंद्यांच्या उत्पादनतंत्राच्या प्रगतीवर प्रचंड प्रभाव पडला आहे. आमच्या वैज्ञानिकांना, इंजिनिअरांना, कामगारांना आंतरराष्ट्रीय पातळीवर काम करण्याचे शिक्षण मिळत आहे. उपग्रहाच्या मदतीने शेतकीचे उत्पादन वाढविण्याच्या नव्या पद्धतीचा अवलंब करता येणार आहे. अंतरिक्ष तंत्रविज्ञानाची व्याप्ती खूप मोठी आहे. आम्हास राष्ट्रीय क्षेत्रात जर अर्थपूर्ण कामगिरी पार पाडावयाची असेल तर प्रगत तंत्राचा वापर करण्याच्या बाबतीत आपण कुणाच्याही मागे पडता कामा नाही हे मात्र निश्चित. सध्या आम्ही या क्षेत्रात 'कच्चे लिंबू' आहोत पण या शतकाच्या अखेरीस आम्ही अंतरिक्ष राष्ट्राच्या मालिकेत मानाचे स्थान पटकावणार आहोत.

आमच्यापुढे अंतरिक्षातील अथांग विश्व पसरलेले दिसत आहे. त्या विश्वाचे उघडे दार दिसत आहे. आत पाऊल टाकण्याची तीव्र इच्छा आहे. पण सारेच अज्ञात आहे. त्यामुळे पाऊल बिचकते आहे. उपग्रह तयार करण्याचा आमचा पहिलाच अनुभव आहे पण यशसिद्धी करण्याची तीव्र इच्छा आहे.

आम्ही आमचे पाऊल पुढे टाकणार आहोत. भारताला आपले प्रवासी अंतरिक्ष यान चंद्राकडे आणि इतर ग्रहांकडे पाठवायची आहेत. १९७५ एप्रिलमध्ये जेव्हा भारत आपला कृत्रिम उपग्रह बाह्य अंतरिक्षात प्रक्षेपित पृथ्वीच्या कक्षेत पाठवील तेव्हा हे स्वप्न वास्तवात उतरविण्याचा मार्ग खुला होणार आहे...

✣

Largest House in
POONA FOR KORES PRODUCTS
UNIVERSAL
TYPEWRITER EXCHANGE
[ India ]
Authorised Distributors for
KORES ( INDIA ) LIMITED
We Supply :
Typewriter & Duplicator
Accessories at a
concessional Rate.
1229/1, Fergusson Road, Poona-4
Phone : 56786, 53087

With best compliments from :
Archem
Laboratories
Suppliers of fine
Laboratory Chemicals and
Dealers in all Kinds of
Scientific Requisites
1558, 'Uday Kiran',
Chimanbag, Dongre's Bldg.,
Poona-411 030 ( India )

# खुश रहो अहले चमन !

✣

**आनंद संगोराम**, तृतीय वर्ष, वाणिज्य

खुश रहो अहले चमन
हम तो सफर करते हैं।

हाँ ! सचमुच ही हम अगले सफर के लिये जा रहे हैं। जिस चमन में चार साल हमने हँसी खुशी के साथ बिताए उसे छोडकर हमें जाना है। क्या ही जादूभरे थे वे दिन! पहले वर्ष कदम रखा। शुरू शुरू में कुछ खोया खोया सा लगता रहा; क्यों कि एक छोटे चमन को छोडकर बडे चमन में मैं आ गया और अब इससे भी विस्तीर्ण दुनिया में मुझे जिंदगी के सबक सीखने के लिये जाना है। दिल में मँडरा रहे हैं वे सारी यादें, वे सारी बातें जो किसी बढ़िया नाटक की तरह होती रहीं, हम सब का दिल बहलाती रहीं, हमें सिखाती रहीं, हमें बनाती रहीं। हमारी अच्छी बातों से पीठपर शाबाशी का हाथ रहा और हमसे कोई भूल होने पर उतनीही निर्दयता से दंड भी मिला। लेकिन सच कहूँ शाबाशी से बढ़कर वह दंडही हमें सबसे प्यारा लगता है और लगेगा। आज बड़ी दुनिया में कदम रखने के बाद हमसे कई भूलें होनेवाली हैं लेकिन वहाँ हमें माँ की ममता से और पिता के प्यारसे डाँटनेवाला कोई नहीं होगा। इसीलिये मेरे प्यारे चमन, तुम खुश रहो। तुमने मुझे और हम सबको वह दिया है जो संसार की कोई भी ताकत यहाँ तक कि माँ-बाप का घर... हाँ हाँ माँ-बाप का घर भी न दे सकता।

याद आते हैं क्लास की पढाई के वे घंटे जब प्राध्यापक अपने गहरे अध्ययन का पूरा पूरा लाभ हमें दिलाने के लिये जी जानसे जुट जाते थे। और यह भी तो कहना ही होगा कि कभी कभी हम उन्हें परेशान भी करते थे। किंतु भगवान झूठ न बुलाए हमारे उस सताने में प्यार का हक था, शैतान की दुश्मनी नहीं थी। हाँ, और अनुशासन! डिसिप्लिन! जिसका हौवा बाहर के लडके लडकियों को लगता है। हमें वो भी प्यारा था और है। सच कहता हूँ आम विद्यार्थी अनुशासनका ही कायल रहता है। उसे भड़काने वाले इने गिने ही होते हैं। उन्हें ठीक रास्ते पर लाने के लिये हमारे प्राचार्य जैसे 'बहादुर' मार्गदर्शक की ही जरूरत है। इसीलिये मैं कहता हूँ कि 'मॉडर्न' की, मेरे इस चमन की हर चीज मुझे जानसे भी प्यारी है और रहेगी। उसके फूल भी और उसके काँटे भी।

इसमें ज़रा भी शक नहीं कि हमारा 'मॉडर्न' हमेशा मॉडर्न ही रहेगा। सब महाविद्यालयों का वह सरताज होगा। उससे बिदा होते समय दिल में बड़ी अजीब हलचल मच रही है, किंतु एक बात के एहसास से तसल्ली भी मिल रही है। वह है हमारे मॉडर्न का उज्ज्वल भविष्य। इस भविष्य को गढेंगे मेरे प्यारे भाई-बहन जो आनेवाले सालों में इस 'चमन'को आबाद किये रहेंगे। इस चमन में कभी पतझर नहीं आएगा। वहाँ रहेगी बहार— सदा के लिये बहार!!

# क्रांतिधात्री कविता का कवि

✣

**कु. सुनंदा कुलकर्णी**, द्वि. व. साहित्य

क्रांतिधात्रि कविते जागे उठ।
अंबर में आग लगा दे॥
पतन पाप पाखंड जले।
ऐसी कोई ज्वाला सुलगा दे॥

दिनकर जी की ये पक्तियाँ मैंने पढ़ीं, और उनकी ओर मेरा मन आकर्षित हो गया। उनकी समूची कविता पढना तो मेरे बस की बात नहीं थी। किंतु पदवीपूर्व की कक्षा से लेकर द्वितीय वर्ष बी. ए. तक अध्यापकजी के मार्गदर्शन में जितनी हो सकी उतनी कविताएँ मैंने जरूर पढीं। इसी बीच दिनकरजी के बारे में मैंने दो समाचार पाये; एक ने मुझे अत्यंत आनंदित किया और दूसरेने मुझे रुला दिया। सन १९७३

में भारतीय ज्ञानपीठ काशी के द्वारा उर्वशी महाकाव्य पर मेरे इस प्रिय कवि को सवा लाख का पुरस्कार प्राप्त हुआ। तब मेरा मन खुशी से उछल पडा। उर्वशी काव्य को पढने की बड़ी तीव्र लालसा हुई। किंतु इत्तेफ़ाक कुछ ऐसा रहा कि अब तक वह इच्छा पूरी नहीं हो पाई है। किन्तु इस परीक्षा के बाद उस काव्य का आस्वाद लिए बिना नहीं रहूँगी। और वह दूसरा समाचार वज्राघात की तरह हिन्दी के समूचे काव्यक्षेत्र पर छा गया। २४ एप्रिल १९७४!! रामधारी सिंह 'दिनकर' का देहावसान। यह 'अग्नि-देश का यात्री' अग्निदेश में रहने के लिए, सदा के लिए रहने के वास्ते, चला गया।

मुझे दिनकर की अनेक कविताओंने अपार आनंद का लाभ प्राप्त करा दिया है। जोश और आवेश उनकी कविता की विशेषता है। पतन, पाप और पाखंड को जलाने की शक्ति उनकी कविता में है। 'हिमालय के प्रति' उन्होंने जो कुछ कहा उस, में यही भाव छुपा था। रेणुकाहुंकार सामधेनी, रश्मिरथी आदि रचनाओं में यही सूत्र रहा है। रश्मिरथी मेरी अत्यंत प्रिय रचना है। महारथी कर्ण पर लिखा हुआ यह एक अद्वितीय खंडकाव्य है। सहजता सरलता, ओज और प्रभाव कहीं पाना हो तो दिनकर की कविता में ही मिलेगा।

कविता के संबंध में दिनकरजी का दृष्टिकोण स्वस्थ और संयत था। प्रकृतिसुंदरी के और असीम प्रियतम के चक्कर में फँसे हुए छायावादी कवियों को दिनकरजी ने 'मिट्टी की ओर' आने के लिए आवाहित किया। इस शीर्षक का उनका निबंध बहुत प्रसिद्ध है। वे 'कला कला के लिए' के पक्षपती नहीं थे। वे 'जीवन के लिए कला' के पक्षपाती थे। जहाँ जहाँ मृत्यु के जैसा वातावरण है, वहाँ जागरण निर्माण करना उनकी कविता का कार्य था। वे अपने 'गान' से कहते हैं—

जाओ मेरे गान! जहाँ भी मृत्यु खडी हो,
वहाँ खडे होओ जीवन की ध्वजा रोप कर॥

ऐसे महान कविकी कविताएँ पढनेका सुअवसर मुझे मिल पाया, इसके लिए मैं अपने को भाग्यवती मानती हूँ। दिनकरजी महान हैं। उनकी आत्मा महान् है। उनका काव्य अमर है!!


# HOTEL RAJHANS

**Opp. : Bal Gandharv Rang Mandir,**
**Shivaji Nagar, Poona 5**

**Phone : 50047**

## Cafe Teria

**Bal Gandharv Rang Mandir**

*Prop : SHETTY*

अनेकविध, आकर्षक

* लग्नपत्रिका * व्हिजिटिंग कार्डस्
* इन्व्हिटेशन कार्डस् * पाकिटे
* इनलँडस्साठी

# नंदादीप

**१७२ शनिवार पेठ, फुटक्या बुरुजाजवळ, पुणे ३०**

*** स्क्रीन प्रिंटिंग * डाय स्टँपिंग**
*** फॉइल प्रिंटिंग**

# क | वि | ता
# क | वि | ता
# क | वि | ता

**पाच कविता**

**नयना कारखानीस,** द्वि. व. साहित्य

१

माझ्या व्यथेलाही,
फुले येतात
आणि अश्रूंनी तरारतात
संजीवनी प्याल्यागत !
कधीतरी ती फुले कोमजतील,
संपलेला सुगंध निर्माल्यात साठवीत
अलगद् नाहीशी होतील.
अगदी माझ्यासारखी !

२

कधी घेता आलाच
तर जरूर घे
गगनाच्या निळाईचा वेध !
लपलेली स्वप्ने त्यातली
जमलीच तर जरूर शोध !
मात्र —
हे सारे करताना
नको रे घेऊस
इंद्रधनूचा सप्तरंगी छेद !

३

बोलायचे होतेस एकदा तरी
जे तुला वाटले होते.
सांगायचे होतेस स्वप्न तुझे
तुला जे हवे होते !
सांग आता तरी —
तू का मूक राहिलास ?
साथीला असून माझ्या
व्यथांना का आशय दिलास ?

४

तुला ठाऊक नसते,
ठाऊक नसेलही.
काळाच्या ओघात लोपले असतील
तुझे भाव.
पण मी मात्र मनातच खेळते.
अपुल्या राहिलेल्या प्रीतीचा अर्धा डाव.

५

या अफाट महासागरात,
तू दिसशील —
निदान तुझी पडछाया !
त्या पडछायेतच —
अलगद मिटतील,
तुला शोधणारे,
माझे डोळे ! !

# चार कविता

**स्मिता काशीकर,** द्वि. व. साहित्य

## १ वर्षाव

कोसळली जलधारा
गंध मातीचा दरवळला
उष्ण उच्छ्वासांतूनही —
नाद 'सरींचा' घुमला
शब्द् वितळे जळांत —
या चिंब तन-मनाच्या मिठीत
तहानेल्या ओठी
तृप्तीचा स्पर्श विरला ....
गहिऱ्या लोचनांवाटे गारवा
या घायाळ हृदयास शिवला

## २ विरह

विरही बनून तू मला
सतत असे झुरवीत रहा
वियोग कसोटीत मला
अग्नि-दिव्ये घडवीत रहा
वाढणाऱ्या अंतरामुळे
हृदय माझे कालवतेय
विझल्या प्रेमाग्नीखाली
आग अंतराची धुमसतेय
वियोगाच्या क्षणात मला
ओळीचा अर्थ उमजून दे
तू दुरावेच वाढवून
ज्वाला हृदयात भडकून दे
आगीचा डोंब उसळेल
अंतरबाह्य त्यात पेटेन मी
तू माझ्या रक्षेवर
तुझी पावले उमटवून जा
आणि त्या शांत स्थितीत
अस्तित्व आपले ठेवून जा

## ३ नशा

दो घूँट पी गई तो   होश हवा हो गई
नशीले जीवन की
दर्द दवा हो गई ।।
दिल्लगी में हो गया
एक ऐसा गुनाह
लताडा तो सबने
पर न दी पनाह
आई जब अक्ल में
इन जामों की भाषा
हो चुकी थी मैं यहां
मनहूस—तमाशा ।।
घोल के पीती रही
मैं सपनों में दिन
रोज़ रोज कहती रही   यही जाम अंतिम ।।

## ४ प्रतीक्षा

पुकारता है दिल तुझे
आशा का हर दीप बुझे
भावना–भावना यूं उलझे
कि न शब्द काव्य का सूझे ।।
चन्दा उभरता जाता है
धरतीको सहलाता है
घर घरमें दीप जले हैं
दिलमें भरे अंधेरा है ।।
शाम है यह डरावनी
उदास दर्दभरी चांदनी
कुंठित मेरी रागिनी
मै चाहुँ बस तेरी आवनी ।।
दिन ज्यों ज्यो ढलता है
नैनों से नीर छलकता है
प्यार मेरा तरसता है
बस तेरी बाट जोहता है ।।

## अपमान

अनागर मी ....
जळजळणारे जग ....
अनोळखी वाट ....
प्रतीक्षा तुझी ....
अपमान झेलणे ...
हे सारे —
सारे तुझ्या "एक क्षण" नागरी प्रीतीसाठी

**जाधव ए. बी.**

## ती न क वि ता

**श्री. म. देवधर,** पदवीपूर्व वाणिज्य

### १ भीक

एकदा एका भिकाऱ्याला
देव प्रसन्न होऊन वदला
जर मी तुला श्रीमंत केले
सांग तू काय करशील भले ?
आनंदाने भिकारी वदला
मी मागेन मग मोटारीतून भीक

### २ योजना

अर्थतज्ज्ञांनी काढली
एक नवी योजना
तिचे नाव
सेमी–बोंबला
सरकार म्हणते
हवी कशाला ही
नवी योजना ?
आमची आहेच
नेहमीची ! तुम्ही बोंबला ! !

### ३ उद्घाटन

आधी होते
आमदार
नंतर झाले
नामदार
हातात
घेऊन कात्री
ते झाले
उद्घाटन मंत्री
आणि एका
टेलिफोनच्या
उद्घाटनाला
त्यांनी
वायरच
कापून काढली.

## हंस

भटकत होता आशेचा गोड हंस
काळ्या ढगातून निळ्या आभाळात
जायचं होतं खूप दूर —
अनंताच्या पलीकडे
ध्येय गाठायला
दूरच्या शिवाराकडे
ध्येय प्रेरित होऊन भटकला चहूकडे
पण पेटला वणवा ढगांच्या हत्तीमुळे
फडफडला आगतिक होऊन तो
नि परत फिरला
काळ्या निळ्या अंधारात

**एस्. डी. बाफना,** तृतीय वर्ष वाणिज्य

## चा र क वि ता

**शिरीश वैद्य,** तृ. व वाणिज्य

१

कधी काळी
तुला कळलेही नसेल कदाचित
माझ्या नकारात
प्रतीक्षा होती .... ती पण वेदनेची ....
किती पटकन् होकार दिला मी .... तेव्हा ....
बुडालेल्या जहाजाच्या तरंगणाऱ्या शिडासारख्या
आयुष्याचा ....
आता
माझ्या नकारातच तू होकार समजून घे
साठवू नको, भिजल्या पापणीत
हरवलेल्या
स्वप्नसंध्येचे रंग ...
अश्रूंनी तरी होकार द्यावाच लागेल मला ....!

२

सुकल्या स्तनांसारख्या
विझू विझू आभाळात
परतलेत
सतंद्र दुःखाचे पंखहीन थवे ...
अंधारवनातून चालताना
प्रारब्धाच्या,
पाऊलजड वाटेवरून
उगाच स्वप्नांचे उखाणे गाऊ नकोस.
मेंदीहीन पावलांना
गंधगहिऱ्या अस्तित्वाची चाहूलही नकोच.

३

निळ्या तळाच्या तळाशी पोचल्या होत्या
तुझ्या नि माझ्या शपथा ....
अन् तू बसला होतास काचेच्या तुकड्यांना पारा
लावीत.
अलगद् उभारून आलेल्या स्वप्नांना मी
मुडपून दूमटून बसवलं डोळ्यात
पण नंतर कळलं,
तुझ्या डोळ्यात आभाळ कुठाय ?
( असंच सुखी व्हायचं असतं रे. )
मीही लावला माझ्या डोळ्यांना, चकचकीत पाऱ्याचा
मुलायम मुलामा ....
अन् किंचित लहरल्या
तळाशी पोचलेल्या
शपथा
तुझ्या नि माझ्या ... तुझ्या नि माझ्या ...

४

रात्री ...
सारे हुंदके संपले तरी ...
माझी भूक शमलीच नाही.
कळून चुकलं,
तूही एक असत्य होतास ...
कुणालाच कळली नाही तगमग ...
रात्रीच्या आकाशाला सुद्धा !
दुसऱ्या हाकेला पुन्हा,
आकाश हुंदक्यांनी दाटून आलं ....
रात्रीला कधी जाग आलीच नाही !

## एका हळव्या स्वप्नात

रात्र ओघळलेली असते
दमलेल्या पृथ्वीवर
जागा झालेला चंद्र
खेळत असतो चांदण्याबरोबर
अशात तू आठवतेस
निःशब्द स्पंदनं माझी
अंतरी सांजावतात
विरहाच्या सुरात
आठवांचं ते गीत हरवतं
एका वेड्या वादळात
मी उद्ध्वस्त होतो........
ओघळणारी रात्र
उतरते डोळ्यांच्या अंगणात
स्वप्नाच्या क्षितिजावर
सूर्य नाही लाभत म्हणून
माझा असा अस्त होतो
हृदयाच्या कबरी
भग्न मनाच्या पुष्पाने सजतात
आणि !
प्रतीक्षेची अखेरची सांजवात मालवते
स्वप्नविझल्या डोळ्यातील
चंद्र ही काळोखतो
चांदण्यासह वळचणीला जातो
एका हळव्या स्वप्नात
मी असा निद्रिस्त होतो.

**अजित दरेकर,** द्वि. व. साहित्य

## TWO

Can't you see
the roads full of beggars
with faded faces
their begging hands
spread wide open
and their eyes . . . desparate . . .
greedy . . . and vacant
and their starved stomochs
living volcanoes—beware of them
I know for sure—a day will come
and these volcanoes will explode
and will destroy every thing.
They come across
hundreds of them
and they shriek for—
Roti—Kapada . . . and a coin of ten paisa.
Don't negelect them
drawtng colourful curtains to your windows
and barbed fences of your bungalows
will not stop them for long,
The fire within them with leaping flames
will burn these curtains . . . fences . . .
and everything
Every bone in the ribs will be steeled
and these eyes will catch the
fire of lightening
and someday . . . like a thunder . . .
they will start
their struggle . . . the Revolution.

**Satish Kadam, T. Y. B. Com.**

## शब्दसामर्थ्य

असतं लिहिलेलं चतकोर तुकड्यावर
केवळ असते भुलवण उधळण शब्दांची
शब्द राहतात मनाच्या मंदिरात
पूजा करित आतल्या देवाची
सारं मन भारावून जातं
एकेक शब्द सांगत असतो,
'तुझी नि माझी प्रीती'
शब्दांची भुलवण करत करत
एक दिवस असा उजाडतो
एक शब्दांनी भंगून
जाते मंदिर
होतो देव उद्ध्वस्त
वाट पाहतो एका प्रेमळ शब्दाची !
शब्दाची ! !

**भानुमती ठोके,** प्र. व. साहित्य

## स्वप्नपरी

केसांचा संभार पाहून मेघ जाहला खिन्न मनी
गर्व उतरला पार तयाचा नेत्रांमधे पाणी
भालप्रदेशा पाहुनी विस्मय आकाशा वाटे
जमले तारे शोभा बघण्या भरली सर्व तटे
एक तारका खळकन् गळली पाहुनिया टिकली
टकमक बघती तारे सारे शोभा ही कसली
गुलाब वेणीमधला वाकुनि पाहु लागला तो गाली
सुन्न होउनी सुकू लागला पाहुनि ती लाली
हरणाचे ही भान हरपले पाहुनीया नयन
कमल पुष्पही बघू लागले उंचावुनि मान
कळि चाफ्याची स्तिमीत जाहली पाहुनिया नाक
खजिल जाहली पुरती हरली पाहुनिया झोक
जाइजुईच्या कळ्या लाजल्या पाहुनिया दंत
रूप बदलले पुष्प जाहले वाटे मनि खंत
डाळिंबाला लाज वाटली पाहुनिया जिवणी
मनात हसला अघटित पाहुनि देवाची करणी

**राजीव काळे,** प्रथम वर्ष वाणिज्य

## व्यथा

व्यथित झाल्या व्यथा
भावभात्रनांच्या.
काय सांगू कथा ?
भरून सांडले मन तरीही आज भासे रिते
आठवुनी स्मृतींना
आळवीत आहे
तव मुग्ध शब्दांना.
बोलक्या ओठातील अतृप्त मूक भावनांना
सहवासाची तू
लावलीस गोडी
विरलेल्या विश्वात
तुजविण कशी सोडवू कोडी विरहाची ?
मीलनाची शपथ
तप्त उन्हात
आज झाली पोरकी
लुटलेल्या आभाळात झाली चांदणी कलंकित.

**अनंत भोपळे,** प्रथम वर्ष साहित्य

## दोन कविता

**विजय तडवळकर,** प्रथम वर्ष साहित्य

### ध्यास

आज अवघ्या सर्व सरल्या
त्या दिसांची याद आहे
आज उरल्या क्षणखुणांना
आर्तभरली साद आहे
आज माझ्या गतखुणांचे
एक गाणे होत आहे
आज हिरव्या आठवणींनी
दिल दिवाणे होत आहे
आसवांची आज गाली
का कळी फुलते–उमलते
हा अनोखा दर्द माझे
हृदय हलते काय सलते
आज अवघ्या आयुष्याची
सर्व बाकी शून्य आहे
चाललो .... पापे .... चुका
शिक्षा मला मंजूर आहे
आज कसली ओढ नाही
एक शेवट आस आहे
दिंडी तर हललीच आता
पंढरीचा ध्यास आहे

### आस

दुःख कसले शब्द कुठले हे मला कळलेच नाही
फक्त कविता होत आलो का ? कसा ? ठाऊक नाही
विसरलो सगळे गुन्हे त्यांचे नि मी निस्संग झालो
जन्म सारा व्यर्थ गेला फक्त कविता देत आलो
फक्त आता एक आशा पाश कवितेचा सुटावा
अन पहाटे होश जावा देह अवघा मालवावा

## विसरू कसा —

विसरायला सांगतेस मला
गतजीवनाच्या आठवणी
( अन् ) काळजात झालेली जखम
वहात नाही तिच्यातून रक्त
वहात नाही तिच्यातून दुर्गंधी
सडत नाही ती केव्हाच
किडत तर नाहीच नाही;
पण — ठणकते आहे रात्रंदिवस
मुक्या माराप्रमाणे !

**सुधीर वाव्हळ,** पदवीपूर्व वाणिज्य

## ती येणार म्हणून

ती येणार म्हणून
प्रफुल्लित होते तारे
दरवळत होते वारे
पुष्पकलिकाही उमलत होत्या अलगद
ती येणार म्हणून ........
शांत होती पानांची सळसळ
बंद होती खळबळ जलांचीही
उठणारे तरंग
आणि झुकणारी रात
बघता बघता तीही संपली
पहाटेच्या किलबिलाटात
पक्षी आनंदाने होते गात
आणि मी गुणगुणत होतो नकळत
" ती येणार आहे....खरंच येणार आहे "

**बी. एल्. आढाव,** प्रथम वर्ष साहित्य

## अहिराणी भाषा : एक गीत

काय लाये तुळशी तर काय लाये राम।
काहीज लाये मेरा सत्यनारायण ॥
कुंकू लाये तुळशी तर गंध लाय राम।
गोपीचंदन लाये मेरा सत्यनारायण ॥ १ ॥
काय पिये तुळशी तर काव पिये राम।
काहीज पिये मेरा सत्यनारायण ॥
चाय पिये तुळशी तर दूध पिये राम।
पंचामृत पिये मेरा सत्यनारायण ॥ २ ॥

**कु. निलिमा बेरी,** पदवीपूर्व वाणिज्य

## कृष्णा कृष्णा

इस सागर की लहरों में
मस्त हवा कि झोंको में
इन रंगीन फिजाओं में
इन रंगीन घटाओं में
ढूँढा हमने सारा जहाँ
पर तुम्हारा पता कहाँ
गोकुल में, मथुरा में हो तुम
या जमना; या गंगा की लहरों में
या वीणा की तान में
या मीरा के गान में
ढूँढा हमने सारा जहाँ
पर तुम्हारा पता कहाँ
कहाँ छुपे हो बन्सीवाले
गिरधारी ओ श्याम साँवले
जमना के तट कदम्ब पर
या मधुबन में तुम हो श्याम
ढूँढा हमने सारा जहाँ
पर तुम्हारा पता कहाँ !

**श्याम आहेरकर,** पदवीपूर्व साहित्य

## जिन्द्गी

ग़म उठानेके काबिल नहीं हैं हम
तो फिर यह ग़म दिया है क्यो !
दिलकी खुशियाँ तो मिट चुकी हैं
तो फिर यह दिल बनाया है क्यों ?
अश्कोंसे तो कुछ बनता नहीं,
तो फिर ये इस तरह बहते हैं क्यों ?
मंजिल को पाना है मुश्किल अगर
तो राहोंमें अब हम चलते हैं क्यों ?
जिन्दगीकी शाम अगर नजदीक है
तो सहारेकी आस हम करते हैं क्यों ?
नजर न आता है कोई सहारा
तो दुनियामें हम यों जिन्दा है क्यों ?

**उत्तम काळे,** तृतीय वर्ष वाणिज्य

## SLEEP

Sleep is the home of Paradise
Though of a limited path
It is in sleep that we dream beautifully
And perceive the surroundings
Think of the day,
The past and the future.
Sleep has its own doors
Which close down when
They want to sleep and
Open when they want to wake.

**Avinash Thakrar, F. Y. B. Com.**






कवी : कल्याण इनामदार

१

लख्ख पुनव चांदणे होते आभाळ भरून
जणू चंदेरी स्मृतीचे रंग बेगडी दुरून
माझे भावबुळे मन मज पचेना उजेड
उभ्या आठवणी व्याल्या जुने फेसाळून वेड
पुन्हा आठवले तिचे एक ओशाळले दान
जिचे सर्वस्व घेताना माझे डागळले प्राण
आली जीवनात माझ्या जसा पहाटचा वारा
माझ्या फूलकळी अंगा आला काटेरी शहारा

* * *

एका कातरवेळेला होतो तुडवीत वाट
तोच बोचला बाजूचा दीठ हिर्वळला काठ
तसी डोळीयास आली क्षण सरावली धार
तोल सुटून उडाले मन पाखरू चौफेर

२

हिरवी हिरवी झाडी तिथली हिरवी हिर्वळ नक्षी
हिर्वळलेल्या गुलाब देठी पाड लागले पक्षी
मेंदी पानामधून कोठे सळसळ साडी हाले
ओठाओठावरी रापली चुंबनवेडी फुले
दूरदूरचे दिवे लकाकी पंक्चरलेली रात्र
बोथटलेल्या स्पर्शामधुनी सुन्न पेटले गात्र
थंड गारवा नव्या दमाचा ऊब छातीसी व्याली
तंग ठेवणीमधून आल्या अंग दाटल्या चाली
माळुन वेण्या कुस्करलेल्या कुणी कुणाला हसे
काजळ डोळ्यामधी पेरुनी प्रीतीचे कवडसे
कटीभोवती गुंफण ताजी घुमे जसा पारवा
हलक्या फुलक्या हात मिठीचा हार कुणाला हवा
कुठे पेटतो धूर विडीचा कुणी थुंकते पान
कुणी दिसाच्या ओझ्यामधुनी जरा उंचवी मान
चिवचिवणाऱ्या सान मुलांचा कुठे रंगतो खेळ
कुठे आइच्या कुशीत रडतो गळा काढुनी बाळ
पाय कुणाचे तिथे थांबती जिथे हासरी कळी
प्राजक्ताची खुडून देठे कुठे वेदना निळी
दिव्यादिव्याच्या खालि काजळी त्यात प्रणय पोरका
कसे वाजते पिचले कंकण तिथे विचारू नका

३

वळणावळणामधून पायी रेखित चित्रावली
झिम्मा खेळत सौंदर्याची हले एक सावली
कुणास ठाऊक कसली वर्दळ चोरीत होते अंग
बुजले होते स्मृतीत वेड्या नेत्रपल्लवी रंग
मी फुलवेडा नजर केवडा मोजित होतो दले
तोच तियेचा धक्का लागून पडली माझी फुले
ओंजळ परडी करुन वेचली तिने कळी पाकळी
उत्तरली ती क्षमा करावी मी न पाहिले मुळी
छे–छे–बाई मी उत्तरलो, क्षमा कासया हवी
असेच सांधे साधुन होते ओळख पहिली नवी
तुमच्या माझ्या माणुसकीची एकच जात असे
कुणी कुणाला बोलायाचे शब्द फेकुनी असे ?
तुमचा माझा एकच आत्मा एकच देव तसा
एक वाहते रक्त परंतू अनेक त्याच्या नसा
निःशब्दा ती वदली तैसे, खरेच सारे गडे
या मातीच्या स्पर्शफुलांचा गंध मला आवडे
पहिल्या वहिल्या भेटीचा हा गोड गोडवा ठसा
म्हणू कशी मी आठवणीला हवा तसा तो पुसा !
उद्या पुन्हा या कातरवेळी जुळवा पायखुणा
मीलनवेड्या कवळायाच्या अशा तशा यातना
बोलत असता असे काहिसे अडखळली रात्र
'चला निघू या'....वदे चंद्रमा हसऱ्या गालात
हातात घेउन हात निघालो दोघे कापित वेळ
ओढ लागली तिला घराची सैल जाहला पीळ
वियोग होता कलती झाली गालावर नक्षी
दोन दिशांना पांगून गेले परतीचे पक्षी
मंद पाउले टाकित माझी अकारली वाट
एक–एकटी अशी निघाली भरतीची लाट

४

पीत चांदणे एकच खोली, सुन्न दिव्याचे गीत
कुणीच नाही भग्न शांतता वटारली पायात
मी माझेपण घेउन वेडे कापित गेलो वाट
स्पर्श हाताचा होता माझ्या दार हसे ओठात
स्वागत झाले घरात माझे दिवे लागले दिवे
अंग टाकुनी आळसलेले थरारले काजवे
किती दिसाचा एक-एकटा साथ कुणाची नसे
सुखदुःखाच्या हिंदोळ्यावर मीच झुलावे असे
जन्मावरती डागळलेली पिळून माझी कथा
उगा कुणाला चिंब करू मी सांगुन सारी व्यथा

ठेच लागुनी जखमा व्हावी आर्त वेदना जशी
तसी रापली घात्र घालुनी अबोल कासाविसी
हाय परंतू नकळे कैसे घडले हे आगळे
कातरवेळी वेड लावुनी विझले डोळे निळे
तहानलेल्या जिभेस जैसा डोह दिसावा निळा
तसाच होता स्पर्शखुळा मी देखियला सोहळा
आठवीत मी रूप तियेचे रात्र गाळली हळू
कळले नाही उजेड केव्हा धुक्यात लागे मिळू
पहाट होता गुलाल लाली अभाळ प्याले सर्व
नव्या दमाने नव तेजाचे सुरू जाहले पर्व
दिसा मागुनी उन्हे वाढली दुपार ओठंगली
अंग मोडुनी थंड जाहल्या घरोघरीच्या चुली
उतार होता फिरे सावली पश्चिम मंदावली
संध्या समयी बुब्बुळ काठी रुळे रंग बाहुली

५

कृष्णासाठी मोडित डोळे राधा होती उभी
कर्दळ गाभा अंगांगाचा वर्दळ वेडी सुगी
तीळ खोचुनी गुलाब गाली लज्जा रोपावली
लक्ष लागल्या वक्षावरती विटाळती पाली
अजून नव्हता पुसला कोणी ओठांचा जार
उतून यौवन झुले डहाळी टपोरले पेर
सिंहकटीवर गोंडस बांधा उभार छातीची
काजळ डोळ्यामधून फिरते गोफण प्रीतीची
मी टिपता या श्रावणमासी झडीस सोकावलो
रूप गिळाया दव, गाराचे अगा उतू गेलो
म्हटले मी, – " ही कळी कालची फूल कशी झाली
उत्तरली ती, " तुम्हीच ना मज दिली गडे सावली "
खरेच का ही प्रीत आपुली जशी ऊन-सावली
तुम्ही असावे माझ्या हृदयी रेखित चित्रावली
माझे ' मी पण ' नव्हेच आता ते तुमचे झाले
प्राजक्ताच्या पाखरणीवर चिंब हात ओले

इतुक्यामाजी अंधाराचे पडले पडदे पुन्हा
एकाएकी सुखात व्याल्या विरहाच्या यातना
उत्तरली ती, " तुमच्यावाचून अशक्य आता जिणे "
मी पुटपुटलो दो बाजुचे एकच हे नाणे !

६

भेटीभेटीत असे अवघे साकारले जग
तिच्या माझ्यातला मिळे दिशादिशाला सौरभ
तिची क्षितिजाची मिठी माझे आभाळाचे हात
रोज डोळ्यात खलावी आम्ही स्वप्नाळ वरात
शब्द फेकताच माझे तिने झेलावेत ओठी
खेळवाव्या मी ही तिच्या कळ्या हसऱ्या ललाटी
चंदन झिजावे तिचे माझे उगाळावे गंध
वेचावी पहाट तिने माझा टिपून आनंद
पाण्यासवे लाट जशी आत-बाहेर डोकावे
तिने माझ्यासाठी तसे सोसावेत हेलकावे
मीच पडावा शेवटी जरा उणा-दुणा तरी
तिने धरून उराशी गावा सूर आसावरी
मीही पेलावे तियेला कुठे सुटू जाता तोल
बाणा वाकवून द्यावे माझ्या सर्वस्वाचे मोल
बोट ठेचाळता माझे तिच्या कळावर मीठ
तिचे गळताना दव माझे भिजावेत काठ
तिने अबोलीने माझे सारे जोजवावे प्राण
प्रीत पिसाने पुसावे मीही वादळले व्रण
अशी फुलपंखी परी प्रीत निःशब्दाचा ठेवा
होती राहिली व्यापुन तिच्या माझ्यातला दुवा

७

हाय परंतु पहावले हे नाही दैवाला
प्राण सखीच्या दिसी एका काळ घरी आला
होती डोळ्यावरती भरली रक्ताची धुंद
म्हणे लाडके हळूच नेणे हा माझा छंद

उत्तरला तो तिला बापुडा सोड आता पाश
खोळंबुन का तुझियासाठी बसेल अवकाश
ओठ फाडुनी किंचित् हसला मृत्यूचा राजा
नको जाहला म्हणे आता भुईस हा बोजा
मी न कुणाला छेडायाचा उगाच येउन असे
किती चमकले पहा आपुल्या पापाचे कवडसे
थरथर झाली तिची पाकळी, सुटला श्वास उरी
क्षणात गेली खुडून देठे रक्त माखली सुरी
काळ जरासा संतोषाने सुटला चौफेर
एकाएकी उलटे झाले सनईचे सूर
पंख उमलता चोच वासुनी पक्षी पडला असा
खांद्यावरती कुणी वाहिला पुसीत डोळे, नसा
असून उघडे बाहू माझे मी नच झेपावलो
बसल्या ठायी जमेल तितुके अगा रक्त ओकलो
कुणास सांगू मुकी जाहली माझी सागरव्यथा
घरट्यामाजी एकटाच मी, दूर उडाला जथा

८

उठा भेकडांनो जागवा ही रात्र
मी न पेटणार पेटतील गात्रं
खेळा माझ्यासंगे हवे तसे द्यूत
मृत्यूंजयावर अहो आता मात
किती कुणा असा वाकवील काळ
ज्याच्यात्याच्यातले आगळेच बळ
कुणी शब्दासाठी चाचपील जीभ
कुणी स्वार्थापोटी वाढवील लोभ
कुणी हवा तसा वटारेल डोळा
म्हणुनी का त्याच्या फळ आले कळा
कुणी शोधतील रक्तातले किडे
नात्यानात्यातली फोडूनि कवाडे
जन्माजन्मांतर रापतील कोणी
दिल्या घेतल्याची पिळीत कहाणी

अंधश्रद्धेवर चाळवीत पाय
पुसेलही कोणी उतू आली साय
भोवरेल कोणी दिशादिशातून
आल्या वेदनेची वाजवीत धून
कुणी ललाटीच्या रेघोट्याचा लेख
सुखे पेटवून धरू जाय राख
कुणी थेंबात्रेल आल्यागेल्यासाठी
आपुलीच कोणी फुलोरेल ताटी
झिजलेही कोणी चंदनाच्या अंगे
तोची जाणो जाय परागाचे भुंगे
कुणी कुणासाठी वाजवीत टाळ
वृथा हाती घेई नासला विटाळ
आला गेला काळ डोकावीत बसे
संपविणे आयु हेच त्याचे पिसे
आपुलेच दैव दोष नसे कोणा
ज्याचा त्याचा त्याने पाहावा पाळणा
अगा तोडण्याचे सूर्यफूल नव्हे
तिच्या माझ्यातले एवढेच दुवे

९

चांदणे लख्ख लखडते नभाच्या आड
तरी, असेच माझी रात्र गाळते वेड
उमलली फुले हासतात कळी पाकळी
माझीच दिठी पण अळीमिळी गुपचुळी
गोंदता हिर्वळी वर्खे टवटवी पाना
पल्लवी झडून माझ्याच संपल्या ताना
चोचीत घालुनी चोच चित्रचित्रे पक्षी
ओठास माझिया जार वाळली नक्षी
मेंदीचे रोप टोचता विव्हळते कोणी
काट्यात परंतूपाय इथे अनवाणी
श्रावणी झडीची कैक हुंगती माती
माझ्याच पापण्यातुनी ठिबकती स्वाती
रंगवी कुठे मस्तानी अपुला गळा

मी प्रीत रापवी असा अभागी खुळा
सागरी लाट पेलते जसे शेवाळ
पेलते तसे मी अगा पेटला जाळ
प्रीतीचे असुनी हे विश्व स्वैर सांगाती
काटेरी कुंपण सदा माझिया भोती
जग म्हणे मानवी जन्म हेचि गा पुण्य
मी 'तिथे असूनी' राहिलो जीवनी शून्य

१०

संपलो आता मी ! गडे तुझ्या आठवणी
येतात ऋतू जातात आलम विराणी
कैकदा झिंगला कैफ सलामी कलता
ठेविला आशांचा पूल डोळिया झुलता
ही तुझीच कासाविसी उकळते अंग
ज्वालेत उभा मी असा दिसेना रंग
येशील पुसाया कधी प्रेतमय व्यथा
मज नको चिरंजीव आजन्माची कथा
जन्मात राहिलो वजा जडावून माती
मी असा अभागी गडे निखळली नाती


## तुमची पुस्तके : एक ऋणानुबंध

सर्व विद्यार्थ्यांना त्यांच्या परीक्षेत आम्ही हार्दिक सुयश चिंतितो. परीक्षा झाल्यावर आपली पुस्तके महाविद्यालयाच्या ग्रंथालयास भेट द्या. अनेक होतकरू विद्यार्थ्यांची ज्ञानपिपासा ही पुस्तके भागवतील व हे विद्यार्थी तुम्हाला दुवा देतील.

महाविद्यालयाच्या ग्रंथपालांजवळ ही पुस्तके द्या. तुम्हाला हवीत त्या वेळी तुमची पुस्तके तुम्हाला ते परत देतील.

## तुमचे भांडार : एक सहकारी संघटना

तुम्हाला लागणाऱ्या वस्तु महाविद्यालयाच्या तुमच्या भांडारातूनच घ्या. महाविद्यालयाचा प्रत्येक विद्यार्थी या भांडाराचा भागधारक आहे.

विद्यार्थ्यांसाठी विद्यार्थी भांडारात सर्व प्रकारची स्टेशनरी, शास्त्र शाखेच्या विद्यार्थ्यांना लागणारी जर्नल्स, डिसेक्शन बॉक्सेस, वेट बॉक्सेस व कला आणि वाणिज्याच्या विद्यार्थ्यांना लागणारे मॅपसेट, अकौंटन्सी वह्या, भूगोलाची जर्नल्स, ट्युटोरिअल शीटस् व शारिरीक शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी लागणारे बनियन्स, पी. टी. शूज, सॉक्स, हाफ पँटस् वगैरे वस्तू योग्य किमतीत मिळतील.

प्राचार्य, मॉडर्न महाविद्यालय

# Swastik











## SERVES HOME & INDUSTRY

Through a wide and varied range of rubber and P.V.C. products—for domestic and industrial use.

Footwear and hoses, gloves, moulded products and oil seals, foam rubber... mattresses, pillows and cushions, erasers and G.R.P. helmets.
Over 4000 products in all—each one built as only Swastik can, highly dependable and full of utility.



**SWASTIK RUBBER PRODUCTS LTD.,**
Poona-411 003.

*Dattaram-SRP-29B*

# What is Cancer ?

✣

**Miss Shailaja Deshpande**
T. Y., B. Sc. ( Chem. )

Hippocrates, in the 5th century B.C. was probably the first to use the Greek word " Crab " to describe a spreading cancerous growth. The word " Cancer " meaning crab, came from the Romans.

Cancer is not a single disease, it is a large class of diseases with one common feature uncontrolled, irregular cell growth. Certain cancers grow rapidly and spread quickly to other parts of the body, others are slow and remain localised for many years. One of the common ones, thebasal cell cancer of the skin, is indolent and slow growing.

Cancers also differ widely in their response to treatment. Most skin cancers are easily destroyed by radiation therapy, but one called Melanoma, originating in the skin, is highly resistant to radiation. Cancer of the uterus is often cured by irradiation, cancer of the stomach never is.

विद्यार्थी श्री. गिरीश दंडे ( द्वि. व वाणिज्य ) आणि श्री. श्रीरंग इनामदार ( द्वितीय वर्ष वाणिज्य ) यांची महाराष्ट्र खो खो संघात निवड झाली व श्रीरंग इनामदारच्या समर्थ नेतृत्वाखाली महाराष्ट्राने पतियाळाच्या राष्ट्रीय स्पर्धेत विजयश्री प्राप्त केली. दंडे आणि इनामदार यांची याच स्पर्धेसाठी पुनः यावर्षी निवड झाली आहे. शिवाय याच दोघांनी पुणे येथे झालेल्या ' महाराष्ट्र विरुद्ध शेष-भारत ' या कसोटी सामन्यात देखील उत्तम कामगिरी बजाविली. दंडे याला महाराष्ट्र राज्य खो-खो स्पर्धेत ' सर्वोत्कृष्ट-खेळाडू ' चे पारितोषिक मिळाले तर मुंबईच्या अखिल भारतीय भाई नेरूरकर सुवर्ण-चषक स्पर्धेत श्रीरंग इनामदारने ' सर्वोत्कृष्ट पाठलागाचे ' पारितोषिक पटकावले. या स्पर्धेत २९ **बळी** घेऊन श्रीरंग इनामदारने **उच्चांक** प्रस्थापित केला.

दरवर्षीप्रमाणे याही वर्षी महाविद्यालयात विविध सांघिक व वैयक्तिक खेळांच्या आंतर-वर्ग स्पर्धा घेण्यात आल्या. या स्पर्धांना विद्यार्थी व विद्यार्थिनींचा चांगला प्रतिसाद मिळाला होता. विद्यार्थ्यांची आवड व उत्साह लक्षात घेऊन महाविद्यालयात या वर्षापासून मल्लखांब, मुष्टियुद्ध, बॉल-बॅडमिंटन आणि टेबल-टेनिस या स्पर्धा सुरू करण्यात आल्या आहेत.

महाविद्यालयाच्या वार्षिक क्रीडा-स्पर्धेत विद्यार्थी श्री. एस्. डी. शेटे ( द्वितीय वर्ष शास्त्र ) याने **मुलांचे वैयक्तिक विजेतेपद** २१ गुण मिळवून प्राप्त केले. **सर्वसाधारण अजिंक्यपद** द्वितीय वर्ष शास्त्र वर्गाने ३९ गुण मिळवून प्राप्त केले आहे. दुसरा क्रमांक ( ३७ गुण ) प्रथम वर्ष शास्त्र वर्गास मिळाला.

आंतर महाविद्यालयीन स्पर्धांच्या तयारीसाठी आम्हास सर्वश्री शिवशंकर, कोल्हटकर, कोंडाळकर, झोपे आणि शिंदे यांचे बहुमोल साहाय्य लाभले. त्यांच्या या सहकार्याबद्दल त्यांचे मनःपूर्वक आभार.

महाविद्यालयातील प्राध्यापकांच्या क्रीडाविषयक सहकार्याचा आणि सहभागाचा उल्लेख केल्याशिवाय या अहवालाची पूर्तता होणार नाही.

( १ ) प्रा. पद्माकर आपटे : जिमॅनॅस्टिक आणि मल्लखांब निवड समितीचे प्रमुख आणि पुणे विद्यापीठ संघाच्या निवड समितीचे अध्यक्ष.

( २ ) प्रा. अशोक पाथरे : व्हॉलीबॉल संघाचे व्यवस्थापक आणि निवड समितीचे सदस्य

( ३ ) प्रा. सुरेश दातार : क्रिकेट संघाच्या निवड समितीचे सदस्य.

( ४ ) प्रा. अनिल नातू : टेबल-टेनिस पुणे विभाग संघाच्या निवड समितीवर नेमणूक.

दि. २५ जानेवारी १९७५ रोजी पुण्याचे पोलिस आयुक्त श्री. तनखीवाले यांच्या अध्यक्षतेखाली 'जिमखाना-दिन' (Gymkhana Day) साजरा करण्यात आला.

क्रीडाक्षेत्रातील नैपुण्याबद्दल या वर्षी पुढील विद्यार्थ्यांना क्रीडा-शिष्यवृत्त्या देण्यात आल्या :—

१. श्रीरंग इनामदार २. गिरीश दंडे ३. कु. भारती शहा ४. कु. संजीवनी परकी
५. कु. भारती बनवेरु ६. कु. शैलजा तेलंग ७. कु. सुवर्णा कुंभार

## मॉम

मॉम ह्या हस्तलिखित नियतकालिकाचे हे चवथे वर्ष. मॉमच्या पहिल्या सत्रात पाच आणि दुसऱ्या सत्रात चार असे नऊ अंक निघाले. पहिल्या सत्रात कविता–विशेषांक निघाला. दुसऱ्या सत्रात हिंदी–विशेषांक आणि महिला-विशेषांक निघाले. महिला विशेषांक हे मॉमचे खास आकर्षण. महिला विशेषांकाचे प्रकाशन सुप्रसिद्ध लेखिका सौ. शैलजा राजे यांच्या हस्ते दि. १२ फेब्रुवारी १९७५ रोजी समारंभपूर्वक झाले. या अंकाचे संपादन कु. प्रज्ञा भागवत (शास्त्र विद्याशाखा) आणि कु. यशोधरा भालेराव (वाणिज्य विद्याशाखा) यांनी केले होते.

मॉमच्या नेहमीच्या लेखकांतून एक संघ निवडून त्या संघाचा पुणे आकाशवाणीच्या 'युवा-वाणी' मध्ये दि. २२ डिसेंबर १९७४ रोजी कार्यक्रम सादर करण्यात आला. या यशस्वी कार्यक्रमाचे नेतृत्व कु. गीता पारखी 'साहित्य विद्याशाखा' यांनी केले होते.

## कला मंडळ

सप्टेंबर १९७४ मध्ये (संगीत-संध्या) या कार्यक्रमाने कला-मंडळाच्या कार्यक्रमांना सुरुवात झाली. कलाप्रेमी विद्यार्थ्यांनी वेगवेगळ्या आंतर-महाविद्यालयीन संगीत स्पर्धांमध्ये खालीलप्रमाणे विलोभनीय यश मिळविले.

(१) श्री. श्रीकांत कुलकर्णी (तृतीय वर्ष वाणिज्य) रोटरॅक्ट गीतगायन स्पर्धेत प्रथम क्रमांक
(२) कु. मेधा टेंबे (प्रथम वर्ष साहित्य) रोटरॅक्ट नाट्यगीत स्पर्धेत द्वितीय क्रमांक.
(३) श्री. विकास पुरंदरे (द्वितीय वर्ष वाणिज्य) जेसी आंतर महाविद्यालयीन वादन स्पर्धेत तबलावादनात प्रथम क्रमांक.
(४) श्री. श्रीकांत कुलकर्णी व कु. मेधा टेंबे – श्रीमती ना. दा. ठा. महिला आंतरमहाविद्यालयीन संगीत स्पर्धेत अनुक्रमे पहिला व तिसरा क्रमांक.
(५) श्री. श्रीकांत कुलकर्णी (तृ. व. वाणिज्य) जी.ई.सी. करंडक आंतरमहाविद्यालयीन संगीत स्पर्धेत द्वितीय क्रमांक.

खालील विद्यार्थ्यांना कलानपुण्याबद्दल शिष्यवृत्ती देण्यात आली.

(१) श्री. श्रीकांत कुलकर्णी (तृ. व. वाणिज्य) (१) कु. मेधा टेंबे (प्र. व. साहित्य)

## नाट्य–विभाग

महाराष्ट्रीय कलोपासक या संस्थेच्या वतीने झालेल्या पुरुषोत्तम करंडक स्पर्धेत महाविद्यालयाने विजय तेंडुलकर यांची 'बळी' एकांकिका सादर केली.

## वादविवाद मंडळ

महाविद्यालयाच्या वादविवाद मंडळाने या वर्षी एकूण सात आंतरमहाविद्यायीन वक्तृत्वस्पर्धेत भाग घेण्यासाठी संघ पाठविले. त्या स्पर्धा पुढीलप्रमाणे—

( १ ) गरवारे कॉमर्स कॉलेज – कॉमर्स असोसिएशन वक्तृत्वस्पर्धा.

( २ ) न्या. रानडे आंतरमहाविद्यालयीन वक्तृत्वस्पर्धा.

( ३ ) डॉ. हिवाळे आंतरमहाविद्यालयीन वक्तृत्वस्पर्धा.

( ४ ) न्या. रानडे जन्मशताब्दी आंतरमहाविद्यालयीन वक्तृत्वस्पर्धा.

( ५ ) राष्ट्रसेवादल आंतरमहाविद्यालयीन वक्तृत्वस्पर्धा.

( ६ ) राजा ऑफ सांगली इलोक्युशन कप कॉंपिटिशन.

( ७ ) डॉ. आंबेडकर आंतरमहाविद्यालयीन वक्तृत्वस्पर्धा.

वरील स्पर्धांपैकी ( १ ) व ( ७ ) मध्ये आपल्या महाविद्यालयातील कु. यशोधरा भालेराव (द्वितीय वर्ष वाणिज्य ) व कु. वैजयंती आगवेकर ( द्वितीय वर्ष वाणिज्य ) यांनी अनुक्रमे प्रथम पारितोषिक व प्रशस्तिपत्रक मिळविले.

आमचे प्राचार्य, उपप्राचार्य, जिमखान्याचे सदस्य प्राध्यापक, महाविद्यालयीन शिक्षकेतर कर्मचारी सेवकवर्ग, विद्यार्थी प्रतिनिधी यांनी वेळोवेळी दिलेल्या सहकार्याबद्दल आम्ही कृतज्ञता व्यक्त करतो.

**कु. भारती शहा** — **प्रा. प्रभाकर आपटे**

**श्रीरंग इनामदार** — कार्याध्यक्ष

( विद्यार्थी प्रतिनिधी ) — जिमखाना

## वार्षिक स्नेहसंमेलन

या वर्षी आपल्या महाविद्यालयाचे वार्षिक स्नेहसंमेलन दि. २०, २१, २२ आणि २३ डिसेंबर १९७४ या दिवसांत आयोजित केले होते.

दि. २१ डिसेंबर १९७४ रोजी सकाळी ८ वा. पुण्याचे महापौर श्री. भाई वैद्य यांचे हस्ते प्रदर्शन आणि फन्‌फेअर यांचे उद्‌घाटन झाले.

दि. २२ डिसें. १९७४ रोजी सकाळी अल्पोपहार आणि सायंकाळी ६ वा. विविधगुणदर्शन असे कार्यक्रम होते. दि. २३ डिसेंबर १९७४ या दिवशी सायंकाळी ५ वाजता वार्षिक पारितोषिक वितरण समारंभ झाला. ह्या समारंभाचे अध्यक्षस्थान बजाज ऑटो लि. चे चेअरमन व मॅनेजिंग डायरेक्टर श्री. राहुलकुमार बजाज यांनी स्वीकारले होते. सौ. रूपादेवी बजाज यांनी पारितोषिकांचे वितरण केले.

महाविद्यालयातील 'सर्वोत्तम विद्यार्थी' म्हणून या वर्षी श्री. अविनाश ठकरार ( प्र. व. वाणिज्य ) ह्या विद्यार्थ्याची निवड झाली. आणि त्याला सर्वप्रथम 'दामोदर ढाल' मिळवण्याचा मान मिळाला.

संमेलन यशस्वी करण्यासाठी प्राध्यापकवर्ग, विद्यार्थी प्रतिनिधी, सेवकवर्ग यांनी खूप मेहनत घेतली. त्या सर्वांचे मनःपूर्वक आभार

**श्रीरंग इनामदार** — **प्रा. पद्‌माकर आपटे**

**कु. भारती शहा** — कार्याध्यक्ष

( विद्यार्थी प्रतिनिधी )

## छात्रसेना N. C. C.

१९७४–७५ या शैक्षणिक वर्षात आपल्या महाविद्यालयातील एकूण २३८ विद्यार्थि–विद्यार्थिनींनी छात्रसेनेच्या विविध विभागांमध्ये ( Units ) दाखल होऊन छात्रसेनेचे प्रशिक्षण संपादिले. विद्यार्थ्यांची विभागानुसार विभागणी खालीलप्रमाणे :—

| | विभाग ( Units ) | विद्यार्थ्यांची संख्या |
|---|---|---|
| (1) | 3 MAH Armd Sqn. | ११ |
| (2) | 3 MAH Air Sqn. | ११ |
| (3) | 3 MAH Naval Unit | ६३ |
| (4) | 12 MAH Bn. | १०१ |
| (5) | 2 MAH Girls Unit | २३ |
| (6) | 1 MAH Signal Coy. | २९ |
| | | २३८ |

खालील विद्यार्थ्यांची उत्कृष्ट छात्रसैनिक म्हणून निवड झाली.

| | विद्यार्थ्यांचे नाव | विभाग ( Units ) |
|---|---|---|
| (1) | Talwatkar J. M. | 3 MAH Armd Sqn. |
| (2) | Palande V. J. | 3 MAH Air Sqn. |
| (3) | Kadam S. J. | 3 MAH Naval Unit |
| (4) | U/o Dhamdhere M. N. | 12 MHA Bn. |
| (5) | Miss Seema Waval | 2 MAH Girls Unit |
| (6) | U/o Pansare R, J. | 1 MAH. Signal Coy. |

महाविद्यालयातील प्रा. अ. लु. पाथरे यांनी छात्रसेना अधिकारी प्रशिक्षण पूर्ण केले आणि ते नाविकदल विभागात NCC Officer म्हणून दाखल झाले.

**Prof. Padmakar Apte**
Officer–in–Charge

## श्री. माडखोलकर यांची महाविद्यालयास भेट

दिनांक १५ फेब्रुवारी १९७५ रोजी ज्येष्ठ साहित्यिक श्री. ग. त्र्यं. माडखोलकर यांनी महाविद्यालयास भेट दिली. त्यांच्याशी वाङ्मयीन प्रश्नांबाबत दिलखुलास गप्पागोष्टी व्हाव्यात याकरिता महाविद्यालयाने पुण्यातील काही प्रसिद्ध साहित्यिकांना आमंत्रित केले होते. श्री. माडखोलकरांनी याप्रसंगी अलीकडच्या विस्थापितांच्या साहित्याबद्दल आणि अलीकडच्या साहित्यातील उत्कटतेच्या अभावाबद्दल मोठे मार्मिक व वादग्रस्त स्वरूपाचे विवेचन केले. त्या विवेचनाच्या आधारे रंगतदार चर्चाही त्याचवेळी झाली.

**द. दि. पुंडे**

# ग्रंथालय

१९७३–१९७४ या वर्षाअखेरीस ग्रंथालयात एकूण १०,००० ग्रंथ होते. ह्यावर्षी वरील ग्रंथांच्या संख्येत एकूण २७४० ग्रंथांची वाढ झाली. ग्रंथालयात सध्या ७० नियतकालिके घेण्यात येतात. त्यांपैकी ३० साहित्यशाखेकडील, १० शास्त्रशाखेकडील, १३ वाणिज्यशाखेकडील आणि १७ इतर नियतकालिके आहेत. ह्याशिवाय ६ मराठी व ६ इंग्रजी अशी एकूण १२ वृत्तपत्रे घेतली जातात. आतापर्यंत ग्रंथालयावर एकूण १ लक्ष ३३ हजार रुपये खर्च करण्यात आले आहेत.

पुस्तक–पेढी–योजनेनुसार यावर्षी ३५० विद्यार्थ्यांना पुस्तकाचे संच वर्षभर विनामूल्य घरी वापरण्यास देण्यात आले. याशिवाय गरीब व होतकरू विद्यार्थ्यांना ४० संच वर्षभर घरी वापरण्यासाठी उपलब्ध करून देण्यात आले.

कला, वाणिज्य आणि शास्त्र या तिन्ही शाखांकडील पदवीपूर्व ते तृतीय वर्ष या वर्गातील गुणानुक्रमे पहिल्या पाच विद्यार्थ्यांना एका वेळी एका पुस्तकाऐवजी दोन पुस्तके देण्याची सोय एक जादा वाचकपत्र देऊन करण्यात आली.

रोज सरासरीने २०५ पुस्तके ह्याप्रमाणे एकूण ४०५९० ग्रंथ विद्यार्थ्यांना घरी वाचण्यास देण्यात आले. त्याचप्रमाणे रोज सुमारे १२५ ग्रंथ अभ्यासिकेतून विद्यार्थ्यांना वाचण्यास देण्यात आले.

मागील वर्षीप्रमाणे ह्या वर्षीसुद्धा प्रथम व द्वितीय सत्रात विद्यार्थ्यांच्या अभ्यासासाठी अभ्यासिका सायंकाळी ७ ते रात्री ११ पर्यंत खुली ठेवण्यात आली. या संधीचा एकूण १०० विद्यार्थ्यांना फायदा मिळाला.

ह्या वर्षी ग्रंथालय-समितीत खालील सभासद होते.

(१) डॉ. ल. ह. गाडगीळ (कार्याध्यक्ष) (२) प्रा. चिरपुटकर (३) प्रा. रायकर
(४) प्रा. दातार (५) श्री. द. गो. बापट (चिटणीस)

ग्रंथालय समितीच्या एकूण ५ सभा झाल्या. त्यामध्ये ग्रंथालयीन कामकाजाचा आढावा घेण्यात आला व मार्गदर्शन करण्यात आले.

खालील व्यक्ती व संस्था यांनी ग्रंथालयाला बहुमोल ग्रंथ भेट देऊन उपकृत केले.

१. ब्रिटिश कौन्सिल ग्रंथालय, पुणे
२. श्री. आर. डी. कुलकर्णी
३. डॉ. एल. एच. गाडगीळ
४. डॉ. भीमराव कुलकर्णी
५. डॉ. सौ. बनारसे
६. प्रा. एम. ए. कुलकर्णी
७. प्रा. पी. डी. आपटे
८. 'मॉडर्न' –हिंदी विभाग व्याकरण वर्ग
९. श्री. शाम वाघ

तसेच खालील विद्यार्थ्यांनी महाविद्यालयाला पुस्तके भेट दिली.

१. श्री. विक्रमादित्य शिंदे
२. श्री. अनंत अवसरे
३. श्री. पी. एस. बनसोड
४. श्री. के. डी. काळभोर
५. कु. एस. आर. जोशी
६. श्री. कल्याण इनामदार
७. श्री. नंदकुमार गुजर

**द. गो. बापट**
ग्रंथपाल

## साहित्य-संघटना

या वर्षीच्या मंडळाच्या कामासाठी प्रा. मुकुंद महाजन (अध्यक्ष). प्रा. सौ. गडकरी व प्रा. कु. भारती वर्दे हे प्राध्यापक आणि सर्वश्री भरत देशपांडे, अजित दरेकर, शशिकांत शितोळे, विवेक कुलकर्णी आणि कु. स्मिता देशपांडे या विद्यार्थी प्रतिनिधींची निवड झाली.

२१ ऑगस्ट १९७४ रोजी पुणे विद्यापीठातील मराठीचे प्राध्यापक डॉ. भालचन्द्र फडके यांच्या हस्ते मंडळाचे उद्‌घाटन झाले. डॉ. फडके हे नव्या मराठी साहित्याच्या स्वरूपावर बोलले. १४ सप्टेंबर १९७४ हा 'हिंदी दिवस' साजरा करण्यात आला. या दिवशी श्री. श्रीपाद जोशी यांचे व्याख्यान झाले. व त्यांच्या हस्ते हिंदी कथा-कथन-मंडळाचे उद्‌घाटन झाले. १० डिसेंबर १९७४ रोजी 'मानवी हक्क-दिना'निमित्त डॉ. सु. न. तवले यांचे 'आर्थिक राजनीती' या विषयावर व्याख्यान झाले. १८ जानेवारी १९७५ रोजी सुप्रसिद्ध कामगार नेते श्री. सदाशिव बागाईतकर यांचे 'भारतातील कामगार चळवळ' या विषयावर व्याख्यान झाले.

या व्यतिरिक्त अर्थशास्त्र विभागातर्फे अनेक चर्चासत्रे आणि हिंदी विभागातर्फे व्याकरण-वर्ग आयोजित करण्यात आले होते.

मंडळातर्फे एक ग्रंथालय चालवण्यात येते. गेल्या वर्षी या संग्रहात ८० पुस्तके होती. यावर्षी २० पुस्तकांची भर घालण्यात आली. ह्या ग्रंथालयातून आठवड्यातून एकदा विद्यार्थ्यांना पुस्तके दिली जातात.

मंडळाच्या कामास मार्गदर्शन आणि सहकार्य केल्याबद्दल प्राचार्य, उपप्राचार्य, प्राध्यापक, कर्मचारी व विद्यार्थी यांचा मी ऋणी आहे.

**प्रा. मुकुंद महाजन, अध्यक्ष**

## नियोजन चर्चा मंडळ

१९७४–७५ साठी नियोजन चर्चा मंडळाच्या व्यवस्थापन समितीमध्ये पुढील सदस्यांचा समावेश होता.

(i) प्राचार्य मो. भा. लिमये (अध्यक्ष) (ii) प्रा. अशोक पाथरे (कार्याध्यक्ष)

प्राध्यापक सदस्य : (i) प्रा. रा. मो. व्होरा (ii) प्रा. सौ. वि. सु. कुलकर्णी

विद्यार्थी प्रतिनिधी : (i) श्री. दी. रा. महाजन (ii) श्री. श. ना. शितोळे

ह्या वर्षी नियोजन चर्चा मंडळाने दोन कार्यक्रम घडवून आणले. दि. २६–९–७४ रोजी प्रा. व्ही. एम. दांडेकर, संचालक गोखले राज्यशास्त्र व अर्थशास्त्र संस्था यांचे भारतीय अर्थव्यवस्थेतील सध्याची भाववाढीची स्थिती या विषयावर व्याख्यान झाले. त्यानंतर १०–१–७५ रोजी मुंबईच्या 'फोरम ऑफ फ्री एंटरप्राइझ' या संघटनेच्या सहकार्याने 'सेठ वालचंद हिराचंद वक्तृत्व स्पर्धा' घडवून आणली. ह्या स्पर्धेचे परीक्षक म्हणून डॉ. ए. एस्. आपटे आणि श्री. एम. बी. तांबे ह्यांनी बहुमोल सहकार्य केले.

**दी. रा. महाजन**
सेक्रेटरी, नियोजन चर्चा मंडळ

**प्रा. अशोक पाथरे**
कार्याध्यक्ष

## वाणिज्य मंडळ

वाणिज्य शाखेतील विद्यार्थ्यांसाठी स्वतंत्र असे वाणिज्य मंडळ १९७३ जून पासून सुरू झाले वाणिज्य मंडळाची कार्यकारिणी यंदाच्या वर्षी खालीलप्रमाणे होती.

अध्यक्ष – प्राचार्य मो. भा. लिमये, कार्याध्यक्ष – प्रा. अ. गो. गोसावी,

सभासद – प्रा. सौ. माधवी मित्रा, प्रा. एन. एफ. कर्नावट

विद्यार्थी सचिव – श्री. अवसरे, कु. छाया जोगळेकर, श्री. पारिख व श्री. हेमंत अलबल.

द्वितीय वर्ष वाणिज्य व तृतीय वर्ष वाणिज्य शाखेचे सर्व विद्यार्थी ह्या मंडळाचे सभासद आहेत. ह्या वर्षीच्या उपक्रमाचे उद्‌घाटन बृ. म. कॉलेज ऑफ कॉमर्सचे प्राचार्य डॉ. सी. जी. वैद्य ह्यांचे हस्ते झाले. मंडळातर्फे यंदा बजाज ऑटो लि. वलकन लावल व एल्प्रो इंटरनॅशनल इत्यादी औद्योगिक समूहांना भेटी देण्यात आल्या. यंदाचे वैशिष्ट्य म्हणजे मंडळातर्फे एक स्वतंत्र असे 'कॉम' नावाचे भित्तिपत्रक (हस्तलिखित) सुरू करण्यात आले. ह्या वर्षी एकूण चार अंक प्रकाशित करण्यात आले. त्यांतील एक 'आंतरराष्ट्रीय व्यापार'वर काढलेला खास अंक होता. पहिल्या सत्रात डॉ. सी. जी. वैद्य व प्रा. एन. एफ. कर्नावट व दुसऱ्या सत्रात सौ. कुमद पोरे ह्यांची व्याख्याने आयोजित करण्यात आली. तसेच औद्योगिक लघुपट दाखविण्यात आले. मंडळाने चालविलेल्या ग्रंथालयात सुमारे १००० रुपये किंमतीच्या ग्रंथांची भर चालू वर्षी घालण्यात आली. मंडळातर्फे पदवी पूर्व वाणिज्य विद्यार्थ्यांसाठी टिळक पुण्यतिथीच्या निमित्ताने वक्तृत्व स्पर्धा आयोजित करण्यात आल्या. तसेच वाणिज्य शाखेतील विद्यार्थ्यांसाठी निबंधस्पर्धा आयोजित केली गेली. त्यास विद्यार्थ्यांचा उत्तम प्रतिसाद मिळाला. गतवर्षीप्रमाणे यंदाही तृतीय वर्ष साहित्य, शास्त्र व वाणिज्य विद्यार्थ्यांसाठी Employment guidence चा कार्यक्रम आयोजित करण्यात आला. त्याला विद्यार्थ्यांनी उत्तम प्रतिसाद दिला. मंडळाच्या द्वितीय वर्षाच्या विद्यार्थ्यांनी तृतीय वर्षाच्या विद्यार्थ्यांना प्रेमाचा निरोप देण्याचा समारंभ आयोजित केला होता.

सेक्रेटरी : **श्री. एच. जी. अवसरे, कु. छाया जोगळेकर,**
**श्री. सुरेश पारीख, श्री. हेमंत अलबल.**

**प्रा. अ. गो. गोसावी**
चेअरमन

## शिक्षक दिन

'प्रथमवर्ष साहित्य' वर्गाने ५ सप्टेंबर १९७४ रोजी 'शिक्षक दिन' साजरा करून महाविद्यालयात आणखी एका नवीन उपक्रमास शुभारंभ केला. आदरणीय गुरुवर्य श्री. टाटके यांच्या अध्यक्षीय उपस्थितीमुळे या कार्यक्रमास भरीवपणा आणि भव्यता लाभली. प्राचार्य, उपप्राचार्य यांचेसह सर्व प्राध्यापकांनी उपस्थित राहून आम्हाला त्यांच्याबद्दल कृतज्ञता व्यक्त करण्याची संधी दिली.

प्रा. पुंडे यांनी कार्यक्रमाबद्दल मार्गदर्शन केले. विद्यार्थी मित्र-मैत्रीणींच्या उत्स्फूर्त सहकार्याने या समारंभाची आठवण म्हणून प्रथम वर्ष साहित्य तर्फे महाविद्यालयाला विद्यादेवता श्री सरस्वतीची मूर्ती भेट देण्यात आली.

**अनंत भोपळे, प्रदीप कदम** ( वर्ग प्रतिनिधी )

## शारीरिक शिक्षण विभाग

१९७४–७५ या वर्षीच्या शारीरिक शिक्षण अभ्यासक्रमाची सुरुवात दि. २५ जून १९७४ ते १० जुलै १९७४ या कालावधीत संघनायक विद्यार्थी विद्यार्थिनींच्यासाठी आयोजित केलेल्या प्रशिक्षण वर्गाने झाली. २२ जुलै १९७४ पासून शारीरिक शिक्षणाचे नियमित तास सुरू झाले. यावर्षी विद्यार्थ्यांची चार आणि विद्यार्थिनींची तीन अशी सात कुले होती. नेहमीच्या उपक्रमाबरोबर चालू वर्षी क्रॉस कंट्री, रोड रनिंग, सर्किट टेनिंग, भारतीय व्यायाम यांसारखे नवीन प्रकारही अमलात आणले गेले. साखळी पद्धतीने विविध स्पर्धा घेण्यात आल्या.

विद्यार्थ्यांसाठी 'उंची वाढविणे' आणि 'फिजीकल पोश्चर डिफेक्टस् इन रेग्युलर लाईफ अँड रेमिडी थ्रु फिजिकल एक्झरसाईज' या दोन विषयांवर व्याख्याने आयोजित करण्यात आली.

पहिल्या सत्रात विद्यार्थ्यांची शास्त्रशुद्ध शारीरिक तपासणी करण्यात आली. तसेच वैद्यकीय कारणांसाठी शारीरिक शिक्षण तासांना माफी देण्यापूर्वी प्रा. डॉ. परांजपे यांच्या सल्ल्यानुसार त्या त्या विद्यार्थि–विद्यार्थिनींच्या अर्जांची छाननी करण्यात आली.

महाविद्यालयाच्या सहकारी भांडारातून विद्यार्थ्यांना आवश्यक तो गणवेष योग्य दरात देण्याची व्यवस्था करण्यात आली होती. गरीब विद्यार्थ्यांना प्राचार्यांच्या निधीतून गणवेष देण्यात आले.

**किरण लागू**
शारीरिक शिक्षण संचालक

## महाराष्ट्रातील पंचायती राज्य : परिसंवाद

१६ फेब्रुवारी १९७५ रोजी महाविद्यालयाच्या राज्यशास्त्र विभागाच्या 'लायसीयम'तर्फे राज्यशास्त्राच्या विद्यार्थ्यांचे एक अभ्यासशिबिर घेण्यात आले. शिबिराचा अभ्यास–विषय होता 'महाराष्ट्रातील पंचायती राज्य'. या विषयावर एक परिसंवाद घेतला गेला. पुणे जिल्हा परिषदेचे अध्यक्ष श्री. सातव, मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. भडकमकर ( I. A. S. ) शिक्षण व अर्थ समितीचे अध्यक्ष श्री. थिटे, हवेलीचे गट विकास अधिकारी श्री. धीमते व महाविद्यालयाचे प्राचार्य श्री. लिमये हे या परिसंवादास हजर राहिले होते. एकूण सात विद्यार्थ्यांनी व प्राध्यापकांनी चर्चेत भाग घेतला. लेख वाचणारे विद्यार्थी व त्यांचे लेख पुढीलप्रमाणे :—

( १ ) हिरा ठोंबरे – "लोकशाही विकेंद्रीकरणाची संकल्पना"

( २ ) सुधीर पुरोहित – "लोकशाही विकेंद्रीकरणाचा भारतातील विकास"

( ३ ) अशोक चव्हाण – "महाराष्ट्रातील जिल्हा परिषदेची रचना व वेगळेपण"

( ४ ) सुलोचना रेंगे – "जिल्हा परिषदेने केलेले विकास कार्य"

( ५ ) सुमन जोशी – "जिल्हा परिषदांचे अर्थ प्रशासन"

( ६ ) अजित दरेकर – "जिल्हा परिषदेने निर्माण केलेले दुय्यम नेतृत्व"

( ७ ) नयना कारखानीस – "जिल्हा परिषदांचे यशापयश"

लेख-वाचन संपल्यानंतर चर्चा झाली. या चर्चेचे संचलन श्री. भडकमकर यांनी केले. चर्चेमध्ये प्राचार्य श्री. लिमये, प्राध्यापक व विद्यार्थ्यांनी भाग घेतला. चर्चेनंतर श्री. भडकमकर यांनी समारोपात जिल्हा परिषदांचे वेगळेपण व विकासाच्या दृष्टीने त्यांची आवश्यकता यांचे मर्मग्राही विवेचन केले. त्यानंतर श्री. थिटे यांनी जिल्हा परिषदांमधील राजकारण व नेतृत्व याबाबत अनुभवाचे बोल सांगितले.

शिबिरातील एक कार्यक्रम म्हणून पुण्याजवळील वाघोली येथील विकासकार्याचे काम पाहण्यासाठी निरीक्षण-सहल आयोजित केली होती.

या शिबिरास पुणे जिल्हा परिषदेने बहुमोल सहकार्य दिले.

## राष्ट्रीय सेवा योजना

यंदाच्या वर्षापासून रा. से. योजनेच्या स्वरूपामध्ये मूलभूत बदल करण्यात आले. बदललेल्या स्वरूपातील रा. से. योजनेची माहिती फर्ग्युसन महाविद्यालयाचे प्राचार्य देवदत्त दाभोलकर यांनी आपल्या व्याख्यानात दिली. त्यांच्या हस्ते यंदाच्या कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली.

प्रथम सत्रात पथकाचा प्रमुख कार्यक्रम म्हणजे पर्वती पासगाव येथील वृक्षारोपणाचा कार्यक्रम. ह्या कामासाठी एक दिवसाची एकूण सात शिबिरे घेण्यात आली. ह्यावेळी चर खणणे, खड्डे खणणे व वृक्षारोपण करणे ही प्रमुख कामे करण्यात आली. मा. ना. वसंतरावजी नाईक, मुख्यमंत्री, आणि मा. ना. मधुकररावजी चौधरी वन व अर्थमंत्री ह्यांनी कामाचे ठिकाणी विद्यार्थ्यांशी बातचीत केली व वृक्षारोपण केले.

रिमांडहोम, अंधशाळा येथे नारळी पौर्णिमा, दसरा व मकर संक्रांतीस विद्यार्थ्यांच्या भेटी आयोजित केल्या होत्या.

संस्कार व्याख्यानामध्ये प्रा. डॉ. त्रि. मा. बाचळ, प्रा. एस. डी. संगोराम ह्यांची भाषणे आयोजित करण्यात आली होती.

पथकातील मुलांनी गोळा केलेली पुस्तके व नियतकालिके सेवाग्राम पिसोळीच्या शाळेला व पोलीस वसतिगृहाच्या वाचनालयाला भेट म्हणून देण्यात आली. पिसोळी शाळेतील ६, ७ वीच्या विद्यार्थ्यांना महाविद्यालय दाखविण्यासाठी आणले होते. १५ ऑगस्ट व २६ जानेवारी रोजी पिसोळी येथे ध्वजारोहण व श्रमदान, तसेच कॉलेज आवारात स्वच्छता, चर्चासत्रे इत्यादी नियमित कार्यक्रम घेण्यात आले.

मा. प्राचार्य मो. भा. लिमये, उपप्राचार्य डॉ. भीमराव कुलकर्णी व डॉ. एल. एच. गाडगीळ आणि सल्लागार समितीचे सदस्य ह्यांचे वेळोवेळी मार्गदर्शन आणि साहाय्य पथकास मिळत होते.

**शशिकांत मुनोत, सुधीर पुरोहित,**
**कु. संजीवनी रांजेकर, अनिता पित्रे**
विद्यार्थी प्रतिनिधी

**प्रा. म. आ. कुलकर्णी**
प्रमुख, रा. से. योजना

## गलिच्छता आणि रोगराई विरुद्ध युवकांची मोहीम

यंदाच्या वर्षी वरील मोहिमेखाली पुणे विद्यापीठाच्या कक्षेत एकूण २० शिबिरे आयोजित करण्यात आली. त्यांपैकी एक शिबिर आपल्या महाविद्यालयाने पिसोळी ह्या गावी दि. १६ ते २५ ऑक्टोबर १९७४ अखेर आयोजित केले.

मा. महापौर भाई वैद्य ह्यांनी शिबिराचे उद्‌घाटन करून युवकांच्या महान कार्याबद्दल त्यांना धन्यवाद व प्रोत्साहन दिले.

शिबिरासाठी महाविद्यालयाच्या एन. एस. एस. पथकातील २४ विद्यार्थी व ६ विद्यार्थिनींची निवड करण्यात आली होती. शिबिराच्या काळात ग्रामसफाई, रस्तेसफाई, आरोग्याचे महत्त्व ग्रामस्थांना पटवून देणे, आरोग्याचे शिक्षण इत्यादी कार्यक्रम करण्यात आले होते. रोज सकाळी श्रमदानाचा कार्यक्रम पण नियमितपणे करण्यात येई.

प्रा. शरद वाघ, डॉ. कुमार सप्तर्षी, सौ. भावे, श्री. मुक्कावर, डॉ. दादा गुजर ह्यांच्या भेटी व चर्चा ह्या कार्यक्रमाबरोबर शिबिराथानी चालू महत्त्वाच्या विषयावर चर्चासत्रे आयोजित केली होती.

मा. प्राचार्य मो. भा. लिमये ह्यांच्या हस्ते शिबिराचा समारोप करण्यात आला.

**प्रा. म. भा. कुलकर्णी**
शिबिर संचालक

## हिंदी व्याकरण व्याख्यानमाला

एस. एस. सी. ते एम. ए. पर्यंतच्या हिंदीच्या पाठ्यक्रमात व्याकरणाचा जवळ जवळ संपूर्ण अभाव दिसून येतो. ही उणीव अंशतः तरी दूर व्हावी या दृष्टीने मॉडर्न महाविद्यालयाच्या हिंदी विभागातर्फे, हिंदी शिकविणारे माध्यमिक शिक्षक, प्रशिक्षणार्थी व इतर प्रौढ अभ्यासक यांच्याकरिता दि. १२ ते २४ फेब्रुवारीपर्यंत हिंदी व्याकरण व्याख्यानमाला आयोजित करण्यात आली. ही माला पुणे विद्यापीठाच्या निरंतर शिक्षण योजनेच्या अंतर्गत घेण्यात आली. मालेस ६७ सदस्यांची उपस्थिती होती. शाळांनी आपणहून स्वखर्चाने सदस्यांना पाठविले होते. दौंड, मुंढवा, शिवणे येथून ही सदस्य येत होते.

मालेचे उद्‌घाटन प्राचार्य श्री. मो. भा. लिमये यांच्या हस्ते झाले. त्यावेळी डॉ. आनंदप्रकाश दीक्षित, पुणे विद्यापीठ, हिंदी विभाग प्रमुख, हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. मालेचा समारोप व प्रमाणपत्र वितरण समारंभ निरंतर शिक्षण केंद्राचे संचालक डॉ. एम्. एन्. पलसाने यांच्या हस्ते झाला. 'महाराष्ट्रातील हा पहिलाच प्रयोग यशस्वी झाला असून आम्हाला त्याचा फार लाभ झाला.' अशी प्रतिक्रिया सदस्यांनी समारोप प्रसंगी व्यक्त केली. मालेतील सर्व व्याख्याने प्रा. श्री. दा. संगोराम यांनी दिली होती.

अशाच प्रकारचे कार्य 'मॉडर्न'च्या विद्यार्थ्यांकरिता १९७२ सालापासून चालविण्यात येत आहे. त्यालाही विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे.

या वर्षी या वर्गासाठी विद्यार्थ्यांनी प्रत्येकी १ रु. प्रमाणे दिलेल्या फी मधून हिंदी विभागाने १२६ रु. ची पुस्तके ग्रंथालयास भेट म्हणून दिली.

# माजी विद्यार्थी संघटना

या वर्षापासून माजी विद्यार्थी संघटनेच्या कार्यक्रमास मोठ्या प्रमाणास सुरुवात झाली. जुलै १९७४ मध्ये झालेल्या संघटनेच्या या वर्षीच्या पहिल्याच सभेमध्ये कार्याध्यक्ष म्हणून डॉ. भीमराव कुलकर्णी यांची व संयुक्त कार्यवाह म्हणून श्री. शाम वाघ व रवींद्र गुर्जर यांची नियुक्ती करण्यात आली. याच सभेत संघटनेचे कामकाज व कार्यक्रम ठरविण्यासाठी एक कार्यकारी समिती नेमण्यात आली. कला, शास्त्र आणि वाणिज्य अशा प्रत्येक शाखेचे मिळून एकूण १२ जणांची नियुक्ती समितीवर ३ वर्षांसाठी करण्यात आली. तसेच संघटनेचे नेहमीचे कामकाज बघण्यासाठी दोन कार्यवाह नियुक्त करण्यात आले. खालील विद्यार्थ्यांची समितीवर प्रतिनिधी म्हणून नियुक्ती झाली.

| | |
|---|---|
| ( १ ) श्री. एस. डी. पाटील | ( ७ ) श्री. के. डी. काळभोर |
| ( २ ) श्री. एस. सी. परदेशी | ( ८ ) कु. अरुणा करडे |
| ( ३ ) कु. लता त्रिं. कुबेर | ( ९ ) कु. अरुणा काळुसकर |
| ( ४ ) श्री. टी. डी. गुंड | (१०) श्री. विवेक निवर्गी |
| ( ५ ) श्री. बी. बी. जेधे | (११) श्री. विजय कोंकणे |
| ( ६ ) श्री. ए. डी. शाह | (१२) श्री. ए. एम्. शिखरे |

तसेच प्रा. व्ही. जी. जोशी, प्रा. चंद्रकांत कुलकर्णी व श्री. बापट हे संघटनेचे सन्माननीय सदस्य आहेत.

संघटनेचे कार्यक्रम ठरविण्यासाठी साधारणतः दर दोन महिन्यांनी संघटनेच्या कार्यकारिणीची सभा होते. संघटनेच्या कामाची विभागणी ही वेगवेगळ्या समित्या नेमून करण्यात आली. उदा० स्नेहसंमेलन समिती, 'व्याख्यानमाला समिती' यामुळे सर्वांनाच संघटनेच्या कामात सक्रिय सहकार्य करावयास मिळाले व संघटनेचे कार्यक्रम यशस्वीरीत्या पूर्ण करता आले. 'माजी विद्यार्थी संघटना फंड' उभारण्यासाठी यावर्षी एक चित्रपट दाखविण्याचे ठरविले होते. परंतु संघटनेची कायदेशीर नोंदणी अजून झाली नसल्याने असा चित्रपट दाखविता आला नाही.

परंतु यामुळे नाऊमेद न होता; माजी विद्यार्थी संघटनेने, पुणे विद्यापीठ पुरस्कृत 'राष्ट्रीय एकात्मता ज्ञानसत्र' व्याख्यानमाला आयोजित केली. या व्याख्यानमालेत खालील नामांकित वक्त्यांची भाषणे झाली.

| दिनांक | वक्ते | विषय |
|---|---|---|
| शनिवार, १५ फेब्रुवारी | **श्री. श्री. प. मराठे** | पोलिस–जनता व एकात्मता |
| रविवार, १६ फेब्रुवारी | **डॉ. हेमंत इनामदार** | मराठी संतांचे सामाजिक प्रबोधन |
| सोमवार, १७ फेब्रुवारी | **डॉ. माधवराव भिडे** | शास्त्रीय प्रगती व एकात्मता |
| मंगळवार, १८ फेब्रुवारी | **प्रा. सौ. कुमुद पोरे** | वाढती महागाई आणि नियोजन |
| बुधवार, १९ फेब्रुवारी | **प्राचार्य न. गो. सुरू** | संस्कृत–प्राकृत–संस्कृती व एकात्मता |
| शुक्रवार, २१ फेब्रुवारी | **प्रा. अरविंद मंगरूळकर** | संगीताने साधलेली एकात्मता |
| शनिवार, २२ फेब्रुवारी | **प्रा. गं. बा. सरदार** | महाराष्ट्रातील सामाजिक परिवर्तन |

ही व्याख्यानमाला यशस्वी करण्यात कार्यवाहांना श्री. विक्रमादित्य शिंदे, श्री. निवर्गी, श्री. जेधे, कुमारी लता कुबेर या माजी विद्यार्थ्यांचे खूपच साहाय्य झाले.

त्याचप्रमाणे ता. २ मार्च रोजी माजी विद्यार्थ्यांचे स्नेहसंमेलन मोठ्या उत्साही व आनंदी वातावरणात पार पडले. त्या दिवशी प्रत्येक माजी विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर आपल्या माजी कॉलेज व प्राध्यापकांना भेटल्याचा आनंद दिसत होता. स्नेह-संमेलनाच्या दिवशी सकाळच्या कार्यक्रमात चर्चा गप्पागोष्टी परस्पर परिचय माजी विद्यार्थी व प्राध्यापक यांची क्रिकेट मॅच व इतर विविध करमणुकीचे खेळ यांचा समावेश होता. त्याच दिवशी संध्याकाळी सर्व प्राध्यापक व माजी विद्यार्थी हे एका करमणुकीच्या कार्यक्रमास गेले होते. अशा रीतीने हा दिवस मोठ्या आनंदात पार पडला. या कार्यक्रमास माजी विद्यार्थ्यांचा चांगलाच प्रतिसाद मिळाला.

या स्नेहसंमेलनाच्या कार्यक्रमानेच या वर्षीच्या माजी विद्यार्थी संघटनेच्या कार्याचा समारोप झाला.

संघटनेचे सर्वच कार्यक्रम यशस्वी होण्यास प्राचार्य लिमये यांनी वेळोवेळी योग्य ती मदत व सल्ला देऊन फारच मदत केली. त्याचप्रमाणे डॉ. भीमराव कुलकर्णी, प्रा. व्ही. जी. जोशी, प्रा. सी. जी. कुलकर्णी व ग्रंथपाल श्री. बापट यांचेही अनमोल साहाय्य झाले. त्यामुळे पुढच्या वर्षी संघटनेच्या कार्यास अधिक गती मिळेल असा विश्वास वाटतो.

**रवींद्र गुर्जर** } कार्यवाह
**शाम वाघ** }

## शास्त्र–संघटना

या वर्षासाठी शास्त्रसंघटना कार्यकारीमंडळ खालीलप्रमाणे :—

| | |
|---|---|
| १. प्रा. किशोर काशीद ( अध्यक्ष ) | २. प्रा. जे. व्ही. बर्वे |
| ३. प्रा. ए. व्ही. रायरीकर | ४. श्री. पी. डी. कुलकर्णी |
| ५. श्री. आर. व्ही. गंधे | ६. श्री. नाईक ( विद्यार्थी प्रतिनिधी ) |
| ७. श्री. संघवी ( विद्यार्थी प्रतिनिधी ) | ८. श्री. देशमुख ” |
| ९. श्री. दामले ” | १०. श्री. रामलाल ” |
| ११. कु. निकम ” | १२. कु. गोरे ” |
| १३. कु. कृष्णकुमारी ” | |

शास्त्र विभागासाठी या वर्षी खालील कार्यक्रम आयोजित करण्यात आले.

( १ ) विद्यार्थ्यांसाठी विज्ञान शाखेकडील तज्ज्ञांची व्याख्याने.
( २ ) विज्ञान विषयक लघु–चित्रपटांचे प्रदर्शन.
( ३ ) तृतीय वर्ष शास्त्राच्या विद्यार्थ्यांची ‘ राष्ट्रीय रसायन प्रयोगशाळा ’, पुणे येथे भेट.
( ४ ) द्वितीय व तृतीय वर्ष शास्त्रशाखा विद्यार्थ्यांची ‘भाभा अणुसंशोधन केंद्र, ट्रॉंबे ’ मुंबई येथे शैक्षणिक सहल.
( ५ ) शास्त्रशाखेच्या विद्यार्थ्यांसाठी स्वतंत्र ग्रंथालयाची सुरुवात.
( ६ ) “ Science News ” नावाचे भित्तिपत्रक सुरू केले. एकूण चार आकर्षक अंक निघाले.

**प्रा. किशोर काशीद**
अध्यक्ष

## व्यवसाय–मार्गदर्शन शिबिर

नोकरीसाठी घ्याव्या लागणाऱ्या मुलाखती आणि बौद्धिक चाचण्या ह्यांचे तंत्र सध्या अत्याधुनिक झाले आहे. पदवी घेऊन महाविद्यालयाबाहेर जाणाऱ्या विद्यार्थ्यांचा या बदलत्या आधुनिक तंत्राशी परिचय व्हावा ह्या दृष्टिकोणातून गतवर्षीप्रमाणे Employment guidance Course दिनांक ५, ६ व ९ मार्च १९७५ रोजी आयोजित केला होता. ह्यामध्ये तृतीय वर्षाच्या सर्व विद्याशाखेच्या विद्यार्थ्यांना स्वेच्छेनुसार सहभागी करून घेण्यात आले होते. एकूण ७५ विद्यार्थ्यांनी यामध्ये भाग घेतला. ह्या शिबिरात अर्जलेखन बौद्धिक चाचणी, मुलाखतीचे तंत्र व आवश्यक पूर्व तयारी व त्याचप्रमाणे पुण्यातील औद्योगिक व आर्थिक क्षेत्रातील सुप्रसिद्ध व्यक्तींच्या, उमेदवाराबद्दलच्या अपेक्षा ह्याबद्दल मार्गदर्शन अशा स्वरूपाचा कार्यक्रम आखला होता.

खालील सुप्रसिद्ध व्यक्तींनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

| | |
|---|---|
| १. श्री. असनानी, | मॅनेजर, रिसर्च अँड डेव्हलपमेंट, राजा बहादूर मिल्स, |
| २. श्री. देशपांडे, | फॅकल्टी लीडर, सेंट्रल बँक, ट्रेनिंग स्कूल. |
| ३. श्री. चक्रवर्ती, | असिस्टंट कमिशनर ऑफ पोलिस. |
| ४. श्री. पोकर्णा, | प्रोप्रायटर, पॉलिमार इंडस्ट्रीज. |
| ५. श्री. कौशिक, | मॅनेजमेंट कन्सल्टंट. |
| ६. श्री. बापट, | प्राध्यापक, बृ. म. कॉलेज. |

विद्यार्थ्यांच्या दृष्टीने हा उपक्रम अत्यंत यशस्वी झाला. ह्या उपक्रमासाठी ज्या औद्योगिक क्षेत्रातील नामवंत व्यक्तींचे सहकार्य लाभले त्यांचे महाविद्यालय आभारी आहे.

**प्रा. सु. ग. दातार**

## रोट्रॅक्ट क्लब

दिनांक १८ डिसेंबर १९७४ पासून मॉडर्न महाविद्यालयात श्री. पु. शं. पतके यांच्या मार्गदर्शनाखाली Rotaract club of Shivaji Nagar या शाखेची स्थापना झाली. श्री. दत्तात्रय टाकळकर (प्रथम वर्ष साहित्य) हे अध्यक्ष म्हणून नियुक्त झाले. संस्थेच्या वतीने आतापर्यंत खालील कार्यक्रम झाले.

(१) रिमांड होममध्ये जाऊन दिनांक १४ जानेवारी रोजी तेथील मुलांना तिळगूळ वाटप समारंभ. (२) मंडई मंडळातर्फे चालू असलेल्या 'झुनका–भाकर' या कार्यक्रमास आमच्या सर्व सभासदांनी उत्तम प्रतिसाद दिला. (२५ रु. मदत). (३) S.S.C. विद्यार्थ्यांना मार्गदर्शक व्याख्यानमाला आयोजित करण्यात आली.

**प्रा. सीताराम रायकर**

## Staff Academy : 1974-75

The following programmes were arranged and successfully carried out during the academic year 1974-75 by the Staff Academy Committee under the able guidance of Principal M. B. Limaye, President of the Staff Academy.

| Date | Paper Title | Presented by | Chief Guest |
|---|---|---|---|
| 31 July 74 | ' Nuclear Fission ' | Prof. S. Y. Gambhir | Prof. R. G. Takavale Head of the Deptt. of Physics, University of Poona. |
| 31 Aug. 74 | War on Inflation | Prof. M. S. Mahajan | Prof. P. V. Patwardhan. Vice-Principal, B. M. C., C. Poona-4. |
| 27 Sept. 74 | Consumers' protection & the role of consumers Co-op. Stores. | Prof. A. G. Gosavi | Dr. G. S. Kamat, V. M. N. Institute of Co-op. Management, Poona-16. |
| 14 Oct. 74 | ' Roses in December ' Autobiography of M. C. Chagla | Discussion and appreciation | Prof. G. P. Pradhan, |
| 19 Dec. 74 | Statistical quality control. | Prof. K. T, Kashid | Dr. J. V. Tatke. Statistician. Hindustan Antibiotics Pimpri, Poona. |
| 22 Jan. 75 | आजचे नवनाटक : काही प्रश्न | परिसंवाद | 1. Shri. Satish Alekar, 2. Dr. Vidyadhar Pundalik 3. Shri Chittaranjan Kolhatkar |
| 24 Jan. 75 | What is poetry ? | Prof. A. R. Natu | Dr. S. Nagarajan, Professor & Head of the English Deptt. University of Poona. |

| Date | Paper Title | Presented by | Chief Guest |
|---|---|---|---|
| 20 Feb. 75 | The Earth's Atmosphere and the disastrous weather Phenomena occuring in it. | Prof. S. L. Chorghade | Prof. S. L. Chorghade Research Scientist, Maharashtra Association Cultivation of Sciences, Law College Building. |
| ८ मार्च ७५ | कलकत्ता आणि बंगरंगभूमी | डॉ. वि. भा. देशपांडे | प्रा. पां. ना. कुलकर्णी, मराठी विभाग प्रमुख, राजाराम कॉलेज कोल्हापूर. |

**Dr. S. Y. Paranjape**, Chairman, Staff Academy

## Blood Donors

Following staff members and students donated Blood on Saturday 24th August 1974 in our College.

**Staff :**

1. Prof. P. D. Apte
2. Prof. M. R. Marathe
3. ( Mrs. ) Dr. M. Mitra
4. Prof. J. V. Barve
5. Prof. V. G. Joshi
6. Shri S. Lahoti S.

**Students :**

1. Munot S. J., S.Y.B.Com.
2. Risbud G. Y., Ex.
3. Erabde A. M., S. Y. B. Com.
4. Barve D. P., T. Y. B. Com.
5. Jadhav P. S., T. Y. B. Com.
6. Karde U. P., T. Y, B. Com.
7. Belgade A. P , S. Y B. Com.
8. Jain K. G., S. Y. B. Com.
9. Renge S. M., S. Y. B. Com.
10. Miss Kulkarni P. N., T.Y.B.Com.
11. Shah A. R., S. Y. B. Com.
12. Phadnis H. S., T. Y. B. Com.
13. Godbole M. G., T. Y. B. Com.
14. Parmar N. C., F. Y. B. Com.
15. Shah B. R., T. Y. B. Com.
16. Gole V. B., P. D. Sc.
17. Tatke D. S. F. Y. B. Com.
18. Gune A. D., F. Y. B, Com.
19. Yadav P. S., F. Y. B. Sc.
20. Bhalerao S. D., P. D. Com.
21. Gadre P. V., F. Y. B. Sc.
22. Vidwat P. M., M. Com., Ex.
23. Nadkarni S. M., T. Y. B. Sc.
24. Mahadkar S. P., F. Y. B. Sc.
25. Chikhale S. B., T. Y. B. Sc.
26. Thakur K S., T. Y. B. Sc.
27. Ghaisas S. N., T. Y. B. Sc.
28. Khole P. A., T. Y. B. Sc.
29. Kadam C. G , T. Y. B. Sc.

30. Hajare K. B., F. Y, B. A.
31. Thombre M. M., T. Y. B. Sc.
32. Shinde S. G., P. D. Com.
33. Bafna S. D., T. Y. B. Com.
34. Kale U. S,. T. Y. B. Com.
35. Dhole S. N., P. D. Com.
36. Apte M. M., P, D. Sc.
27. Bhome S. G., F. Y. B. Sc.
38. Shah R. C., F. Y. B. Sc.
39. Bang P. R.
40. Chavan R. S., F. Y. B. Sc.
41. Nazirkar S. G., F. Y. B. Sc,
42. Bhadkamkar P. A., S. Y. B. Com.
43. Page S. R., F, Y. B. Sc.
44. Munot S. A., F. Y. B. Sc.
45. Deshpande P. M., F. Y, B. Se.
46. Doshi S. M., T. Y. B. Sc.
47. Harshe V. K., F. Y. B. Com.
48. Patwardhan A. M., T. Y. B. Sc.
49. Miss Mascarenhus, F. Y. B. Sc.
50. Vakaskar S. V., F. Y. B, Sc.
51. Vidwat S. M.
52. Bendre R. R., F. Y. B. Sc.

Following Students & Staff Member donated Blood on 17-1-1975.

1. Salvi S. C.; P. D. Science
2. Pawar S. S. -do-
3. Shah R. C. F. Y. B, Sc.
4. Bhave B, A., S. Y. B. Sc.
5. Wagh D. B., -do-
6. Aphale S. P.. -do.
7. Kardile V. R., -do-
8. Miss Sangle J. V. -do-
9. Dolare V. B. -do-
10. Paranjape D. V. -do-
11. Avachat S. K. -do
12. Miss Date C. N., F. Y. B. A.
13. Bafna R. M., F. Y. B. Com.
14. Tatke D. S., -do-
15. Saraf S. N., -do-
16. Oak. S. B., S. Y. B. Com.
17. Dalvi H. D., T. Y. B. Com.
18. Miss Bharti Shah -do-
19. Deshmukh M. P. -do-
20. Bafna S. D. -do-
21. Vaidya S. S. -do-
22. Prof. P. D. Apte

## Mathematics Lecture-Series

This year a Mathematics Lecture-series was arranged by the Mathematics and Statistics Department in the first week of March. Many members of the staff from the Arts, Science and commerce faculties attended these lectures. The lecture-series served useful purpose by clairifying certain basic concepts in Mathematics and Statistics that are useful in studying other subjects.

The following lectures were arranged.

| Subject | Name of the teacher |
|---|---|
| 1. Set-Theory and Number System | Prof. C. G. Kulkarni |
| 2. Co-ordinate Geometry | Prof. Mrs. P. P. Chikate |
| 3. Statistics | Prof. K. T. Kashid |
| 4. Trigonometry and Indices | Prof. P. S. Chirputkar |

Dr. D. B. Kerur delivered an interesting lecture in the concluding function as the chief guest.

**P. S. Chirputkar**
Head of Deptt of Mathematics & Statistics.

## शैक्षणिक गुणवत्ता पारितोषिक विजेते

| अ. क्र. | नाव | | रुपये |
|---|---|---|---|
| १ | कु. गोडसे नीलिमा अनंत (प्रथम वर्ष शास्त्र) | एप्रिल १९७४ मध्ये झालेल्या पुणे विद्यापीठाच्या पदवीपूर्व विज्ञान परीक्षेत विद्यापीठात ७ वी व पदवी-पूर्व परीक्षेत विद्यापीठात ८ वी. | १५१-०० |
| २ | कु. पेंढारकर पद्मजा शंकर (प्र. व. साहित्य) | एप्रिल १९७४ मध्ये झालेल्या पुणे विद्यापीठाच्या पदवीपूर्व साहित्य परीक्षेत विद्यापीठात ७ वी | १५१-०० |

**प्राध्यापकनिधी पारितोषिके :**

| | | | |
|---|---|---|---|
| ३ | कु. पेंढारकर पद्मजा शंकर (प्रथम वर्ष साहित्य) | महाविद्यालयातील पदवीपूर्व साहित्य परीक्षेत प्रथम क्रमांक मिळविल्याबद्दल. | २५-०० |
| ४ | कु. गोडसे नीलिमा अनंत (प्रथमवर्ष शास्त्र) | महाविद्यालयात पदवीपूर्व विज्ञान परीक्षेत प्रथम क्रमांक मिळविल्याबद्दल. | २५.०० |
| ४ | ओगले अविनाश गणेश | महाविद्यालयात पदवीपूर्व वाणिज्य परीक्षेत प्रथम क्रमांक मिळविल्याबद्दल. | २५-०० |
| ५ | कु. कारखानीस नयना पुरुषोत्तम | महाविद्यालयात प्रथम वर्ष साहित्य परीक्षेत प्रथम क्रमांक मिळविल्याबद्दल. | २५-०० |
| ७ | श्री. छत्रे विनायक एस. | महाविद्यालयात प्रथम वर्ष शास्त्र परीक्षेत प्रथम क्रमांक मिळविल्याबद्दल. | २५-०० |
| ८ | श्री. भावसार प्रकाश नारायण | महाविद्यालयात प्रथम वर्ष वाणिज्य परीक्षेत प्रथम क्रमांक मिळविल्याबद्दल. | २५-०० |
| ९ | श्री. कुलकर्णी राजीव वसंत | महाविद्यालयात द्वितीय वर्ष साहित्य परीक्षेत प्रथम क्रमांक मिळविल्याबद्दल | २५-०० |
| १० | श्री. किणीकर मोहन वसंत | महाविद्यालयात द्वितीय वर्ष शास्त्र परीक्षेत प्रथम क्रमांक मिळविल्याबद्दल. | २५-०० |
| ११ | कु. जोगळेकर पद्मिनी बाळकृष्ण | महाविद्यालयात द्वितीय वर्ष वाणिज्य परीक्षेत प्रथम क्रमांक मिळविल्याबद्दल | २५-०० |
| १२ | सौ. लेले हेमा सुभाष | महाविद्यालयात तृतीय वर्ष साहित्य परीक्षेत प्रथम क्रमांक मिळविल्याबद्दल. | २५-०० |
| १३ | श्री. कृष्णकुमार पी. | महाविद्यालयात तृतीय वर्ष शास्त्र परीक्षेत प्रथम क्रमांक मिळविल्याबद्दल. | २५-०० |

**देणगीतून दिलेली पारितोषिके :**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | " रावसाहेब भागवत पारितोषिक " श्री. चिपलकट्टी नरेंद्र एन्. | विद्यापीठाच्या तृतीय वर्ष शास्त्र परीक्षेत महाविद्यालयात भौतिक विषयात प्रथम क्रमांक मिळविल्याबद्दल. | ४०·०० |
| २ | " वासुदेवराव तादके पारितोषिक " कु. गोडसे नीलिमा अनंत | विद्यापीठाच्या पदवी पूर्व शास्त्र परीक्षेत प्रथम क्रमांक मिळविल्याबद्दल | ६०·०० |
| ३ | " कै. रावबहादूर दत्तात्रय बळवंत राजोपाध्ये पारितोषिक " कु. गोडसे नीलिमा अनंत | विद्यापीठाच्या पदवीपूर्व परीक्षेत प्रथम क्रमांक मिळविल्याबद्दल. | ६०-०० |
| ४ | " वासुदेव व्यंकटेश पारितोषिक " सौ. हेमा सुभाष लेले | तृतीय वर्ष साहित्य परीक्षेत प्रथम क्रमांक मिळविल्याबद्दल. | २५-०० |

**वासुदेव पंडित पारितोषिक :**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | सौ. हेमा सुभाष लेले | तृतीय वर्ष साहित्य परीक्षेत प्रथम क्रमांक मिळविल्याबद्दल. | ६२-५० |
| २ | श्री. कृष्णकुमार पी. | तृतीय वर्ष शास्त्र परीक्षेत प्रथम क्रमांक मिळविल्याबद्दल. | ६२-५० |
| ३ | श्री. गुर्जर रवींद्र जी. | तृतीय वर्ष वाणिज्य परीक्षेत प्रथम क्रमांक मिळविल्याबद्दल. | ६२-५० |

**नारायण भागवत पारितोषिक :**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री. छत्रे विनायक एस्. | महाविद्यालयात प्रथम वर्ष शास्त्र परीक्षेत गणित विषयात प्रथम क्रमांक मिळविल्याबद्दल. | ६०·०० |

**कै. प्रा. अश्विनकुमार फडके पारितोषिक :**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | कु. गोडसे नीलिमा अनंत | पदवीपूर्व शास्त्र परीक्षेत महाविद्यालयात गणित विषयात प्रथम क्रमांक मिळविल्याबद्दल. | ५०-०० |
| २ | ओगले अविनाश गणेश | पदवीपूर्व वाणिज्य परीक्षेत महाविद्यालयात गणित विषयात प्रथम क्रमांक मिळविल्याबद्दल. | ५०-०० |

## मातोश्री मुळाबाई कर्नावट पारितोषिक :

| | | |
|---|---|---|
| श्री. बेरी हेमंत पी. | पुणे विद्यापीठाच्या तृतीय वर्ष वाणिज्य परीक्षेत ॲडव्हान्स अकौंटींग ॲंड ऑडिटींग विषयांत सर्वात जास्त गुण मिळविल्याबद्दल. | ५१-०० |

## माजी विद्यार्थी पारितोषिक :

| | | | |
|---|---|---|---|
| १ | सौ. लेले हेमा सुभाष | तृतीय वर्ष साहित्य परीक्षेत प्रथम क्रमांक मिळविल्याबद्दल | २५-०० |
| २ | श्री. कृष्णकुमार पी. | तृतीय वर्ष शास्त्र परीक्षेत प्रथम क्रमांक मिळविल्याबद्दल. | २५ ०० |
| ३ | श्री. गुर्जर रवींद्र जी. | तृतीय वर्ष वाणिज्य परीक्षेत प्रथम क्रमांक मिळविल्याबद्दल. | २५.०० |

## राष्ट्रीय कर्जाऊ शिष्यवृत्ती सन १९७४-७५

| क्र. | नाव | वर्ग |
|---|---|---|
| १ | श्री. शेख उस्मानगी अन्वर | प्रथम वर्ष वाणिज्य |
| २ | श्री. अहिनावे गुलाब शिवराम | द्वितीय वर्ष साहित्य |
| ३ | कु. माने शीला हनुमंत | द्वितीय वर्ष शास्त्र |
| ४ | श्री. दगडे वसंत भगवानराव | द्वितीय वर्ष शास्त्र |
| ५ | श्री. कुलकर्णी अजितकुमार वसंत | द्वितीय वर्ष शास्त्र |
| ६ | श्री. मांडे मल्हारी सीताराम | द्वितीय वर्ष वाणिज्य |
| ७ | श्री. पळूसकर चंद्रशेखर श्रीपाद | द्वितीय वर्ष शास्त्र |
| ८ | श्री. पाटील बाबूराव नाना | द्वितीय वर्ष शास्त्र |
| ९ | श्री. शिंदे नारायण मारुती | द्वितीय वर्ष शास्त्र |
| १० | श्री. वाघ दिनकर बळवंत | द्वितीय वर्ष शास्त्र |
| ११ | कु. यंदे सुनीता रघुनाथ | द्वितीय वर्ष शास्त्र |
| १२ | कु. उसेकर इंद्रायणी गणेश | द्वितीय वर्ष वाणिज्य |
| १३ | कु. आगवेकर वैजयंती भार्गव | द्वितीय वर्ष वाणिज्य |
| १४ | श्री. भावसार प्रकाश नारायण | द्वितीय वर्ष वाणिज्य |
| १५ | श्री. दोशी सुरेश मोहनलाल | द्वितीय वर्ष शास्त्र |
| १६ | श्री. कुलकर्णी विद्याधर वसंत | द्वितीय वर्ष शास्त्र |
| १७ | श्री. पानसरे शंकर देवराम | तृतीय वर्ष शास्त्र |
| १८ | श्री. देशपांडे रामचंद्र दत्तात्रय | तृतीय वर्ष वाणिज्य |
| १९ | कु. कुलकर्णी पुष्पलता वसंत | तृतीय वर्ष वाणिज्य |

## राष्ट्रीय शिष्यवृत्ती :

| क्र. | नाव | वर्ग |
|---|---|---|
| १ | कु. देशपांडे वीणा व्यंकटेश | प्रथम वर्ष शास्त्र |
| २ | कु. गोडसे नीलिमा अनंत | प्रथम वर्ष शास्त्र |
| ३ | श्री. सावंत विश्वनाथ गोपाळ | प्रथम वर्ष शास्त्र |
| ४ | कु. शाह नीता मोतीचंद | प्रथम वर्ष शास्त्र |
| ५ | कु. शुक्ल सुहासिनी रामकृष्ण | द्वितीय वर्ष शास्त्र |
| ६ | श्री. गाडगीळ दीपक दत्तात्रय | तृतीय वर्ष शास्त्र |

## राज्य सरकारची गुणवत्ता शिष्यवृत्ती :

| | | |
|---|---|---|
| १ | कु. पेंढारकर पद्मजा शंकर | प्रथम वर्ष साहित्य |
| २ | श्री. मोघे जगदीश मुकुंद | प्रथम वर्ष शास्त्र |
| ३ | श्री. परमार राजमल ब. | प्रथम वर्ष शास्त्र |
| ४ | श्री. पाठक उद्धवराव मा. | प्रथम वर्ष शास्त्र |
| ५ | श्री. बनसोड प्रकाश शंकर | प्रथम वर्ष शास्त्र |
| ६ | श्री. धाक्रस भानुदास दत्तात्रय | प्रथम वर्ष वाणिज्य |
| ७ | श्री. ओगले अविनाश गणेश | प्रथम वर्ष वाणिज्य |
| ८ | कु. केळकर वसुधा श्रीनिवास | द्वितीय वर्ष वाणिज्य |
| ९ | कु. नाईक गीता कृष्ण | द्वितीय वर्ष वाणिज्य |
| १० | कु. जाधव मीरा चिमणराव | तृतीय वर्ष शास्त्र |
| ११ | कु. जोगळेकर पद्मिनी बाळकृष्ण | तृतीय वर्ष वाणिज्य |
| १२ | कु. जोशी माणिक लक्ष्मण | तृतीय वर्ष वाणिज्य |
| १३ | श्री. मेढेकर उदय वसंत | तृतीय वर्ष वाणिज्य |

## सरकारी हायस्कूलमधून शालांत परीक्षा उत्तीर्ण होऊन महाविद्यालयात शिकत असलेल्या विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती :

| | |
|---|---|
| श्री. ढवळे वसंत चिमणाजी | पदवीपूर्व शास्त्र |

## अपंग विद्यार्थ्यांना मिळणारी शिष्यवृत्ती :

| | |
|---|---|
| कु. शेवाळे सुशीला लक्ष्मण | प्रथम वर्ष साहित्य |

## हुषार व होतकरू ग्रामीण विद्यार्थ्यांना मिळणारी राज्यसरकारी गुणवत्ता शिष्यवृत्ती :

| | |
|---|---|
| कु. देशपांडे पुष्पा रामचंद्र | प्रथम वर्ष वाणिज्य |

**स्वातंत्र्यसैनिक शिष्यवृत्ती :**

| क्र. | नाव | वर्ग |
|---|---|---|
| १ | श्री. शाह अजय कांतीलाल | प्रथम वर्ष वाणिज्य |
| २ | श्री. संकपाळ रामचंद्र विष्णू | द्वितीय वर्ष वाणिज्य |
| ३ | श्री. कटारिया अनिलकुमार चुनिलाल | द्वितीय वर्ष वाणिज्य |
| ४ | श्री. कवितकर बाबा भिकोबा | द्वितीय वर्ष वाणिज्य |
| ५ | श्री. चिखले शिवाजी बबन | तृतीय वर्ष शास्त्र |
| ६ | कु. सांगळे जयश्री विश्वनाथ | तृतीय वर्ष शास्त्र |
| ७ | श्री. शिंदेकर अविनाश माधवराव | तृतीय वर्ष शास्त्र |
| ८ | कु. इनामदार भाग्यश्री बाळकृष्ण | तृतीयवर्ष साहित्य |
| ९ | श्री. तिकोनकर अनिल दत्तात्रेय | पदवीपूर्व साहित्य |
| १० | श्री. शिंदेकर प्रदीप माधवराव | पदवीपूर्व साहित्य |
| ११ | श्री. चिखले रघुनाथ बबन | पदवीपूर्व शास्त्र |
| १२ | कु. सांगळे प्रतिमा विश्वनाथ | पदवीपूर्व वाणिज्य |
| १३ | कु. देशपांडे नंदिनी शंकर | पदवीपूर्व वाणिज्य |

**सैनिकांच्या मुलांना मिळणारी फी-सवलत :**

| | | |
|---|---|---|
| १ | श्री. खांडेकर चंद्रकांत मार्तंड | पदवीपूर्व शास्त्र |
| २ | ” पगार अशोक वसंतराव | पदवीपूर्व शास्त्र |
| ३ | ” पी. शिवबालन | पदवीपूर्व शास्त्र |
| ४ | ” भोसले चंद्रकांत रघुनाथ | पदवीपूर्व साहित्य |
| ५ | ” हरीशकुमार यादव | पदवीपूर्व शास्त्र |
| ६ | ” मोरे आनंद वामन | तृतीय वर्ष वाणिज्य |


गेल्या ७० वर्षांपासून ठेवीदारांचा विश्वास संपादन करणारी पुण्यातील प्रमुख सहकारी बँक

**दि कॉसमॉस को-ऑपरेटिव्ह अर्बन बँक लि., पुणे**

दूरध्वनी ५६२८३ लक्ष्मी पथ, कुंटे चौक, ६१२ सदाशिव पेठ, पुणे ३० स्थापना १९०६

मुदत ठेव, कॅश सर्टिफिकेट, हप्तेबंद ठेव, मासिक व्याज ठेव अशा अनेक ठेव योजांनमध्ये रक्कम गुंतवा व जास्तीत जास्त व्याज मिळवा.

बँकींगच्या सर्व व्यवहारासाठी आजच समक्ष भेटा.

**पर्वती दर्शन शाखा**
४८९/२अ, पर्वती दर्शन, पुणे ९
दूरध्वनी ४२३८६

**खडकी शाखा**
स. नं. १२/ब, घर नंबर ३३, बोपोडी,
पुणे–मुंबई पथ, पुणे ३

रा. य. बेलसरे — सह-व्यवस्थापक
गो. वा. पुजारी — व्यवस्थापक
व. रा. पिंगळे — उप-कार्याध्यक्ष
अॅड. त्रि. र. क्षीरसागर — कार्याध्यक्ष




आपण रु. १,००० किंवा त्यापेक्षा जास्त रक्कम आमच्याकडे जमा करा व आमच्या योजनेखाली २० वर्षांत ती सात पटीपेक्षा जास्त कशी होते ते पहा.

**बाजूच्या तक्त्याचा नीट अभ्यास करा.**

बँकेकडून दरवर्षी मिळणारे रु. १,००० पर्यंतचे व्याज करमुक्त असते. अधिक उत्पन्न असलेल्या वर्गांना ही तर पर्वणीच आहे. संपूर्ण माहितीसाठी तुमच्या नजिक असलेल्या आमच्या शाखा एजंटांना भेटा.

| ठेवीची मुदत | दरसाल व्याज (जवळ जवळ) |
|---|---|
| ६१ महिने | १३% |
| ८४ महिने | १४% |
| १०८ महिने | १६% |
| १२० महिने | १७% |
| १४४ महिने | १९% |
| १८० महिने | २३% |
| २४० महिने | ३१.५०% |

चिर समृद्धीची गंगोत्री

**बँक ऑफ बरोडा**

(प्रमुख राष्ट्रीकृत बँक)

भारतात आणि परदेशांत — इंग्लंड, केनिया, मॉरिशस, फिजी बेटे, गियाना आणि संयुक्त अरब अमीरेट्स येथे ८०० हून अधिक शाखांचे जाळे.




Don't burn the Paper
in waste.....
Turn to us and
earn the best.

The Paper which is
waste for you
is Best for us.

# HINDUSTAN WASTE PAPERS

565, SHIVAJINAGAR NEAR CORPORATION BLDG. POONA 411 005

With best Compliments from :

# SANGHVI METAL CORPORATION

Manufacturers of

Industrial Quality Copper, Brass and Aluminium Sheets, Strips and Circles and **Re-roller of Stainless Steel Sheets**

OFFICE & WORKS :

159/2, Akurdi, Bombay-Poona Road,
CHINCHWAD, Poona-411 019
Phone : 8449

BOMBAY OFFICE :

**Sole Selling Agents**
M/s. Sanghvi Metal & Alloys Co.,
28, 1st Bhoiwada, Bhuleshwar Road,
BOMBAY-400 002
Phone : 334979